मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

( ठाणे जिल्हा वाचनालय )     वाचनालय / संदर्भ / नौपाडा

चरित्र - ९२ = १८९७

ले.- विष्णु गणेश पटवर्धन

हरिभट बाबा यांचे चरित्र

९२

चरित्र

चारेम ९२

९२

पटवर्धन वंशाचे मूळ पुरुष

# हरिभटबावा

## यांचें चारित्र.

हें पुस्तक

### विष्णु गणेश पटवर्धन

यांनीं

तयार केलें.


तें

सोलापूर येथें


"आनंदवृत्त" छापखान्यांत छापिलें.

सन १८९७.

# …वर्धन वंशवृक्ष.



या हरिभटबावांचे चरित्रांत वर्णिलेले तत्कुलज पुरुष.
हरिभट.
रघुनाथभट
बाळंभट.
धोंडभट.
केशवभट.
विठ्ठलभट.
हरिभटबावा.
यांचे पांच पुत्र
विश्वनाथभट.
शिवबाआबा.
अंताजीपंत
गणपतरावकाका.
बळवंतराव
जनोबासुभेदार
विष्णुपंतभाऊ.
यादवरावनाना
विठ्ठलरावबाबा
भास्करपंत आपा
रामचंद्रपंत आपा तासगांव
गोविंदपंतनाना मिरजकर
त्रिंबकपंत आपा
बाळंभट
कृष्णंभट
पुरुषोत्तम राव
बळवंतराव
माधवराव
नारायण-राव


परशुरामभाऊ
गंगाधरराव
पांडुरंगराव
गोपाळराव
नीळकंठरा.
कोन्हेरराव.
मोरोब आबा
माधवराव दाजी
हरिपंत-बाबा
रामचंद्रपंतआ-पा जमखंडी
चिंतमणराव सांगलीकर
रामचंद्रबाळ
वासुदेवदाजी
सदोबाभाऊ
हरबाआणा
विनोबाआबा
धोंडोबादादा
पुरुषोत्तमराव
कृष्णराव
गणपतराव
नारायणराव
विठ्ठलराव
विष्णु गणेश ग्रंथकर्ता
परशुरामपंतभाऊ

उपाध्याय
...भिवडी.
...सार्वजनिक पुस्तकालय

॥ श्रीगणेशायनमः ॥

॥ श्रीकरंजेश्वर्यैनमः ॥

॥ श्रीगुरुभ्योनमः ॥

परमसत्पुरुषाय तीव्रतरतपोबललब्ध ब्रह्मणस्पति
वराय वैराग्यसंपत्संपन्नायानंदरूपाय
पटवर्धन कुलकूटस्थाय हरिभटाय

तसेंच अन्य सत्पुर्षांस व साधुसंतांस व गुरुजनांस वंदन करून
महाराष्ट्रीय इतिहासज्ञांस व साधुचरित्रप्रिय जनांस व
हरिभटबावांचे वंशीयास हा यथामति लिहिलेला
ग्रंथ आदरपूर्वक साविनय अर्पण
केला असे.

मुक्काम मिरज,
ता. १ जानेवारी १८९७.

ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना.

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध पटवर्धनवंश- जो पेशवाईत एक शतकपर्यंत दक्षिणेस स्वराज्याचा मुख्य आधारस्तंभ होता, व ज्या वंशामध्यें भास्करपंतआपा, रामचंद्रपंतआपा, विठ्ठलरावबाबा, विनोबाआबा. यांच्यासारखे वीरपुरुष होऊन गेले, व परशुरामभाऊसारखे जगद्विख्यात मुत्सद्दी निपजले, अशा या वंशाचे हरिभटबावा, या चरित्राचे मुख्य नायक जे हरिभट कोतवडेकर यांचे नातु, ते या पटवर्धन वंशाचे मूळ पुरुष होत. हे गृहस्थ मोठे थोर पुरुष असून गजाननभक्त असत. हे नेहमीं गजाननाचे पुजादिअर्चनामध्यें रत असून यांनीं आपलें सर्व आयुष्यपरमार्थ साधनांत घालविलें व त्यांतच असंख्य जनांवर उपकार करून स्वामिसेवा व त्याचप्रमाणें देशसेवाही साधून आपल्या वयाच्या ९३ व्या वर्षीं ह्मणजे शके १६७२ त स्वानंदास गेले. त्यांचे हे पुढील वंशीय इतक्या वैभवास चढून त्यांच्या हातून स्वदेशोन्नत्यर्थ येवढा मोटा कार्यभाग साधला हें ह्या सत्पुरुषाच्या आशीर्वादाचें फळ व त्यांनीं आराधित गजाननाचीच कृपा समजली पाहिजे. अशा थोर पुरुषाचें साद्यंत चरित्र ऐतिहासिक व भक्तिभावदृष्ट्या असणें किती अवश्यक? असें मनांत आणून, व इतरत्र तें उपलब्ध नसल्यामुळें, हा लहानसा ग्रंथ वाचकांस सादर केला आहे. मी तद्वंशीय असल्यामुळ त्यांच्याविषयीं वाडवडिलांपासून जी माहिती मला मिळाली व दप्तरांमध्यें तत्संबंधी जे कागदपत्र उपलब्ध होते त्यांचा उपयोग करून हें चरित्र लिहिलें आहे. यांत जे प्रमाद किंवा चुका झाल्या असतील त्यांची क्षमा करून या महान् सत्पुरुषाच्या चरित्रांतील कथाभाग गुणग्राहक वाचकांनीं घ्यावा ही ग्रंथकर्त्याची प्रार्थना आहे.

॥ ज्याच्या तीव्र तपोबलें करुनिया श्रीमोरयातोषले ॥  
॥ ज्याच्या सच्चरितामृता पिउनिया संतप्त संतोषले ॥  
॥ त्या कौंडिण्यकुलावतंस हरिचें चारित्र जें वर्णिलें ॥  
॥ त्यांचे अंध्रियुगीं समर्पुनिच तें म्या आदरें वंदिलें ॥ १ ॥

मिरज,  
ता. १ जानेवारी १८९७.

विष्णु गणेश पटवर्धन,  
ग्रंथकर्ता.

# अनुक्रमणिका.


| भाग. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| भाग १ | हरिभटबावांचा जन्म, श्रीगणेशसेवा व साक्षात्कार व विवाह आणि लोकप्रसिद्धी .... .... .... | १ |
| भाग २ | बावा कोतवड्यास आले, श्रीकरंजेश्वरीची आराधना व साक्षात्कार सावकाराचें गलबत त्यांचे प्रसादें मिळालें. त्यांच्या वडिलाचा काल, व त्यांस संतति .... .... | ४ |
| भाग ३ | कोंकणांतील तीर्थयात्रा, ह्मापणगांवीं नारायणरावाचा व्रतबंध, त्यास घोरपडे यांचा आश्रय, व त्याची करवीर सरकारांत मान्यता .... .... .... .... | १० |
| भाग ४ | बावांच्या मुख्य शिष्यांचीं नांवें व मुलांचे विवाह व त्रिंबकहरीस अक्कलकोटकर यांजपाशीं ठेविले व नारायणरावास पुत्र व्हावा ह्मणून व्यंकटेशगिरीस अनुष्ठानास गेले .... .... .... .... | १६ |
| भाग ५ | कुरुंदवाड कसें मिळालें. बावा मयूरेश्वराचे दर्शनास जातात, गणेशवाडीची वसाहत, श्रीमंताचे कन्येचा विवाह नारायणरावाचे पुत्राबरोबर बावांचे आज्ञेवरून | २४ |
| भाग ६ | बावांची त्रिस्थळी व काशीयात्रा रामचंद्रहरी गोविंदहरी यांचें वैभव कृष्णंभट व बाळंभट यांच्या पुत्रांची हकीकत | ३२ |
| भाग ७ | भास्करहरीची हकीकत, व त्यांचें वैभव सावनूरचें बंड. बाळाजी बाजीरावांचा मृत्यु भास्करहरी चाकरीवरून दूर झाले व त्यांच्या मुलांचीं नावें .... | ४४ |
| भाग ८ | परशुरामभाऊचा पराक्रम हैदर व टिपू यांचा पराभव धारवाडचा किल्ला घेतला आणि खर्ड्याची लढाई.... | ५६ |
| भाग ९ | चतुरसिंगाचें बंड परशुरामभाऊची कोल्हापूरकरावर स्वारी व त्याचा मृत्यु आणि एकोप्याचीं कांहीं उदाहरणें.... | ६७ |
| भाग १० | शेवटची तीर्थयात्रा व सन्यासाश्रमग्रहण व हरिबावा स्वानंदपुरीस गेले .... .... .... .... | ७९ |

# हरिभटबावा पटवर्धन यांचें चरित्र.

## भाग १.

प्रांत रत्नागिरी, कसबे कोतवडें, येथील खोत सहस्रबुद्धे यांची उपाध्येपणाची वृत्ती संपादन केलेले हरिभट पटवर्धन यांस दोन पुत्र- पहिले बाळंभट व दुसरे रघुनाथभट. पाहिल्यास तीन पुत्र- वडील हरिभट, दुसरे विठ्ठलभट व तिसरे केशवभट. आणि दुसऱ्यास एक पुत्र धोंडभट त्यांस पुत्र पांच. ते धोंडभट पुत्रांसह शिळ या नांवाचे गांवीं जाऊन राहिले, सबब त्यांस शिळकर पटवर्धन ह्मणूं लागले. पहिले बाळंभट यांचे वडील पुत्र हरिभट यांसच कोणी हरभट असेंही ह्मणत. हे मिरज सांगली वगैरे येथील पटवर्धन जाहगिरदारांचे मुळ पुरुष होत. यांचें जन्म सुमारें शके १५७७ ह्मणजे सन १६५५ त झालें असावें. हे वेदशास्त्रांचा अभ्यास केलेले असून, वयास सुमारें ३० वर्षें झालीं तथापि गरीबीमुळें लग्न वगैरे सुखास पात्र होईनात, ह्मणून त्यांची मातुश्री व वडील वगैरे फार कष्टी झाले. हें या हरिभटजींनीं पाहून वडिलांस विनंति केली कीं, आह्मी भक्तवत्सल सकलाभीष्टसुखदाता जो श्री गजानन त्याची सेवा केली नाहीं करितां या दारिद्र्यदुःखानें ग्रस्त झालों. यास्तव जर आपण मला श्री गणेशाची सेवा करण्यास आज्ञा द्याल तर मी प्रवालक्षेत्रीं ह्मणजे पुळें येथें जाऊन सेवा केल्यानें तो दयाळु गजवदन मला आपले दासवर्गात मिळवील. तेणेंकरून आह्मी सकलाभीष्ट सुखास पात्र होऊं. अशी पित्यास विनंति करून त्यांची आशीर्वचनपूर्वक आज्ञा घेऊन नंतर आपली कुलदेवता श्रीकरंजेश्वरी ईस व मातापित्यांस वंदन करून श्री गणेशसेवनार्थ मोठ्या भक्तीनें ते घरांतून निघाले.

ते पुळ्यास आले तेथें राहून प्रतिदिवशीं प्रातःकाळीं नित्यकर्म आटपून श्री गणेशाचें वैदिक, तांत्रिक, मंत्र, पूजन, स्तवन, सहस्रनाम-

पाठादि अनुष्ठानपद्धतीप्रमाणें तीव्र नियमानें आराधना सायंकाळपर्यंत करून रात्रौ भोजन करीत. याप्रमाणें चार वर्षें पूर्ण होत आलीं, तरी प्रभूचा साक्षात्कार नसल्यामुळें विशेष नियमादि कर्म करावें असें मनीं आणून तीव्रतरखाङ नियमादिपूर्वक जपादि कर्म करून अन्नाचा त्याग, मात्र रात्रौ फलादि भक्षण करून दोन वर्षें पूर्ण घालविलीं.तथापि प्रभूची कृपादृष्टि नसल्यामुळें बहुत श्रमी होऊन मनांत विचार करितात,कीं मी ईश्वराचा बहुत अपराधी असेन ह्मणूनच कृपेस पात्र झालों नाहीं. आतां हें अपराधी शरीर श्रीचे चरणसेवेनें नाहींसें करावें, अथवा प्रसादलाभ तरी व्हावा. असा निश्चय करून प्रतिदिवशीं प्रातःकाळीं नित्यकर्म झाल्यावर एका पायावर उभे राहून दोन दोन प्रहर स्थिर मनानें नासाग्रदृष्टि ठेवून ध्यान करीत,जपादिकर्म झाल्यावर पूजन स्तवनादिकर्म करीत. सायंकाळ झाला ह्मणजे नित्यकर्म करून दूर्वारसपान करीत. केव्हां केव्हां स्वल्प फलादि भक्षण करून श्रीगणेशस्मरण करीत करीत जी स्वल्प निद्रा येईल तितक्यानेंच तृप्त होऊन पुनः प्रातःकाळीं नित्याप्रमाणें क्रमानें कर्म करीत. असें सदाचरण प्रत्यहीं उत्तरोत्तर प्रेमाधिक्यानें करीत, हें सर्वांनीं पाहून ते फार विस्मय करीत आणि ह्मणत कीं, ह्या कलियुगांत हा कोणी पूर्व युगांतील गृत्समदभुशुंड्यादि ऋषीच अवतरून श्रीगणेशध्यान स्तवनादि महिमा अज्ञ जनांस दाखवावा ह्मणून आला असावा असें वाटतें. तसेंच शम दमादि साधनपूर्वक तीव्रतर तप चालू असल्यामुळें सर्व भाविक लोक फुरसत पाहून त्यांशीं भाषण व पूजन आणि इष्ट वस्तूंचें अर्पण करण्याविषयीं तत्पर असत. तथापि त्यांस प्रभुसेवेखेरीज कांहींच आवडत नसे. त्यानंतर केव्हां केव्हां सगुण सुरूप शुंडादंडसंपन्न दर्शनाभास होऊं लागल्यामुळें आनंदावस्थेंत निमग्न असल्यानें महायोग्याप्रमाणें त्यांची वागणूक दिसूं लागली. असा स्वल्प काल गेल्यावर श्रीगणेश स्वप्नांत प्रकट होऊन आज्ञा करिते झाले कीं,तूं शेंडे या उपनांवाचे देवाकडील पुराणिक,येथें राहणारे,यांच्या कन्येशीं लग्न करून ध्यावें;त्यांसही मीं हें सांगितलें आहे. ही आज्ञा श्रवण करून हरिबुवा जागे झाले आणि मनांत विचार करूं लागले कीं,मला प्राप्त झा-

लेल्या सुखापेक्षां स्त्रीपुत्रादि सुख क्षणिक, कारितां त्यांस धिःक्कार असो. प्रभु मला अनेक सुखांचा आभास दाखवून स्वानंदसुख देणार नाहींत काय? ही शंका घेऊन किंचित् खिन्न होऊन अनेक प्रकारें प्रभूचें स्तवन करिते झाले तें असें हे भक्तवत्सला,हे क्षिप्रप्रसादना,हे दयाघना,मला जन्ममरण-जनित दुःखापासून मुक्त करावें. अशी अनेक प्रकारें सविनय प्रार्थना करून पुनः प्रातःकाळीं प्रतिदिवसाप्रमाणें जपादि कर्म चालू केलें. तेचदिवशीं रात्रीं शेंडे पुराणिक यांस स्वप्नांत, तूं आपल्या कन्येचा हरिबुवा पटवर्धन जो माझी सेवा करीत आहे त्याशीं विवाह करून द्यावा, अशी आज्ञा होतांच पुराणिक जागृत होऊन विचार करितात कीं, ही श्रीची आज्ञा किंवा वातादि दोषांमुळें असें स्वप्न पडलें असावें? असा विचार मनांत आणून किंचित् घोटाळ्यांत पडले व त्या गोष्टीचा विचार न करितां तसेंच नित्यकर्म ह्मणजे श्रीगणेशसेवा करूं लागले. पुढें थोड्याच दिवसांत श्रीगणेशांनीं पुराणिकाचे स्वप्नांत प्रकट होऊन एक नारळ हातीं देऊन सांगितलें कीं, हा नारळ आणि तुझी कन्या हरिबुवा पटवर्धन यांस दे. अशी आज्ञा झाल्यानंतर पुराणिक जागे होऊन पाहतात तों नारळ हातीं आहे? तो अत्यादरें घेऊन, प्रभूची आज्ञा मोडल्याचे भयानें मोठ्या त्वरेनें आपले इष्टमित्रांस सर्व मजकूर निवेदन केला.तों इकडे त्याच रात्रीं हरिबुवांस उपास्य मूर्तीच्या आकारानें श्रीनीं दर्शन देऊन आज्ञा केली कीं, स्त्रीपुत्रादिलाभार्थ जें कर्म केलेंस त्या कर्माच्या लाभाचा आधीं उपयोग कर, नंतर वैराग्यादि संपत्तीनें आश्रमांतर होऊन अंतीं स्वानंदसुखलाभातें पावशील. असा वर देऊन श्रीगणेश गुप्त झाले. मग हरिभटबावा जागे होऊन उपास्यदेवतादर्शनलाभ झाल्यानें अत्यानंदांत मग्न होऊन गेले. नंतर कांहीं काल गेल्यावर श्रीवरद गणेशाचे आज्ञाभंगभयास्तव लग्न करून घेण्याचा विचार करितात तों शेंडे पुराणिक येऊन वंदन करून हरिभटबावांस आपणांस जाहलेली श्रीची आज्ञा व दिलेला नारळ पुढें ठेवून ह्मणतात, आज आपण धन्यधन्य आहां. मी आपणांस श्रीच्या आज्ञेप्रमाणें कन्या अर्पण करणार, तें आपण मान्य केलें पाहिजे.

[library stamp]

यप्रमाणें हरिभटबावांस व त्यांचे मातापिता बंधुवर्गास कळवून सर्वां-सह सुमुहूर्तावर कन्यादान केलें. त्यावेळीं हरिभटबावांवर मोठ्या तपाच्या प्रभावें करून श्री गणेशकृपा जाहलेली कर्णोपकर्णी सर्वांनीं श्रुत केली. यामुळें मोठमोठे तपोवृद्ध, वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, सहकुटुंब दर्शनास येऊन विवाहकालीं हरिभटबावांस वस्त्रभूषणादि अर्पण करून नमन करून स्तवन करिते झाले कीं, तुह्मीं पूर्वयुगांतील ऋषीप्रमाणें दृढतर निश्चयानें अनशन, फल मूल, दूर्वारसपानादि सेवन व इंद्रियनियमन-पूर्वक आणि शमदमादि साधनें करून महामंत्रजप, ध्यान, पूजनादि केलें त्यायोगें परम कारुणिक भक्तवत्सल श्री गजवदन साक्षात् दर्शनवत् स्वप्नांत दर्शन देऊन सर्वाभीष्ट देते झाले. अशा सत्पुरुषाचें दर्शनही दुर्मिळ. परंतु आमचे सुकृतयोगें आपलें दर्शन झालें. असीं अनेक प्रकारें भाषणें करून निरोप घेऊन बहुत विस्मय करीत आपापले गांवांस गेले. नंतर हरिभटबावाही मोठ्या समारंभानें श्रीगणेशास व तेथील क्षेत्रवासी ब्राह्मणांस पूजन भोजनादि सत्कारानें बहुत संतुष्ट करून त्यांचा निरोप घेऊन आपल्या कोतवडें गांवास सहकुटुंब जाण्या-करितां मार्गस्थ झाले.

---

## भाग २ रा.

हरिबावा पटवर्धन हे श्रीगजाननप्रसाद संपादन करून कोतवडें येथें आपले घरीं येण्याकरितां निघाले, हें त्या गांवांतील विद्वानांनीं ऐकून वाटेंत सामोरें येऊन, आदरानें हरिबावांस भेटून ते ह्मणाले आपण श्रीकृपासंपादनार्थ फार श्रम केलेत, त्याप्रमाणें प्रभूनें दया केल्याचें आम्ही ऐकून आपले दर्शनाची इच्छा करीत होतों, ती इच्छा प्रभूनें आज पूर्ण केली- इत्यादि अनेक गौरवाचीं भाषणें करीत त्यांस त्यांचे घरीं पोहोंचवून त्यांची आज्ञा घेऊन आपापले घरीं गेले. याप्रमाणें गांवांतील सर्व लोकांस हरिभटबावा पूज्य झालेले पाहून त्यांचे मातापिता व बंधुवर्गास फार आनंद झाला. पुढें थोडेच दि-

वसांत हरिबावांचे कनिष्ठ बंधु विठ्ठलभट व केशवभट यांचीं लग्नें क्रमानें झालीं. नंतर हरिबावा सहकुटुंब श्री कुळदेवता करंजेश्वरीचें दर्शनास श्री परशुरामनजीक गोवळकोट येथें जाण्याकरितां निघाले. वाटेंत श्री परशुरामाचें दर्शन घेऊन त्यालगतचे गोवळकोट या नांवचे गांवांत श्री करंजेश्वरीचें स्थान आहे तेथें येऊन राहिले. नंतर श्रीचा महामंत्रजप, व तप, पूजनादि अनेक प्रकारें श्रीची सेवा करीत असतां कांहीं दिवस गेले. नंतर इच्छेप्रमाणें श्रीप्रसाद त्वरित व्हावा असें मनांत आणून पूर्वीपेक्षां तीव्र आहारादिकांचें नियमन करून सेवा करण्यास आरंभ केला. तों पुढें थोडेच दिवसांत रात्रीं स्वप्नांत श्री गणेशदर्शन होऊन त्याच क्षणीं श्री करंजेश्वरीचेंही असें पुनः पुनः झाल्यानें मनांत फारच आनंद पावले. तों श्री देवी स्थिरकाल स्वरूपदर्शन देऊन ह्मणते, हरिभटजी, तुला प्रवाल क्षेत्रांत जो श्री गणेशाचा वरप्रसाद झाला तोच खरा मान. आतां येथें अनुष्ठानारंभसंकल्पकालीं तुला संततीच्छा असल्या कारणानें तुला विशेष संतति होईल व त्यांत शौर्य, औदार्य, सत्कीर्ति इत्यादि गुणसंपन्न असे अनेक पुरुष होतील. असा वर देऊन देवी गुप्त झाली. त्यावेळीं हरिभटबावा जागे होऊन मनांत विस्मय करितात कीं, श्रीगणेशांचे आज्ञेनें कुलदेवतादर्शनास गेलों तेथेंही प्रसादकालीं प्रभूनें स्वस्वरूप दर्शन पुनः पुनः देऊन कुलदेवीरूपानें वरदान केलें. तस्मात् आपले व्यापकतेचा कधींही भक्तास भ्रम नसावा ह्मणून दया केली. अशी प्रभूची परम कृपा मनांत आणून अति नम्र होत्साते स्तवन करितात कीं, हे सकलव्यापका, हे भेदबुद्धिविनाशका, हे दयाघना, हे आशापूरका, हे गजवदना, हे भक्तानुकंपिन्, हे पतितपावना इत्यादि देवतागुणानुरुप स्तवन करितां तदाकार मनोवृत्ति झाल्यामुळें चलनवलनादि रहित स्तब्धावस्थेंत बराच काळ गेल्यामुळें मातापिता बंधु वर्ग आपले मनांत विचार करितात, कीं हरिभटजी शयनस्थान सोडून स्नानादि नित्य कर्मास लागण्याचा वेळ झाला असून भूमिशयन काय निमित्तानें केलें! ह्या संशयानें जवळ जाऊन स्पर्श करितात तों ते जागृत असून अत्यंतानंदा-

वस्थेत मग्न असल्याची मुद्रा पाहून अनेक प्रकारें व्यावहारिक शद्वांनीं शोध करितां, बऱ्याच वेळानें व्यवहारज्ञानावर येऊन मातापित्यांस वंदन करून स्वप्नांत झालेला सर्व प्रकार सांगितला. तेणेंकरून सर्वांस आनंद होऊन, जय विघ्नेश, जय विनायक, जय कुलदेवते करंजेश्वरी, जय माते, इत्यादि स्तवन करीत अनुष्ठानसांगतार्थ ब्राह्मण सुवासिनी भोजन घालून श्रीकुलदेवतेचा निरोप घेऊन कोतवड्यास परत जाण्यास निघाले. वाटेंत श्री परशुराम, भैरवादि देवतांचें दर्शन घेत घेत आपले दर्शनास आलेले ब्राह्मणादिकांस आशीर्वचनादि सत्कारें संतुष्ट करीत घरीं आले. नंतर वडिलांची सेवा करीत वर्णाश्रमधर्माप्रमाणें वागत असतां कांहीं दिवसांनीं एक पुत्र झाला. त्याचें नांव कृष्ण असें ठेविलें. हरिभटबावांस पुत्र झाल्यामुळें त्यांचे परम वृद्ध मातापित्यांस परमानंद होऊन, आपण कृतकृत्य झालों असें ते मानूं लागले. पुढें हरिभटबावांची सत्कीर्ति लोकांनीं ऐकून दर्शनास येऊन त्यांचें सदाचरण, विद्वत्ता, श्रीगणेशकथाश्रवण-पठण-आणि भजनांस परमादर पाहून फार संतुष्ट होऊन त्यांच्या प्रपंचाच्या उपयोगीं पडावें ह्मणून धनधान्यादि आणून देत. त्याचा उपयोग हरिबावा प्राय:गणेश आराधनेकडे करून आपला प्रपंच भिक्षेनेंच चालवीत. अशा वागणुकीनें इतर विद्वानांस पूर्व युगांतील ऋषींच्या आश्रमाप्रमाणें हरिबावांचे राहण्याचें ठिकाण दिसे व त्यांतून त्यांचे मातापिता बंधुवर्ग यांचीही सुशीलता पाहून सर्वांस त्यांविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न होई. त्यायोगें त्या कुटुंबाचा योगक्षेम होत असल्यानें व बहुत काल देवताऽतिथिपूजन भोजनादि सत्कारपूर्वक श्री गजानन महामंत्र अनुष्ठान सदा चालू असल्यानें वाक्सिध्यादि लाभामुळें हरिभटबावांची सिद्धाई उत्तरोत्तर विशेष वाढूं लागली. यामुळें त्यांजपाशीं अनेक शिष्यसमुदायही जमला. मग त्यांसह ते तीर्थयात्रानिमित्तें कोंकणांतच फिरण्यास निघाले, तों फिरत फिरत रत्नागिरीस आले. तेथील अधिकारी यांनीं हरिबावांस शिष्यांसह अत्यादरें आपले घरीं कांहीं दिवस ठेवून घेऊन दक्षिणेदाखल कोतवडेपैकीं पांच बिघे जमीन दिली. ती अति आग्रहामुळें स्वीकारून त्यांनीं ती देणगी कोतवडें

येथील श्री महालक्ष्मीस दिली. ती अद्यापि तिजकडे चालत आहे असें ऐकण्यांत होतें. हल्लीं कसें आहे तें समजत नाहीं. पुढें हरिभटजीबावा रत्नागिरी सोडून राजापुराकडे गेले. तेथें दर्शनास आलेल्या ब्राह्मणादि जनांची मनकामना पूर्ण करीत असतां, कोणी नौकेंत बसून समुद्रांतून माल आणून व्यापार करणारा सावकार हरिभटबावांचे दर्शनास येऊन अति नम्रतेनें विनंति करून ह्मणाला कीं, माझें मालाचें गलबत येण्याची मुदत संपून बरेच दिवस झाले; तर माझें मालासुद्धां गलबत मला कधीं मिळेल व काय कारणानें त्यास जास्त दिवस लागले हें कृपा करून मला सांगावें. अशी प्रार्थना करीत कांहीं वेळ तो उभा राहिलेला पाहून बावांस दया येऊन त्या सावकारास पुढें बोलावून सांगितलें कीं, तुह्मीं केलेल्या प्रश्नाचें उत्तर खरें दिल्यास तुह्मांस बहुत कष्ट होणार; ह्याकरितां तुह्मीं श्री विघ्नहर गणपतीची प्रार्थना करावी. ते तुमच्या भक्तीप्रमाणें तुह्मांस सुख देतील. असें ह्मणतांच तो सावकार पुनः साष्टांग नमस्कार करून ह्मणाला महाराज, श्री गजानन आपणच आहांत. आपल्या प्रसादेंकरून बहुत जनांचें अभीष्ट झाल्याचें ऐकून मी आपणांस शरण आलों. तर मजवर दया करावी. माझा माल येण्यास कांहीं विघ्नें आलीं असल्यास तीं दूर करण्यास आपण समर्थ आहांत. जर माझें गलबत मला न मिळेल तर माझा सर्वस्वीं कुटुंबघात होतो. मी आपला दास आहे, करितां मजवर कृपादृष्टि व्हावी.इत्यादि अनेक प्रकारें स्तुति करीत तो एदीं नम्र झालेला पाहून बावांस दया आली व कांहीं वेळ ध्यान धारण करून कृपादृष्टीनें त्याजकडे पहात बोलतात कीं, तुमचें गलबत उदईक सूर्योदयाबरोबर समुद्रतीरास येईल आणि त्यांतून आलेला माल आणण्यास तुह्मी याच वेळीं जावें. अशी आशीर्वचनपूर्वक आज्ञा होतांच सावकार तो शिरसा वंदन करून निघाला तो थोडक्याच प्रहरांनीं समुद्रतीरीं पोंचला आणि सूर्योदय केव्हां होईल व बावांचे आशीर्वादें गलबत केव्हां दृष्टीस पडेल ह्या चिंतेंत बराच वेळ गेला. पुढें सूर्योदय होण्याबरोबर गलबताचा ध्वज दृष्टीस पडला.मग हरिबावांचें स्मरण करीत आपल्या

बरोबर आलेल्या जनांस तें येत असलेलें गलबत दाखवून बहुत संतुष्ट होत्साता त्यांतून माल काढण्याचीं साधनें घेऊन गलबताजवळ जाऊन त्यांतील लोक कडकडां भेटून अद्भुत झालेलें वर्तमान व त्याचा भयंकर परिणाम व त्यांतून सुटलेलें कौतुक सांगूं लागले. ते ह्मणाले आह्मी आमच्या नियमाप्रमाणें माल घेऊन येत असतां अकस्मात् मोठा वारा सुटून गलबत रस्ता सोडून बहुत दूर गेलें आणि तेथेंच रुतून चालेनासें झाल्यामुळें आह्मी तेथून सुटण्याबद्दल अनेक प्रयत्न केले.ते व्यर्थ गेले तेव्हां सर्वांस मरणाचें भय वाटून सर्वांनीं ईश्वरास शरण जाण्यावांचून दुसरा उपायच नाहीं हें समजून अनेक प्रकारें त्याचा स्तव करीत समग्र सात दिवस काढिले. आठवे दिवशीं तिसरे प्रहरीं आह्मांस कोणी या संकटापासून सोडविणारा भेटेल कीं काय या आशेनें चोहोंकडे पहात असतां अकस्मात् चोहों-कडून मत्स्य,कच्छ, मकरादि जलचरें येऊन त्यांतच एक अति विशाल हत्ती नानाप्रकारचे शब्द करीत गलबतास वेढा घालूं लागल्यामुळें मरण-समय आला असें खचित वाटलें. परंतु तें गलबत त्या हत्तीनें वर उचललें व आपले मस्तकानें पुढें ढकलतांच चालू झालें. तें वायु-वेगानें आपल्या मार्गावर येतांच सर्वांस धैर्य येऊन, आम्ही आपल्या यजमानाच्या दैवयोगानें या मरणभयापासून मुक्त झालों; आतां यज-मानाचे पाय केव्हां दृष्टीस पडतील व त्यांचा माल त्यांस केव्हां देऊं ही मनांत उत्कंठा लागली तों आज आपलें दर्शन झालें. असे अनेक प्रकारची प्रभुलीला सांगतांच तो सावकार बावांचे आशीर्वच-नाचे माहात्म्यें ह्या सुखास मी पात्र झालों असें वारंवार मनीं आठवून त्या सर्वांस भेटून बावांचे दर्शनास निघाला आणि तो मनांत विचार करितो कीं, हा लाभ नच हो-णारा खरा, परंतु मोठे तपस्वी ईश्वरभक्त हरिभटबावा यांच्या प्रसादें मला प्राप्त झाला. तर तो सर्व माल त्याचे पदीं अर्पण करावा, असा निश्चय करून बावांचें दर्शन घेऊन व वंदन करून ह्मणतो महाराज, आपले आशीर्वादें मला सर्व माल मिळाला. आपण सा-

[library stamps]

क्षात् श्रीगजानन अवतार आहांत. आपल्या सेवेनें प्राणी परम सुखा-पात्र होतीलच ही बुद्धि आह्मां सर्वांस आपल्या कृपेनें सतत राहावी आणि ही इच्छा पूर्ण करावी. अशी अनेक प्रकारें विनंति करून बरोबर आणलेला सर्व माल भटजीबावांचे पदीं अर्पण केला आणि हात जोडून मोठ्या विनयानें ह्मणाला महाराज, हा सर्व माल आपला आहे. याची व्यवस्था आपण करणें असेल तशी करावी, व मज गरीबावर पूर्ण कृपादृष्टि असावी. ही त्याची औदार्यवाणी श्रवण करून हरिबावा संतुष्ट होत्साते त्यांस पुढें बोलावून ह्मणाले अहो शेटजी, तुमचा उदारपणा पाहून मला मोठा संतोष झाला. हा हजारों रुपयांचा माल आह्मां स्वल्प भिक्षेनें निर्वाह करणाऱ्यास घेणें उचित नाहीं. आपल्या मालाचा उपभोग आपणच करावा. हे शब्द अनेक लोकांनीं श्रवण करून मोठें आश्चर्य करीत आपापल्यांत ह्मणतात हा कोणी ईश्वरभक्तच या पटवर्धनकुलांत अवतरला असावा. पहा ज्याच्या आशीर्वादानें समुद्रांत रुतून राहिलेलें गलबत जलजंतूंनीं ढकलून कडेस लाविलें, व त्यांतील माल मालक अर्पण करीत असतां बावा स्वीकारीत नाहींत अशा सत्पुरुषाचें दर्शन या कलियुगांत बहुत दुर्मिळ. अशी अनेकांची अनेक प्रकारें बावांविषयीं बहुत पूज्य बुद्धि उत्पन्न झाली. पुढें कांहीं दिवस तेथें राहून परत आपले घरीं आले. मग मातापित्यांचे सेवेविषयीं अत्यासक्त, अतिथिपूजनीं बहुप्रेमळ, श्रीगणेशपूजनीं अत्युत्सुक अशा वागणुकीनें वागत असतां कांहीं दिवसांनीं वृद्धत्वामुळें मातापिता मरण पावल्यावर त्यांचें उत्तर कार्य सांग करून बंधुवर्गासह गृहस्थाश्रमसुख अनुभवीत असतां दुसरा पुत्र झाला. त्यास आपल्या पित्याचें नांव बाळंभट हें ठेविलें. पुढें क्रमेंकरून पांच पुत्र झाले, पैकीं एक देवाधीन झाला. शेष सहा पुत्र राहिले. त्यांचीं क्रमवार नांवें:— पहिले कृष्णंभट, दुसरे बाळंभट, तिसरे त्र्यंबकपंत आपा, चवथे गोविंदपंत नाना, पांचवे रामचंद्रपंत आपा व सहावे भास्करपंत आपा. हे सहा पुत्र देवताऽतिथिपूजक असून वेदाभ्यास व पितृसेवा करीत बरेच तरुणावस्थेंत आले, असें हरिबावांनीं पाहून आतां यांसह कांहीं दूर

प्रदेशीं गमन करणें योग्य आहे, असें मनांत आणून तें उभयतां बंधूस कळविलें.

---

## भाग ३ रा.

पुढें स्त्री--पुत्र--शिष्यमंडळीसह कोंकणांतील तीर्थयात्रेस निघाले. तों जागजागीं शिष्यमंडळीही पुष्कळ मिळाली त्यांसह ते हिंडत असतां कोणी सत्पुरुष आल्याचें ऐकून दर्शनार्थ येऊन मोठ्या आग्रहानें आपल्या घरीं नेऊन पूजनादि सत्कारें कांहीं दिवस सेवा करून, बावांस बहुत काल एके ठिकाणीं राहणें नको असल्यामुळें थोडेच दिवसांत पुढें जाण्याची पाठवणूक करीत. असे अनेक गांवांतील अनेक भाविक लोक अनेक प्रकारचे सत्कारेंकरून हरिबाबांचा आशीर्वाद मिळावा या हेतूनें कांहीं दिवस आपापले घरीं ठेऊन घेऊन श्री गजाननवत् पूजन करीत. पुढें तो गांव सोडून दुसरे गांवीं जात, अशा क्रमानें सांवतवाडीस आल्यावर, राजापूर वगैरे ठिकाणीं अनेक भक्तजनांचे मनोरथ पूर्ण केलेले हरिबावा पटवर्धन आले आहेत हें तेथील राजास शिष्ट ब्राह्मणद्वारा श्रुत झाल्यावरून तो बावांचे दर्शनास येऊन मोठ्या प्रेमानें आपल्या घरीं येण्याविषयीं त्यांस आग्रह करूं लागला. त्यावरून बावा त्याचे घरीं गेले. त्यावेळीं त्या राजास शत्रूंनीं पराजित करून अल्प अधिकारावर ठेविलें होतें. हा आपला सर्व वृत्तांत राजानें निवेदन करून तो मोठ्या विनयानें प्रार्थना करूं लागला महाराज. आपण बहुत तपस्वी आहांत; तर मला या शत्रुभयापासून मुक्त करा. असी पुनःपुनः प्रार्थना श्रवण करून दया आल्यामुळें कांहीं श्री गजाननाची सेवनपद्धति सांगून बावा बोलतात, तुह्मांस सांगेन तसें कराल तर तो प्रभु विघ्नराज तुह्मांस सकल संकटांपासून मुक्त करून अभीष्टही देईल. असा आशीर्वाद देऊन निरोप घेतल्यावर कांहीं दिवस त्याच गांवीं लोकांचे आग्रहामुळें राहून पुढें ग्रामांतरास निघाले, तों राजाही पूर्ण मनोरथ होत्साता दर्शनास येऊन चांगली पाठवणूक क-

रिता झाला. पुढें मार्गवशात् जातां जातां ह्मापण या नांवचे गांवा-जवळ गेले, तों तेथील गांवकऱ्यांस बावांची कीर्ति ऐकून माहीत असल्यामुळें ते सामोरे येऊन अति आनंदानें गांवांत नेऊन, आ-ह्मांस आपला प्रति दिवशीं दर्शनलाभ व्हावा अशी सविनय प्रार्थना करून गौरवीत शिष्यादि सर्व मंडळीसह हरिबावांस ह्मापण गांवांत सुस्थलीं ठेविलें. ते तेथें आहेत हें नजीकचे ग्रामस्थांनीं श्रवण करून अनेक ब्राह्मणादि लोक दर्शनास येत. त्यांत एक विधवा स्त्री जोशी या उपनांवाची पुत्र घेऊन दर्शनास आली आणि पुत्रास बावांचे पायावर घालून विनंति करूं लागली कीं, महाराज, या मुलाचें पालनकर्ते कोणी नसल्या कारणानें वेळेस अन्नवस्त्रही मिळत नसून आतां व्रतबंधाचे दिवस आले. यास्तव आमचे कुलोपाध्याय यांस अनेक प्रकारें मुलाचा व्रतबंध करण्याबद्दल विनंति केली असतां ते ह्मणतात तुह्मां दरिद्र्यांचा पुरोहितपणा आह्मांस नको; तो कोणा दुसऱ्यास देऊन व्रतबंध करून घ्यावा. असें बोलून निरोप दिल्यावर इतरांस विनंति केली, तथापि मज गरिबावर कोणीच दया करीनात. आतां आपण अनेकांस संकटापासून दूर केलें तें श्रवण करून मी शरण आलें, तर कृपा करून या मुलास आपले शिष्यवर्गांत मिळवून व्रतबंध करावा. असें अनेक प्रकारें स्तवनपूर्वक मागणें करीत बहुत काल ती उभी राहिली. हें पाहून तिला बोलावून बावा सांगतात कीं, आह्मी भिक्षेनें निर्वाह करणारे, करितां तुमच्या पुत्राचा व्रतबंध उत्साहानें होणें कठिण. असें बावांचे शब्द ऐकून बाई ह्मणते महाराज, आपल्या इच्छेप्रमाणें कार्य करावें आणि मज शरणागताचा अंगीकार करावा. असें ह्मणून मुलास पुनः भटजींचे चरणावर घातलें. मग बावांचें मन विशेष दयापूरित झालें आणि तिला अभय देऊन सांगितलें कीं, अगे, या दारिद्र्याला भिऊं नको. तुझे पुत्राचा व्रतबंध त्वरित होऊन सुख पावशील. असा बावांचा वरप्रसाद मिळतांच तिला असें वाटलें कीं, आज माझें सकलारिष्ट गेलें व सत्पुरुषाचा वरानुभव खचित येणार. असा निश्चय करून पुनः पुनः नमन करीत

उभी राहिली, तों बावांनीं धनेच्छेनें रामभट दांडेकर यांस वाटवे या नांवानें हाक मारिली. या नांवानेंच हाक मारण्याचें कारण दांडेकर हे बहुत सुशील असून विद्वान व बावांशीं परम सत्यत्वेंकरून वागणारे असे असल्यामुळें बुवांस जें भिक्षेनें द्रव्य मिळे ते बावा त्या दांडेकर भटजी-जवळ देऊन त्याजकडून आपला प्रपंचखर्च चालवीत. ते भटजी हरिभटबावांचें द्रव्य ठेवण्यास एक प्रकारची पिशवी करून त्यांत ठेवीत, त्या पिशवीस वाटवा ही संज्ञा आहे. तो वाटवा चोरांच्या भयानें सदा आपले जवळ ठेऊनच ते वागत असत, ह्यामुळें बावा त्यांस एखादे वेळेस वाटवे या संज्ञेनेंच हाक मारीत. हा शब्द इतरांनीं ऐकून, थोराचे मुखांतून आलेल्या शब्दानेंच इतर लोक त्यांजशीं व्यवहार करूं लागले. यामुळें सर्व लोकांत त्यांचे दांडेकर हें उपनांव जाऊन त्या ठिकाणीं वाटवे हें उपनांव प्रसिद्ध झालें, तेंच अद्यापपर्यंत चालू आहे. हे ते रामभटजी वाटवे बावापुढें येऊन ह्मणाले काय आज्ञा आहे? हे शब्द ऐकून बावा त्याजकडून शिलकेस धन असल्याची कबुली घेऊन त्या नंतर शिष्यमंडळीकरवीं व्रतबंधाची तयारी करवून सुमुहूर्तावर त्या मुलाचा व्रतबंध करूं लागले. त्यावेळीं त्या स्त्रीनें अत्याग्रहानें हरिबावांस पुरोहितपणा दिला तें त्यांनीं अंगीकारून कार्यसिद्धि केली. नंतर ती स्त्री मुलास घेऊन अत्यानंदानें हरिबावांचे दर्शनास येऊन पुनः पुनः नमन करीत विनंति करिते कीं, महाराज, आपली या मुलावर कृपादृष्टि होऊन आपण याचा व्रतबंध करून यास ब्राह्मणांमध्यें आणिला; तसेंच हा विपत्तियुक्त जो आपला शिष्य तो संपत्तिमानांमध्येंही मान्य व्हावा. असें मागणें करून अनेक प्रकारें हरिबावांचें शिष्यवात्सल्य वर्णन करिते, महाराज, आपल्या आशीर्वादें इच्छित वस्तुलाभ झाल्याचें अनेकांस श्रुत आहे, तसेंच मीही पुत्राच्या व्रतबंधसंकटापासून मुक्त झाल्याचा अनुभव घेऊन प्रार्थना करीत आहे, तर दया करावी. असें ह्मणत पुत्रास घेऊन उभी राहिलेली पाहून दया येऊन हरिबावांनीं त्या मुलास जवळ बोलावून कांहीं काल ध्यानें करून त्याच्या इष्टार्थसिध्यर्थ श्रीगजाननचिंतन करून प्रसन्न होत्सातें बोलतात, अगे बाई तुझ्या मुलाचें पूर्व, जन्म कर्म, ऋणधनादि पाहतां

याचा ऋणी घाटावर कापशी या नांवाचे गांवचा अधिपति आहे. तर तूं मुलास घेऊन त्याजकडेस जावें, ह्मणजे तो पुत्रबुद्धया याचा अंगीकार करील आणि त्यायोगें याची विपत्ति जाऊन सर्व संपत्तिमानांमध्येंही तो मान्य होईल. हें वरदवाक्य श्रवण करितांच ती बाई संतोष पावली, परंतु मनांत विचार करिते कीं, तो अधिपति पुत्रबुद्धया अंगीकार करितां माझी संतति नष्ट होईल कीं काय? या संशयानें तिनें पुनः हरिबावांचे चरण धरून प्राप्त जाहलेला संशय निवेदन केला. बावा संतोषानें बोलतात,अगे, त्याचे पालनकर्त्याचे मनीं स्ववर्णांत मुलास मिळवून घ्यावें असें जरी वाटेल तरी तो माझा विघ्नहर गजानन त्याच्या तशा बुद्धीचें खंडन करून तुझा मुलगा ब्राह्मणवर्णांतच पुत्रपौत्रादिसंततिसंपत्तियुक्त ठेवील. तर आतां कोणताही संशय न धरितां तूं देशावर जावें. अशी आज्ञा होतांच तिनें पुनः आपलें दर्शन व्हावें ही प्रार्थना केल्यावर कांहीं वर्षांनीं आह्मी देशावर येणार आहों त्यावेळीं भेट होईल. हें ऐकून ती बाई नमन करून पुत्रासह देशावर जाण्यास निघाली. ती हळूहळू मुलासह मार्ग क्रमितां कांहीं दिवसांनीं घाटावर येऊन पोहोंचली. आणि कापशीनजीक एक कोसावर आली तों त्यावेळीं सूर्यसंतापानें व मार्गसंचारानें मुलगा बहुत श्रांत झाल्यामुळें विश्रांतीकरितां एका झाडाखालीं बसली. इतक्यांत त्या कापशी गांवचा अधिपति संताजीराव घोरपडे या नांवाचा नित्यक्रमाप्रमाणें शिकार करितां करितां अतिशय श्रमून विश्रांतीकरितां त्याच झाडाखालीं छायेस आला. त्यानें त्या मुलाचें दारिद्र्य व अल्प वयांत प्रवास व स्वरूपसंपत्ति पाहून त्यास दया आली आणि त्यानें बाईस विचारिलें कीं, हा मुलगा कोणाचा व ह्याचें इकडे येण्याचें कारण काय? इत्यादि प्रश्न ऐकून तिनें त्यास सविस्तर पूर्ववर्तमान सांगून त्यास ह्मणाली कीं,या मुलास कापशीचे राजाकडे घेऊन जावें ह्मणून कोणीं तपस्वी सिद्धानें सांगितल्यावरून येथपर्यंत मुलास आणिलें. आतां त्या राजाची गांठ कशी पडेल? रस्ता कोण दाखवील ? अशी चिंता पडली आहे. तें ऐकून संताजीरावास त्या बाईची विशेषच दया येऊन ते ह्मणाले, बाई, तुह्मीं

माझे घोड्याचे पाठीमागून यावें, ह्मणजे गांव व राजवाडा दृष्टीस पडेल. असें बोलून ते निघाले व त्यांच्या मागें मुलासह ती बाई गेली. पुढें संताजीराव घरीं जातेवेळीं चौकीवाल्यास मुलास व बाईस आंत सोडण्यास सांगून ते आंत गेले तों हळूहळू मुलाचे चालीनें राजवाड्याजवळ मुलासह बाई पोंचली व तिला चौकीवाल्यांनीं आंत जाण्यास सांगितल्यावरून ती राजवाड्यांत गेल्यावर संताजीरावांनीं त्यांची राहण्याची व अन्नवस्त्राची सोय करून दिली. यामुळें वेळोवेळीं त्यांस अन्नपाणी मिळून पुढें तो मुलगा उत्तरोत्तर शरीरानें, बुद्धीनें व स्वरूपानें आणि लहान वय असून बोलण्याचे चातुर्यानें संताजीस फारच आवडूं लागला. संताजीस औरस संतति त्यावेळीं नव्हती व पुत्राची अपेक्षा फार असल्यामुळें उत्तरोत्तर त्या मुलास, नारायणा आमचे बरोबर चल ह्मणून, आपले बरोबर हिंडवीत. कदाचित् आपले पोषाकाप्रमाणें त्यास पोषाक देऊन शोभवीत असे. अनेक प्रकारें त्या अनाथ पुत्राचें पालन चालू ठेवून कांहीं ब्राह्मणांस व क्षत्रियांस इष्ट अशा विद्याही त्यास शिकविल्यामुळें तो पदरचे लोकांत कांहीं वर्षांनीं मान्य जाहला. पुढें त्याचा संताजीरावानीं विवाह केला. आणि आपले कोल्हापूरकर महाराजसरकारचे सेनापतीचें कामही प्रसंगवशात् त्याजकडून घेऊं लागले. पुढें कांहीं दिवसांनीं संताजीरावास औरस संतति झाली. तरी त्या नारायणावर जें पुत्रवत् प्रेम वाढलें त्यांत कांहीं कमी न होतां उत्तरोत्तर जास्तच वाढूं लागल्यामुळें संताजीरावाच्या बायका व इतर संबंधी लोक यांच्या मनांत नारायणरावाविषयीं द्वेषबुद्धि वागूं लागली. कारण, नारायणराव हा संताजीरावाचे पुत्राप्रमाणें सर्व अधिकार चालवी आणि त्यास संताजीराव अनुमोदन देई, त्या योगें त्या स्त्रियांस बहुत वाईट वाटून त्या पतीस अनेक प्रकारें त्याचे दुर्गुण कळवीत. पण तो ह्मणे तें आमचें पोर; पोरबुद्धि, एखादे वेळीं तसें गैर करीत असेल, असें ह्मणून तें सर्व सांगणें व्यर्थ करीत. याप्रमाणें अनेक वेळ झालें, यामुळें त्या स्त्रियांस विशेषच द्वेषबुद्धि वागूं लागली. पुढें एके दिवशीं संताजीराव नित्याप्रमाणें ना-

[stamp]

रायणास घेऊन शिकारीस गेले. तेथें शिकार करितांना फार श्रम होऊन वेळही बराच लागला, तथापि शिकार घेऊनच घरीं आले; तों बाईसाहेबांकडून रोज नियमाप्रमाणें कांहीं खाऊन पाणी पिण्यास आंत येण्याची सूचना आली, तों लगेच उठून आंत गेले. त्यावेळीं बाई मोठ्या प्रेमभावाचे रूपानें विनंति करूं लागली कीं, आपले बरोबर नारायणही होता व त्यासही श्रम बहुत झाले असतीलच. तर त्या-सह भोजन झालें ह्मणजे आपणांस व तसें मलाही फार बरें वाटेल. ही विनंति मान्य करून नारायणास हाक मारून जवळ घेतला आणि ह्मणतात, तुला फार श्रम झाले, तर कांहीं मजबरोबर खावें. असें ह्मणून आपले ताटांतच बसविलें, तों बाईसाहेबांनीं स्वतः ताटांत खिचडी, तूप, रोटी, मास, वगैरे आणून वाढिलें. नंतर संताजीरावांनीं अंगरख्याच्या अस्तन्या वर सारून खिचडींत हात घातला आणि त्या-प्रमाणें नारायणासही आपले ताटांत हात घालून खाण्यास सांगतांच तोही अस्तन्या वर करून खिचडींत हात घालून ग्रास घेणार तों संताजीरावाचे मनांत अकस्मात् महाभय उत्पन्न होऊन नारायणाचा उजवा हात धरून स्खलितस्खलित शब्दानें ईश्वराची विनंति करितात कीं, हे परमेश्वरा, आज ब्राह्मणास शूद्रान्न भक्षण करविल्याचा दोष मजकडून होऊन त्यायोगें मला काय दुःख भोगावें लागणार होतें तें न जाणो. तर आतां मी तुझे पायांस शरण आलों आहें. करितां यानंतर मला केव्हांही अशी दुर्बुद्धि देऊं नको. अशी विनंति करीत नेत्रांतून अश्रु गाळिले. ते नारायणानें पाहून त्यास पश्चात्ताप होऊन तो खिन्न झाला. हें ह्या बाईसाहेबांनीं पाहून त्याही आपल्या-कडून आज दुष्कर्म होणार होतें असें मनांत आणून आपला धिक्कार करूं लागल्या. नंतर तो भोजनप्रसंग सर्वांनीं टाळिला. उपरांत सं-ताजीराव व त्यांची स्त्री नारायणाशीं मोठ्या प्रेमानें भाषणें करितात, हे नारायणा, तूं आमची आज्ञा भंग न करितां पुत्राप्रमाणें आमचे ताटांत भोजनास आलास, तस्मात् तूं आमचा वडील पुत्र होस. असें बोलून मोठे प्रेमानें उभयतांनीं त्यास आलिंगन देऊन निरोप दिला व

तोही पुत्रवत् वंदन करून निघाला आणि घरीं येऊन मातुश्रीस वंदन करून सर्व झालेला वृत्तांत सांगितला. तों तिनें पूर्वी हरिभटबावांनीं दया करून व्रतबंधकाळाचे वेळीं आशीर्वाद दिल्याचें स्मरण देऊन ह्मणते, नारायणा, आज आलेला प्रसंग येईलच हें समजून ते गजानन-महाभक्त हरिबावा पटवर्धन यांस शरण जातां त्यांनीं दया करून वर दिला कीं, माझा प्रभु विघ्नहर गजानन तुझे पुत्राचीं सर्व विघ्नें दूर करून त्यास आपले ब्राह्मणवर्णांतच ठेवील, तें आज प्रत्ययास आलें. हें ऐकतांच नारायणराव वारंवार हरिभटबावांचें स्तवन करून दर्शनेच्छेनें सदा मातुश्रीस ह्मणे कीं, ते सत्पुरुष स्वच्छंदानें वागणार, प्रारब्धानें दर्शन होईल तो सुदिन. असा मातापुत्रांचा विचार होऊन नित्योद्योग करूं लागले. पुढें नारायणरावावर संताजीराव व त्यांची स्त्री या उभयतांचेंही निरर्गल प्रेम वाढूं लागल्यामुळें त्या नारायणरावास करवीर सरकारचे दरबारांत बहुत मान्यता प्राप्त झाली.

---

## भाग ४ था.

---

आतां इकडे हरिबावांनीं जोशीणबाईस पुत्रासह देशावर जाण्यास सांगून आपणही सर्व शिष्यमंडळीसह ग्रामांतर करण्यास निघाले तो ज्या ज्या गांवीं जावें तेथील विद्वज्जन त्यांस कांहीं दिवस ठेऊन घेऊन योग्य पूजन सत्कार करून पाठवणी करीत. याप्रमाणें मार्ग क्रमण करीत असतां बरोबर असलेल्या शिष्यांपैकीं मुख्य शिष्य सुमारें ८।१० होते, त्यांचीं नांवें व उपनांवें—रामभट वाटवे; सखंभट जोशी ज्यांचे वंशास पुढें सखदेव ह्मणूं लागले व त्यांचे वंशीयांस पुढें गोविंद हरीनीं आपले दौलतींत सरदार केलें व कांहीं वंशीयांस रामचंद्र हरीनीं आपले संस्थानचे पोतनीस केले, ते;व कृष्णंभट जोशी वरवडेकर यांचे वंशिकांस पुढें उतूरकर हें उपनांव मिळालें व त्यांतील विष्णुपंत उतूरकर यांस गोविंद हरीनीं आपले संस्थानचे पोतनीस करून मुख्य कारभारी केलें

[stamp]

ते व लिमये पुढें ज्यांचे वंशिकांस श्रीमंत पेशवे सरकारांनीं खासगी काम दिल्यामुळें खासगीवाले हें उपनांव ज्यांस मिळालें,ते;व काळे ज्यांचे वंशिकांस पुढें रामचंद्र हरानीं आपले संस्थानचे फडणीस केलें, ते; व गोखले ज्यांचे वंशिकांस पुढें भास्कर हरीनीं आपले स्वारांवरील मुख्य सरदार केलें, ते; व खाडीलकर व फडके इत्यादि. यांतील काळे या उपनांवाचे जे शिष्य बरोबर होते त्यांचे गांवीं जातांच हरिबावा आल्याचें तेथील शिष्यजनांस समजतांच ते सामोरे येऊन तपस्व्याची संगति घडावी या बुद्धीनें त्यांनीं त्यांस ठेवून घेतलें. तों काळे यांचे मनांतून आपली कन्या हरिबावांचे ज्येष्ठ पुत्र कृष्णंभटजी यांस द्यावी असें येऊन हरिबावांस वारंवार विनंति करीत. यामुळें तें त्यांनीं मान्य करून कोतवडें येथील बंधुवर्गास सहकुटुंब आणवून सुमुहूर्तावर विवाहोत्साह आरंभिला. तेव्हां आपले कोतवडेंकर वझे उपाध्यायांसही लग्नाकरितां आमंत्रण दिलें असूनही ते आले नाहींत, करितां पुढें रामभटजी दांडेकर ( ज्यांस पुढें वाटवे हें उपनांव मिळालें ते ) बरोबर असून पुरोहित शद्धार्थाप्रमाणें वागत असल्यामुळें त्यांसच आपले पुरोहित असें हरिबावांनीं मानून कार्य केलें, आणि पुढें बंधूंस व पुत्रांसही त्याप्रमाणें वागण्यास आज्ञा केली; ती त्यांणीं मान्य करून कोतवडें मुक्कामाखेरीजचे स्थळीं त्या रामभटजींस आपले उपाध्येपणाची वृत्ति देऊं लागले. हीच वहिवाट अद्यापपर्यंत चालू आहे. पुढें हरिबावा कांहीं दिवस तेथें राहून बंधुवर्गासह ग्रामांतर करितां करितां सखभट जोशी यांचे गांवीं गेले, तों त्यांणीं आपली कन्या हरिभटबावांचे द्वितीय पुत्र बाळंभट हा विद्वान सुशील असा पाहून त्यांस द्यावी या हेतूनें पुनः पुनः विनयपूर्वक हरिबावांची प्रार्थना केली, ती त्यांणीं मान्य करून सुमहूर्तावर विवाहोत्सव अत्यानंदानें समाप्त झाल्यावर तेथील लोकांचे आग्रहास्तव कांहीं दिवस तेथें राहणें भाग पडल्यामुळें भोंवतालच्या गांवांतील लोकांनीं हरिभटबावा पटवर्धन मोठे तपस्वी भूतभविष्य कथन करून अनेकांस प्रचीती दाखविलेली ऐकून ते लोक बहुत प्रेमानें सहकुटुंब दर्शनास येऊन हरिबावांचे व तत्पुत्र-

कलत्रांचें सदाचरण पाहून बहुत आश्चर्य करीत. कितीएकांस तर असें वाटे कीं, हरिभटबावांची संगति सदा असावी, म्हणजे त्याच्या संगतीनें आम्हांसही श्रीगजानन भजनपूजनानें असी सिद्धावस्था प्राप्त होईल. तसेंच कितीएकांस असेंही वाटें कीं, भटजींचे पुत्रांस कन्यादानादि देऊन भटजींचा संतोष करावा, म्हणजे त्यांतच आपलें हित आहे. या बुद्धीनें आपापल्या गांवीं नेऊन विवाह करून पाठवणी करीत. याप्रमाणें चार पुत्रांचेही विवाह झाल्यावर पांचवा रामचंद्र हरि यास पूर्वींचे शिष्यवर्गांतील लिमये भटजींनीं आपली कन्या विवाह करून दिली आणि सहावा भास्कर याचा विवाह होण्याचा असून हरिबावा पुढें तीर्थयात्रेस निघाले, तों जातां जातां राजापूरचे गंगेवर गेले. तेथें पूर्वीं हरिबावा गेले होतेच, यामुळें हरिबावांची सिद्धाई सर्वांस माहीत होती, ह्मणून अनेक लोक दर्शनास येत; व सातारा, पुणें, वगैरे देशांवरील गंगास्नानास आलेले लोकही हरिबावांचें महत्व श्रवण करून दर्शनास येत. त्यांत कांहीं छत्रपति शाहूमहाराज व कांहीं अक्कलकोटकर महाराज, यांच्या पदरचे जे मुख्य मुत्सद्दी लोक होते त्यांनीं हरिबावांस पाहून संतुष्ट होत्साते ते लोक अनेक वस्तु अर्पण करून विनीत करीत कीं, महाराज, आपली सत्कीर्ति सातारा मुक्कामीं ऐकिली होती कीं, कोणी पटवर्धन कुळांत हरिबावा या नांवानें श्रीगजाननाचे पूर्ण भक्त अवतरले आहेत, व ते शरणागत आलेल्यांचे कष्ट तात्काळ दूर करितात व त्यांनीं अनेकांस सदुपदेश करून सन्मार्गास लाविलें; आणि ते शिष्यपुत्रकलत्रांसह तीर्थक्षेत्रादि यात्रा करीत श्रीगणेशसेवनानें कालक्रमणा करितात; इत्यादि जे जे सद्गुण श्रवण केले होते, त्यांपेक्षां प्रत्यक्ष दर्शन होतां जास्तच पाहण्यांत आल्यामुळें आह्मी या दर्शनाचा श्रीगणेशदर्शनलाभ मानितों. अशा पुण्य पुरुषाचें दर्शन महामंगलप्रद; ह्याकरितां आमच्याद्वारें आपलें दर्शन आमचे यजमान स्वामी फत्तेसिंग महाराज अक्कलकोटकर यांस झालें तर आह्मी यजमानांचें बहुहिताचें कार्य केलेंसें होऊन ते संतुष्ट होतील; आणि आज माझ्या सेवकांनीं माझ्या घरीं श्रीगणपतीच आणिला, असा आनंद मानितील. तर दया

करून आपण साताऱ्यापर्यंत तरी येण्याचें करावें, असी विनंति केली. परंतु रुकार मिळाला नाहीं ह्मणून खिन्न होत्साते विचार करितात कीं, अशा सत्पुरुषाचें जरी येणें झालें नाहीं तरी नाहीं,पण त्याच्या चिरंजीवांपैकीं जरी कोणी यजमानाकडे येईल तरी तद्द्वारा हरिभटजींची पूजा केल्यासारखें महाराजांस समाधान होईल. असें मनांत आणून त्याप्रमाणें पुनः विनंति केली. मग हरिबावांनीं पुढें भविष्यकालांत होणारें ध्यानांत आणून त्यांस सांगितलें कीं, हा त्रिंबक आपल्या यजमानाचे संग्रहीं असल्यास मी अंशेंकरून तेथें आहेंच असें समजावें. असें बोलून सर्वांस निरोप दिला आणि त्रिंबकास बोलावून सांगितलें कीं, मी थोड्या दिवसांत फिरत फिरत कापशी येथें जाणार आहे, तेथें तूं मला भेट. हें सांगून त्यास बरोबर जाण्यास आज्ञा दिली. हा त्रिंबक पुढें कापशीकर सेनापतीच्या संबंधानें फत्तेसिंग महाराजांस विशेष प्रेमास्पद झाला, नंतर त्यांच्या पदरचे सरदारपंक्तींत मान्य होऊन पुढें श्रीमंत पेशवेसरकारचे आश्रयानें बहुतच मान्य झाल्याचें प्रसिद्ध आहे. पुढें हरिबावांनीं आपले कनिष्ठ बंधु विठ्ठलभट व केशवभट यांच्या पुत्रांचे विवाह झाल्याचें पाहून केशवभटजींचे ज्येष्ठ पुत्र शिवबा यांस बोलावून सांगितलें कीं, तुला द्रव्यादि सुखाची इच्छा असल्यास तूं देशावर जमखंडी या नांवाचे गांवीं जाऊन तेथील अधिकारी यांस भेट, ह्मणजे तुला अभीष्टलाभ होईल. असें सांगून त्याला देशावर पाठविलें. नंतर हरिबावांचे शिष्यवर्गांत गोखले ह्मणून वर्णन केलेले जे महादेव कृष्ण या नांवाचे होते, त्यांच्या मनांतून आपली कन्या हरिबावांचे कनिष्ठ पुत्र भास्कर यांस द्यावी असें आलें व त्यांणीं त्याप्रमाणें विनंति केली. ती हरिबावांनीं मान्य करितांच सुमुहूर्तावर मोठ्या समारंभानें गोखल्यांच्या कन्येशीं भास्कराचा विवाह झाला. पुढें कांहीं दिवस तेथें राहून दर्शनास आलेल्या जनांस निरोप देऊन आपण सहकुटुंब देशावर जाण्यास निघाले, ते कांहीं दिवसांनीं देशावर अजरें नजीक उतूर या नांवचें एक खेडगांव आहे तेथें त्यांचे शिष्यवर्गांतील कृष्णंभट जोशी वरवडेकर रहात असत, त्यांचे आग्रहास्तव हरि-

बाबा तेथें राहिले.

पुढें हरिबाबा उत्तुरास आलेले आसमंतात् गांवचे लोकांनीं व कापशीकर सेनापती वगैरे ह्यांनीं श्रवण करून ते आपापले गांवीं यावेत या हेतूनें कांहीं फलादि घेऊन दर्शनास येऊन आपापले अभीष्टलाभानें तृप्त होऊन मोठ्या आनंदानें पुन: पुन: दर्शन व्हावें असी मागणी करून आपले गांवीं जात. असें चालू असतां कापशीकरांचें सप्रेम आवाहन होत आहे हें समजून सर्व मंडळीसह कापशीस जाण्याकरितां निघाले, तों थोडेच दिवसांत त्या गांवीं पोंहोचले. इकडे ते आले हें नारायणराव जोशी यांनीं श्रवण करितांच मातोश्री व पत्नीसह सामोरें जाऊन सर्वांनीं चरणावर मस्तक ठेऊन ते विनयानें विनंति करितात कीं, महाराज, आपले प्रसादें आह्मी या सुखास पात्र झालों. असें बोलून हरिबावांस आपले घरीं घेऊन गेल्यावर संताजीराव आपले कुटुंबासह दर्शनास येऊन हरिबावांस पाहतां अशा सत्पुरुषाचें सदा दर्शन असावें असें मनीं आणून हरिबावांस कापशींत राहण्याबद्दल बहुत प्रेमाचीं भाषणें करून ही इच्छा नारायणरावास सुचवितां नारायणराव विनंति करितात कीं, हे बावा बहुधा भिक्षेनें निर्वाह करितात व एकेच ठिकाणीं बहुतकाळ राहात नाहींत; पण आतां कांहीं वृद्धावस्था प्राप्त झाली आहे, करितां कांहीं दिवस योग्य कारण दाखवून राहण्याविषयीं आग्रह केल्यास राहिले तर राहतील. असें कळवितां संताजीरावांस विस्मय वाटून या वागणुकीचा स्तव करून त्यांचे मर्जीप्रमाणें अन्नाच्छादन आणि राहण्याची सोय करण्याविषयीं नारायणरावांस सांगून आपण निरोप घेऊन राजवाड्यांत गेले. नंतर नारायणरावांनीं सर्वांस अन्नवस्त्र व राहण्यास जागा यथायोग्य देऊन आपण नित्यकर्म करण्यास गेले. याप्रमाणें कांहीं दिवस सर्वांनीं आपापलीं षट्कर्मे करून काल क्रमीत असतां नारायणराव पुन: पुन: हरिबावांचे दर्शनास येऊन आपलें वृत्त कळवून दया असावी ही प्रार्थना करीत. पण त्यांची पत्नी व मातोश्री हरिबावांस अनेक प्रकारें संतोष उत्पन्न करून नारायणरावांस पुत्रसंततिलाभाविषयीं

प्रार्थना करीत. असे कांहीं दिवस जातां हरिबावा आपल्या उपास्य-देवतेची आराधना करून समाधान चित्तानें बसलेली बातमी नारायणरावांस कळतांच नारायणराव दर्शनास येऊन आपल्यास पुत्रलाभ व्हावा, हा मनीं हेतु ठेवून अनेक प्रकारचे हरिबावांस इष्ट असे पदार्थ अर्पण करून म्लानवदन बसल्याचें हरिबावांनीं पाहून त्यांचे मनांतील हेतु ध्यानांत आणून बावा बोलतात, अहो नारायणराव, तुमचे मनांत आपल्यास पुत्र व्हावा अशी आशा असल्यास ती आशापूरक जो गणेश त्याचे सेवन करावें, ह्मणजे तो ती आशा तृप्त करील. ही आशीर्वचनरूप वाणी श्रवण करितांच नारायणराव पुत्रलाभ झाला असाच मनीं संतोष धरून विनंति करितात कीं, कोणते प्रकारें सेवन करावें ही आज्ञा व्हावी. असें ह्मणतांच हरिबावा सांगतात कीं, तुमचें वंध्यत्वजनक जन्मांतरीय कर्म दूर करण्यास व्यंकटेशरूप जो गणेश याचे गिरीवर जाऊन सेवन कराल तर तो कर्मदोष दूर करून पुत्र देईल. हें श्रवण करून नारायणराव मनीं विचार करितात कीं, हे महाप्रयाससाध्य सेवन मला कसें साधेल? मी सेनापतीसाहेबांचा सदा सेवक, त्यांतून सुटका होऊन व्यंकटेशसेवन कसें होईल? ह्या चिंतनांत मग्न झाल्यानें म्लानवदन होऊन स्तब्ध राहिलेले हरिबावांनीं पाहून त्याचे मनांतील सर्व समजून सांगितलें कीं, तुह्मांस स्वतः जाऊन सेवा होत नसल्यास पत्नीद्वारा सेवन करावें. असी आज्ञा होतांच ती मान्य करून ते विनंति करितात कीं, महाराज, ती सेवापद्धति स्त्रीजनांस ज्ञानांत कशी येईल व आपले साह्याखेरीज हें श्रीसेवन आह्मांस कसें घडणार? ह्याकरितां आपण माझे कल्याणाविषयीं दक्षता ठेवलीच आहे. ही त्यांची विनंति श्रवण करून हरिबावा मनीं विचार करितात कीं, मीं केल्या उपकाराचें स्मरण यास आहे, अर्थात् हा उत्तम स्वभावाचा असल्यामुळें त्याच्या कल्याणार्थ आपणाकडून प्रयत्न झाला पाहिजे. हें चिंतन करून, नारायणरावांनीं सांगितलें तें सर्व मान्य करून त्यांचे कुटुंबास घेऊन आपण स्वतः गिरीस निघाले. व कांहीं दिवसांनीं गिरीस पोंहोचल्यावर सुमुहूर्तावर त्या बाईस कांहीं

श्रीव्यंकटेशसेवापद्धति सांगून सेवेसीं बसविली, आणि आपण नित्
कर्म करून स्थिर चित्तानें त्या व्यंकटेशमूर्तीवर लक्ष ठेवून स्तव
करीत. याप्रमाणें कांहीं दिवस गेले, तथापि साक्षात्कार नसल्यामुळे
उद्विग्नचित्त होऊन, कार्य न होण्यास कारण शोधितात कीं, माझ
आहार आचार तसा नसल्यामुळे प्रभुदयेस मी पात्र होत नाहीं काय
किंवा तसा मी भक्त नाहीं काय? किंवा माझ्या तोंडांतून तसे स्तवन
शब्द निघत नसतील काय? तर मी जडबुद्धि, ज्या प्रभूचे गुण वर्ण
करण्यास वेदही कुंठित झाले त्याचें स्तवन मी काय करीन? तथा
बाळाचे बोबडे बोलास पिता संतुष्ट, त्याप्रमाणें माझे बोल प्रभूनें मानावे
हीच प्रार्थना आहे. असें म्हणत असतां भक्त्यतिशयाचा हुंदक
येऊन ईश्वराचें रूप अवलोकन करीत असतां अकस्मात् कांहीं जागृ
कांहीं स्वप्नांत अशी अवस्था प्राप्त होऊन त्यांत श्रीव्यंकटेश प्रग
होऊन वरदहस्त हरिबावांचे मस्तकीं ठेवून बोलतात, तुझे भक्तीस्तव
संतुष्ट झालों;तर तुला ऐहिक सुख प्राप्त होऊन अंतीं स्वानंदवास होई
येथें पुत्रलाभार्थ आलास तर त्या बाईस हें भक्षणास दे म्हणजे पुत्र होई
असें बोलून कांहीं वस्तु हरिबावांचे हातावर ठेविली आणि गुप्त झाले
हें स्वप्न पाहून हरिबावाही जागृत होऊन हाताकडे पाहतात तों हात
वर कांहीं अपूर्व वस्तु आहे, हें ज्ञान होतांच स्वप्नांत झालेल्या लाभा
आठवून विस्मययुक्त होत्साते स्तवन करितात कीं, हे दीनदयाळ
काय तुझें वात्सल्य वर्णन करूं? अज्ञ मी, सेवाधर्म न समजणारा, तथा
बहुत वर्षें सेवन करणाऱ्यांसही दुर्मिळ जो स्वानंदवास तो या जन्म
मरणदुःखानें ग्रस्त झालेल्या हरीस देऊन सुखी केलेंस. काय तुझी
कारुणिकता हे प्रभो! इत्यादि स्तवन करून मोठ्या आनंदानें बिऱ्हा
जाऊन त्या बाईसाहेबांस मिळालेला प्रसाद अर्पण करून, तुह्मी आप
यजमानास हा प्रसाद दाखवून त्यांचे आज्ञेनें भक्षण करावा ह्मण
तुह्मांस पुत्र होईल. असें श्रवण करितांच ती हरिबावांचे पायांवर मस्त
ठेऊन विनंति करिते कीं, महाराज, मी हा आपलाच प्रसाद मान
आपण मज वंध्येला आजच पुत्रवती केली हें मी समजतें. इत्यादि बोलून

त्यादरानें प्रसाद घेऊन संग्रहास केल्यावर महदुत्सवानें श्रीव्यंकटेशपूजन ब्राह्मणभोजनादि सांगता करून निरोप घेऊन परत निघाले.त्यावेळीं तेथें असणारे सुज्ञ ब्राह्मणांनीं हरिबावा स्वल्प काळांतच परिपूर्णमनोरथ होऊन परत घरीं जातात हें पाहून विनयानें हरिबावांस विनंति करितात कीं,महाराज, आह्मी कोणी दहा, कोणी बारा,कोणी अधिक वर्षें ईश्वरसेवा करीत असतां स्वल्पही ईश्वरकृपेस पात्र झालों नाहीं तर सध्या कृपा होणेंविषयीं आपला अनुग्रह झाला पाहिजे; सेवाधर्म समजावा हीच याचना करणारे अज्ञान असे जे आह्मी त्या आह्मांवर आपण दया करावी. असे अनेक प्रकारें त्या ब्राह्मणांचे सविनय भाषण श्रवण होतांच हरिबावांस दया येऊन त्या प्रत्येकास ऋणधनादि विचारपूर्वक नानातंत्रप्रणीत महामंत्राचा उपदेश देऊन अनुष्ठानपद्धति सांगून प्रभुसेवेस सर्वांना लावून आपण परत निघाले. तों पुढें कांहीं दिवसांनीं ते उपदेश देऊन अनुष्ठानास बसविलेले ब्राह्मण शिष्य कुरुंदवाड मुक्कामीं हरिबावांचे दर्शनास येत असत, हें वृद्ध वृद्धांपासून ऐकिवांत आहे. पुढें हरिबावा सर्व मंडळीसह परत कापशीस निघाले, तों थोडेच दिवसांत कापशी-नजीक आले. तें नारायणराव वगैरेंनीं श्रवण करून सामोरे येऊन समारंभानें घरीं घेऊन गेल्यावर हरिबावांचे मुखें तेथें गिरीवर केलेला अनुष्ठानप्रकार व वर ऐकून आणि भक्षणास मिळालेला प्रसाद पाहून सर्वांचे ठायीं हरिबावांविषयीं बहुत बहुत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. ती असी कीं, या कलियुगांत वर्तमान काळीं हरिबावांप्रमाणें ईश्वराराधनेंकरून सिद्धावस्थेंत मिळालेला योगी कोणी पाहण्यांत किंवा ऐकण्यांत मिळत नाहीं. पहा यांनीं कोंकणांत असतां दूर्वारसपानकरून श्रीगजाननाचें आराधन करितांच श्रीगणरायानें स्वप्नांत दर्शन देऊन अनेक वरदानें केलीं व याप्रमाणेंच गिरीवर स्वप्नांत श्रीव्यंकटेशानेंही दर्शन देऊन प्रसाद भक्षणास दिला.तो आज सर्वांचे दृष्टीस पडत आहे. हें काय हो महत्व ! सजातीयत्वास्तव मनुष्यांमध्यें जसी एखादी वस्तु परस्पर अर्पण करितात, तसें ह्या हरिभटबावांशीं श्री व्यंकटेशाचा व्यवहार झाला. तर या हरिभटबावांस देवाप्रमाणेंच मानिलें पाहिजे,

असें अनेक लोक बोलत बोलत वंदन करूं लागले. नंतर सुमुहूर्तावर नारायणरावांचे आज्ञेवरून त्यांचे पत्नीनें श्रीव्यंकटेशप्रसाद भक्षण केल्यानंतर थोडयाच दिवसांत गर्भधारणा झाल्याचें चिन्ह स्पष्ट ज्ञानांत आल्यावर डोहाळेभोजनाचा समारंभ वेळोंवेळीं होत असे. पुढें नवमास पूर्ण होतांच दहावे मासीं प्रसूत होऊन पुत्रजन्म झाल्यानंतर श्रीव्यंकटेशप्रसादें पुत्र झाल्याकारणानें व्यंकटेशाचेंच नामकरण करावें, असें हरिभटबावांनीं सांगितल्यावरून तेंच नांव ठेविलें. पुढें उत्तरोत्तर नारायणराव संतति संपत्तीनें वाढत असून हरिबावांवर मोठें प्रेम ठेविते झाले.

---

## भाग ५ वा.

पुढें त्रिंबक हरी हे, अक्कलकोटकर महाराजांचे आश्रयास असून हरिभटबावांचे दर्शनास कापशीस वारंवार येत असत, त्यायोगें नारायणराव व संताजीराव यांचा विशेष परिचय झाला. तेव्हां त्रिंबक हरीनें त्या उभयतांस नरसिंहवाडीनजीक कुरुंदवाड येथें सहकुटुंब हरिभटजींचे मनांतून राहण्याचा असलेला हेतु कळविला. नंतर त्या उभयतांनीं कुरुंदवाड हा गांव हरिभटबावांकडे देऊन ते त्यांचा योगक्षेम चालविण्याकडे विशेष लक्ष पुरवीत असत, असें पूर्वींचे वृद्ध पुरुषाच्या मुखांतून श्रवण केल्याचें मला आठवतें. परंतु एक मृत लेख वाचनांत आला त्याचा अभिप्राय असा कीं, कुरुंदवाड हा गांव करवीरकर महाराजांकडून हरिभटबावा यांचे नांवें पूर्वींपासून चालत होता, तो पुढें रघुनाथराव व शिवराव नीळकंठ यांनीं आपले नांवें इनाम करून घेतला. दुसरें शके १७०६ क्रोधीनामसंवत्सरे कार्तिक शुद्ध १९ दिवशीं कुरुंदवाडकर यांजकडून असें समजण्यांत आलें कीं, कापशीकरांनीं त्रिंबक हरीपासून कर्ज घेतलें. त्याचे फेडीस त्यांनीं शके १६१८ त कुरुंदवाड हा गांव लावून दिला. आणि कुरुंदवाडचा मोकासाही त्रिंबक हरीस सांगितला. पुढें शके १६५९ त कुरुंदवाडापैकीं चाहूर जमीन इनाम मिळाली. नंतर सर्व गांव

इनाम मिळाला. असो. अशा प्रकारें संपादन केलेल्या कुरुंदवाडामध्यें राहण्याजोगा वाडा बांधून तेथें त्रिंबक हरींनीं आपले वडील हरिभटबावा व बंधुवर्ग व त्यांची शिष्य मंडळी आणि उत्तूरकर सखदेव गोखले वगैरे यांस सहकुटुंब तेथें ठेविलें. नंतर तें कुरुंदवाड हरिबावांचे कुटुंबास देशावरील राहण्याचें मुख्य ठिकाण झालें. पुढें हरिबावा तेथें राहून प्रति दिवशीं नरसिंहवाडीस श्रीगुरुदर्शनास जात असत. परंतु पर्जन्यकाळीं कृष्णा व पंचगंगा नद्यांस पूर आल्यानें त्यांस श्रीगुरुदर्शन दुर्मिळ होई,ह्मणून त्यांनीं भास्कर हरींकडून कुरुंदवाडींच श्रीगुरुपादुका स्थापन करवून त्यांचें यथाविधि पूजन कधीं भास्करहरींकडून,कधीं इतर ब्राह्मणद्वारा, कधीं आपण स्वतःही करीत.असो कुरुंदवाडीं हरिबावा राहिल्यावर त्यांचे बंधु विठ्ठलभट व केशवभट हेही आपापल्या कुटुंबासह तेथें राहिले. तेव्हां केशवभटजी यांचा वडील पुत्र शिवबा आपा यास हरिभटबावांनीं पूर्वींच,तूं जमखंडीकडे जा म्हणजे तुला द्रव्यलाभ होईल म्हणून सांगितलें होतें, त्याप्रमाणें तो जमखंडीस गेल्यावर तेथील देसाई यांनीं त्यास पाहून हा मनुष्य सशक्त व बुद्धिमान आहे, असें समजून आपलेपाशीं ठेवून घेऊन त्यांनीं त्यास आपले सेनेवरचे अधिकारी केलें. नंतर त्यांनीं आपल्या शौर्यानें जमखंडी सभोंवारचे सर्व गांवीं आपला अंमल बसविला, यामुळें देसाई यांची संपत्ति वाढली. हें त्यांनीं जाणून शिवबाआपास बहु मान देऊन इनाम जमिनीही दिल्या.त्या अद्यापपर्यंत त्यांचे वारसांकडे चालत आहेत. पुढें शिवबाआपा आपले वडिलांकडे कुरुंदवाडास जात येत असत,नंतर कांहीं वर्षांनीं त्यांनीं श्रीमंत पेशवे सरकारचा आश्रय मिळविला त्यायोगें त्यांस सरदार हा शब्द मिळाला. परंतु त्यांस सरदारीचें सुख बहुतकाळ मिळालें नाहीं ते थोड्याच दिवसांत मृत्यु पावले. पुढें कांहीं वर्षांनीं गोविंद हरींस श्रीमंतांची नोकरी मिळून त्यांचे नांवें बेहेडा झाला;त्यावेळीं त्यांनीं शिवबा आपाचे कुटुंबास सरकारांतून दरसाल बाराशें रुपये ठरवून घेतले. पुढें अखेरीस चिंतामणराव पांडुरंग यांचे नांवें बेहेडा झाला त्यावेळीं त्या कुटुंबाची पुतण्या गणेश विश्वनाथ यांचे नांवें ते रुपये ठरवून घेतले, ते

अद्यापपर्यंत त्यांचे पुत्रपौत्रादि विभागून घेऊन उपभोग करीत आहेत. हरिभटबावा कुरुंदवाडीं राहत असतां त्यांचे कनिष्ठ बंधु केशवभट हे त्यांचे जवळ राहत होते, त्यांस त्यांनीं नारायणराव घोरपडे यांजवळ ठेविल्यावर घोरपडे यांनीं त्यांच्या उपजीविकार्थ इनाम जमिनी देऊन हे हरिबावांचे बंधु या बुद्धीनें ठेवून घेतले,ते बहुत वर्षें तेथें राहिले होते. ते वारल्यावर त्यांचे द्वितीय पुत्र विश्वनाथभट हे तेथें राहत असत. पुढें रामचंद्र हरी यांचे चिरंजीव परशुरामभाऊ यांनीं त्यांस तेथें राहिलेले पाहून हे आमचे उपाध्येपणाचे वृत्तीस अधिकारी होतील या संशयानें विश्वनाथभटजींस तेथून काढून आपले भिलवडी या गांवीं नेऊन ठेविलें व त्यांचे जीविकार्थ इनाम जमिनी व राहण्यास घर बांधून दिले. मग ते सहकुटुंब तेथें राहिल्यानें त्यांस भिलवडीकर पटवर्धन असें ह्मणूं लागले.

विठ्ठलभट हे हरिबावांजवळ कुरुंदवाड मुक्कामीं राहत असत, सबब त्यांस कुरुंदवाडापैकीं कांहीं उत्पन्न चालत आहे. त्यांचा पुत्र अंताजीपंत हा सुशील असल्यामुळें हरिभटबावांचें त्यावर प्रेम असे. त्या सत्पुरुषाचे प्रेमामुळें पुढें गोविंद हरींस पेशवे सरकाराकडून सरंजाम मिळाला त्या बेहेड्यांत त्या अंताजी विठ्ठलाचे नांवें दरसाल तीन हजार रुपये तैनातीस ठरले. यावर त्यांनीं वीरश्रीच्या योगें बहुत सरकारी कामें केल्यामुळें ते मोठे प्रसिद्ध झाले. पुढें त्यांस पांच पुत्र झाले- पैकीं पहिले विठ्ठलराव बाबा, दुसरे यादवराव नाना, तिसरे विष्णुपंत भाऊ, चवथे जनोबा सुभेदार, व पांचवे बळवंतराव. हे पांचही विद्येनें, गुणानें चांगले असून यज्ञादि सत्कर्मेंही करीत. यांस यादवाड या गांवचा अधिकार असून बहुत वर्षें तेथेंच ते राहत असत, ह्मणून त्यांस यादवाडकर पटवर्धन असें ह्मणूं लागले.

हरिभटबावा कुरुंदवाडांतच राहिले असतां त्यांचे मनांतून मल्लूरेश्वराचें दर्शन घ्यावेंसें वाटून ते बरोबर गोविंद हरि, रामचंद्र हरि, व भास्कर हरि असे मुलगे; व शिष्यमंडळी घेऊन यात्रेस निघाले, तों जातां जातां श्रीमंत पंतप्रतिनिधींचे गांवीं रात्रौ वसतीस

राहिल्यावर हरिभटजी पटवर्धन कोतवड्यांत राहणारे ज्यांस कोणी कोणी देवऋषी असेंही ह्मणतात व ज्यानीं नारायणराव जोशी यांस कापशीकर सेनापती यांजकडे जा ह्मणजे तुला त्याचा आश्रय मिळून तुझी सर्व विपत्ति दूर होईल ह्मणून आशीर्वचन दिलें होतें; त्याप्रमाणें त्या नारायणरावांस अनुभवही आला. व पुढें त्यांस संतति नसल्यामुळें आपण गिरीवर जाऊन श्री व्यंकटेशास सेवनानें प्रसन्न करून स्वप्नांत प्रत्यक्ष प्रभूचा प्रसाद मिळालेला तो नारायणरावाचे कुटुंबास दिल्यानें तिला गर्भधारण होऊन ज्या हरिबावांचे प्रसादें पुत्र झाला; ते हरीबावा शिष्यमंडळीसह श्री मयूरेश्वराचे दर्शनास जात असतां मार्गवशात् आज या गांवीं वसतीस आले आहेत, असें दूतमुखें प्रतिनिधींनीं श्रवण करितांच स्वतः प्रतिनिधी महाराज हारिबावांचे दर्शनास येऊन विनंति करितात कीं, महाराज, आज आपल्या दर्शनाचा अलभ्य लाभ झाल्यानें मी कृतकृत्य आहें असें मानतो तर आतां आपण येथें कांहीं दिवस राहून प्रतिदिवशीं दर्शनलाभ द्यावा, ही माझी विनंति आहे. हे शब्द भक्तिपूर्वक निघत आहेत असें समजून स्वल्प दिवस हरिभटबावांस तेथें राहावें लागल्यावर शिष्यमंडळीसह हरिभटबावांस भोजनादि सत्कारें संतुष्ट करीत असतां एके दिवशीं आपले घरीं भोजनास घेऊन गेले. पुढें हरिभटजी स्वस्थचित्तें आसनावर बसले असतां दूर प्रदेशावर कांहीं गलबा होत असून मोठा समुदायही जमलेला पाहून ते प्रतिनिधीस प्रश्न करिते झाले- अहो, तो समुदाय व गलबा काय निमित्तें होत आहे? हें ऐकून प्रतिनिधी कळवितात महाराज, आमचे गांवीं सावकाराचे घरांतील द्रव्य चोरीस गेल्यावरून आमचे कारभाऱ्यांनीं चोरटे लोकांस आणून चौकशी चालविली आहे. आज एक महिना सुमार झाला अद्यापपर्यंत चोर कबूलही होत नाहींत, मग द्रव्यलाभ तर दूरच आहे. हें ऐकून बावा हसून बोलतात, अहो, चोर धरण्यास इतके प्रयास कशाला? असें ह्मणतांच प्रतिनिधींस व त्यांचे कारभाऱ्यांस असें वाटलें कीं, बावांस त्रिकालज्ञता असल्यामुळें हे शब्द त्यांचे मुखांतून निघाले. तस्मात् यांसच याबद्दल विनंति करावी,

असें मनांत आणून ते विनंति करितात कीं, महाराज, दया करून हा अमुक चोर आहे हें समजेल तर चोरी न करणाऱ्यांसही जे आह्मां-कडून कष्ट होत आहेत त्यांतून त्यांस महाराजांनीं मुक्त केलें असें होईल. तर दया करून चोर उमगून द्यावा. अशी अनेकांची विनंति ऐकून हरिबावा ह्मणतात, तुह्मी एक नारळ आणून मजपुढें ठेवा. त्याप्रमाणें त्यांनीं नारळ ठेवितांच सर्व चोरटे लोकांस हरिभटबावांनीं बोलावून त्यांस व इतरांस सांगितलें कीं, मीं येथें हा नारळ दूर ठेवितों, तो घेऊन जो मजपुढें आणून ठेवील तो चोर. हें सर्वांस जाहीर करून सर्व लोकांस बाहेर घालवून तो नारळ अभिमंत्रण करून ठेविल्यावर एकेकास बोलावून नारळ पुढें मागतां जे जे साव होते त्यांनीं त्यांनीं तो नारळ जवळ आणून ठेविला व जे चोर होते त्यांस तो नारळ दिसेना, तेव्हां तितके लोक बावांपुढें साष्टांग नमस्कार घालून मोठ्यानें रुदन करीत, महाराज आह्मी अपराधी आहोंत, क्षमा करावी, अशी प्रार्थना करीत उभराहिलेले प्रतिनिधी व त्यांचे कारभारी वगैरेंनीं पाहून मोठ्या विस्मयानें हरिभटबावांचा स्तव करितात. आणि म्हणतात काय हो ही सिद्धाई! आम्ही महिनाभर चोर धरण्याचा प्रयास करीत असून चोर सांपडले नाहींत, ते बावांनीं एके घटकेंत धरून त्यास कबूल करविलें, तेव्हां आजमित्तीस हरिभटबावांप्रमाणें ईश्वरसाक्षात्कार असणारा कोणी प्राणी दृष्टीस पडत नाहीं. पूर्वी कोणी रामदास व तुकाराम वगैरे अद्भुत कृत्यें करीत असतील तर असोत. असें अनेक प्रकारें बावांचें महत्व वर्णन करीत भोजनादि सर्व सत्कार झाल्यावर पुढचे गांवास जाण्याची हरिभटबावांची तयारी पाहून त्यांस प्रतिनिधींनीं आपल्याजवळ राहण्याकरितां पुष्कळ आग्रह केला, परंतु बावांस धनादि लोभ कमी असल्यामुळें तो व्यर्थ जाहला. पुढें मार्गक्रमण करीत असतां आसपासचे देवांचीं दर्शनें घेत घेत कांहीं दिवसांनीं हरिबावा साताऱ्याचे मुक्कामास आले. यापूर्वी पेशवे व छत्रपतिमहाराज या उभयतांची प्रतिनिधींशीं गांठ पडून, हरिबावा म्हणून कोणी थोर श्रीगणेशभक्त उत्पन्न झाले आहेत; त्यांनीं कोंकणांत व देशावर कापशी वगैरे

ठिकाणीं अद्भुत कृत्यें केलीं व आमचे गांवीं चोर धरण्यांत अद्भुत चमत्कार दाखविला, असें सांगण्यांत आलेंच होतें. यामुळें त्या उभयतांचे मनांत हरिभटबावांचें दर्शन व्हावें हें फार वागत होतें. तों या उभयतांनीं हरिभटबावा सातार मुक्कामींच शिष्यमंडळीसह आले आहेत हें ऐकून पेशवे आपण होऊन हरिबाबांचे दर्शनास आले. तों केवळ पुण्याची राशीच असे हरिभटबावांचें तें शरीर व ती शिष्यमंडळी पाहून, पूर्वी ऐकून संतोष वाटत होता त्यापेक्षां अधिक संतुष्ट होऊन त्यांस असें वाटूं लागलें कीं, ह्या सत्पुरुषाची सदा संगति असावी; पण तसें न झाल्यास त्यांचा कोणी पुत्र किंवा शिष्य तरी संग्रहास मिळाल्यास आह्मांस श्रीगणेशपूजन केलेंसें होणार आहे. असें मनांत आणून बावांस आपले पुणें मुक्कामीं येण्याबद्दल बहुत आग्रह केला. तो बावांनीं मान्य केल्यावर द्रव्यादि पदार्थ बावांपुढें ठेऊन निरोप घेतला. नंतर छत्रपति शाहु महाराजांकडून कोणी मुत्सद्दी येऊन अनेक प्रकारची श्रीगजाननाची नैवेद्यसामग्री व फळाब्ळ पुढें ठेवून विनंति करितात कीं, महाराज छत्रपतींनीं आपल्या सर्व जनानखान्यांतील लोकांस आपलें दर्शन व्हावें अशी विनंति करण्यास मला पाठविलें आहे, तर कृपा करून आपण आल्यास सर्वांस दर्शनलाभ होईल. अशी वारंवार प्रार्थना करीत आहेत हें पाहून हरिबावा राजवाड्यांत जाण्याकरितां निघाले तों वाड्यांत गेल्यावर हरिबावांस छत्रपति वगैरेंनीं वंदन करून उच्च स्थळीं बसवून स्वागतादि प्रश्नपूर्वक अनेक भाषणें झाल्यामुळें महाराजांस हरिभटबावा हे बहुत थोर ईश्वरभक्त आहेत; यांस आपलेकडून कांहीं तरी निरंतर जीविकार्थ जमीन द्यावी, असें वाटून आपले कारभाऱ्यांस ती देण्याविषयीं त्यांनीं आज्ञा केली व तो मजकूर बावांस त्यांनीं कळविला. परंतु हरिबावांनीं राजप्रतिग्राहाविषयीं परांङ्मुखता दर्शविल्यामुळें त्यावेळीं तो प्रकार न होतां बावा निरोप घेऊन यात्रेस गेले. पुढें तेथें त्रिंबक हरी यांस अक्कलकोटकरांचे आश्रयामुळें राजदरबारांत वारंवार जावें लागे. त्यावेळीं तेथील कारभाऱ्यांकडून त्यांस समजलें कीं, छत्रपतीसरकारचे आज्ञेप्रमाणें जमीन घेण्याचें मान्य केलें

पाहिजे. त्यावरून पुढें कांहीं वर्षांनीं त्रिंबकहरींनीं मिरजेनजीक कणगवाड या गांवचे जमिनीपैकीं कृष्णातीरीं जुनी पांढरदेवनहळी म्हणून गांव जेथें पूर्वीं होता, ती पांढरसुद्धां अडीच चाहूर जमीन हरिभटबावांचे नांवें इनाम घेऊन हरिबावांचे वंशिकांकडे यथाविभागें वाटून दिली, व त्या पांढरीवर गांवची वसाहत करून तेथें श्रीगणेशाची स्थापना केली, यामुळें त्या गांवचें नांव गणेशपुर हें ठेविलें. हल्लीं त्या गांवास गणेशवाडी असें ह्मणत असतात. पुढें बावा तिकडील सिद्धटेक, व रांजणगांव, वगैरे गणेशस्थानें पाहून कांहीं दिवसांनीं पुणें मुक्कामीं आले, तें श्रीमंतांनीं ऐकून आपण स्वतः दर्शनास येऊन अत्यादरानें भोजन सामग्री वगैरे पुढें ठेवून ते वारंवार आपल्यासारख्या पुण्य पुरुषाची सदा संगति असावी असी प्रार्थना करीत. असे कांहीं दिवस गेल्यावर पुढें कुरुंदवाडास जाण्याकरितां बावा निघाले. तें पाहून श्रीमंतांनीं त्यांस आपल्याजवळ राहण्याचा आग्रह केला. तों बावांची उत्तरोत्तर वैराग्यवृत्ति वाढत असल्यामुळें तेथें राहणें त्यांनीं मान्य केलें नाहीं. हें पाहून श्रीमंतांनीं मनांत आणिलें कीं, हरिबावांचे चिरंजीव जरी आमचे संग्रहास राहतील तरी आह्मांस निर्विघ्नपणें शत्रूपासून जय मिळणारा आहे. असें मनांत आणून त्यांनीं हरिबावांस विनंति करून चिरंजीवास राहण्याविषयीं परवानगी घेतल्यावर गोविंद हरी व रामचंद्र हरी हे श्रीमंतांजवळ राहिले. त्यांस श्रीमंतांनीं हरिबावांचे पुत्र म्हणून बहुमानानें अन्नवस्त्र देऊन ठेवून घेतलें. पुढें बावांचे दर्शनास श्रीमंतांनीं आपली कन्या पुत्रादि आणून बावांस कन्येकडून नमस्कार करवून, इला चांगला वर मिळावा म्हणून शोध करीत आहोंत परंतु अद्यापपर्यंत इला वर मिळत नाहीं; इचा वर कोठें आहे हें कळावें; म्हणून प्रार्थना करितां स्वल्पकाळ हरिबावा स्वस्थचित्त होऊन सांगतात कीं, इचा नवरा कापशीकर सेनापतींनीं पुत्रबुद्ध्या पालन केलेला नारायणराव जोशी यांस श्रीव्यंकटेश प्रसादानें प्राप्त झालेला पुत्र तो इचा वर आहे. हें श्रवण करितांच सर्वांस संतोष झाला, परंतु हा योग घडून कसा येईल, हा विचार करून हरिबावांस विनंति करितात कीं, महाराज

आपण सांगितलेला वर आम्हांस मिळण्यास बहुतच प्रयास. कारण आह्मी ही पृथ्वी सातारा छत्रपतींचे सत्तेंत आणणार, आणि सेनापती ती करवीरकर छत्रपतींचे सत्तेंत घेण्याविषयीं सदा यत्न करीत आहेत, तेव्हां एका वस्तूवर आम्हां उभयतांची इच्छा असल्यामुळें आम्हां उभयतांमध्यें प्रेम होणें कठिण. तर आतां हा वरलाभ आपल्या प्रसादेंकरून होण्याचा. तर या कन्येवर आपली कृपादृष्टि होऊन इला तोच वर मिळेल, असा आशीर्वाद मिळून त्याप्रमाणें सेनापतीस ही मुलगी करण्याबद्दल आज्ञा व्हावी, अशी आमची प्रार्थना आहे. हें ऐकून हरिबावा त्यांस सांगतात कीं, मी तिकडे जाणार आहेच, परंतु आपल्याकडून कोणी याच कामास पाठविण्यांत यावा, ह्मणजे हें कार्य होईल. असें सांगून हरिबावा निरोप घेऊन निघाले. ते कांहीं दिवसांनीं कुरुंदवाडीं जाऊन पुढें कापशीस गेले, तों तेथें श्रीमंतांकडील कारकून येऊन हरिबावांची मार्गप्रतीक्षा करीत बसलाच होता. त्यानें हरिबावांस भेटून त्यांच्या आज्ञेवरून सेनापति व नारायणराव यांस भेटून ते मुलगी करून घेण्याबद्दल बोलत असतां त्याच वेळीं हरिबावाही राजवाड्यांत आले. तें नारायणराव व सेनापतींनीं पाहून आदरें वंदन करून कुशल प्रश्न करीत त्यांस उच्च स्थलीं बसवून घेऊन, पेशवे यांजकडून कारकून आलेले कळवून, सांगून आलेल्या मुलींचा निश्चय करण्याचा किंवा कसें ती आज्ञा व्हावी, ह्मणून विनंति केली. तीं बावांनीं श्रवण करून ते बोलतात कीं, हेच वधूवर असा पूर्वीं प्रभुसत्तेनें निश्चय झाला आहे. आतां आपण लोकव्यवहाराप्रमाणें कसें करणें तें करावें. हें हरिबावांनीं भविष्य कथन केलें त्यावरून सर्वांस विशेषच आश्चर्य वाटलें. नंतर सेनापतींनीं व्यवहाररीतीप्रमाणें त्या कारकुनाशीं बोलून विवाहनिश्चय केला. पुढें उभयपक्षीं अनेक लोक मिळून मोठ्या समारंभानें विवाह झाला. त्यावेळीं उभयपक्षीं विहिणींची मिरवणूक होत असतां मराठी स्त्रियांनीं बुरके घेतलेले सेनापतींनीं पाहून त्यांस आज्ञा केली कीं, तुह्मीं ब्राम्हणाशीं विवाहसंबंध केलात, सबब त्या विहिणींप्रमाणेंच तुह्मीं उघड्यानेंच मिरवणूक करावी, ह्मणजे उभय-

पक्षीं शोभा समान होईल. असें सांगून आपलेकडील स्त्रियांचे भुरके काढविले, आणि मोठे कौतुकें त्या व्याह्याची नम्रता, व वारंवार त्याकडील देणग्या पाहून ते त्या हरिभटबावांस वंदन करून विनवीत कीं, अहो उपाध्येबावा, आह्मांस आपल्या प्रसादें पुत्रलाभ होऊन या थोराशीं हा शरीरसंबंध घडून त्यांकडील अनेक कौतुकसंपादक वस्तू व मिरवण्याचा सोहाळा यायोगेंकरून आह्मी या महत्वाच्या सुखास पात्र झालों, असें वारंवार म्हणून नारायणराव व ते सेनापति हरिबावांचें वर्णन करीत. ही कथा मीं (या ग्रंथकर्त्यानें) आपले वडिलांचे मुखांतून प्रसंगवशात् वारंवार ऐकिली आहे. पुढें पेशवे व सेनापतींनीं विवाहास आलेले लोक व याचक यांस अन्न व देकारेंकरून तृप्त करून विवाह समाप्त केला. नंतर थोडेच दिवसांपूर्वीं नारायणरावांस हरिबावांनीं तुह्मी इचलकरंजींत वास करावा, तें स्थल तुम्हांला व तुमचे वंशपरंपरेस सुखद होईल, असें सांगितलें होतें, तें स्मरून नारायणरावांनीं आपणास पूर्वी इनाम मिळालेल्या इचलकरंजींतच राहण्यास वाडा बांधण्याचें काम सुरू केलें. तें वाड्याचें काम आपण त्रिंबक हरीनीं स्वतः मेहनत घेऊन तयार केलें हें नारायणरावांनीं पाहून त्या संतोषार्थ त्यांनीं त्यांस कांहीं देणगी दिलेली आहे. पुढें त्या गांवीं नारायणराव व त्यांचे पुत्रपौत्रादिक तेथेंच राहिले. नंतर त्या इचलकरंजीकरांस पेशवे सरकारची आसता मिळाल्यामुळें करवीरकरांचे सेवाधर्मानें हाताखालीं राहणें मान्य होईना, सबब परस्परांत वारंवार कलह होत, त्यावेळीं बहुधा हरिबावांचे वंशिकांतील कोणी सरदार तो निवारण करीत असत.

---

## भाग ६.

लग्नसमारंभ होऊन हरिभटबावा कुरुंदवाडास आल्यावर कांहीं दिवस षट्कर्में करून राहिले असता सहकुटुंब त्रिस्थली यात्रा करावी असें वाटून तो बेत त्यांनीं आपले बंधुपुत्रांस कळविल्यावर सर्व मंडळी ह्मणतात ही यात्रा कशी होईल? बहु प्रयास, वाटेंत भिक्षाही मिळणें कठि-

णी; महाहिंसक व्याघ्रादि पशु व चोर इत्यादिकांचें भय विशेष, जाऊन येणें ह्मणजे पुनर्जन्मच अशीं परस्परांचीं भाषणें चालू आहेत हें हरिबावांनीं श्रवण करून त्यांस ते सांगतात कीं, यात्रा सिद्धीस जाण्याचें तुह्मांस संकट वाटतें काय? तर तसा संशय तुह्मी मनांत आणूंसुद्धां नका. कारण, ज्या प्रभूनें यात्रेविषयीं आह्मांस प्रेरणा केली, तोच सर्व संकटें दूर करण्यास समर्थ जवळ आहे. असें त्यांचें अभय वचन सर्वांनीं श्रवण करितांच सर्वांस श्रीगणेशच बोलत आहेत असें वाटून निर्भय होत्साते ते यात्रेस निघाले. हरिभटबावा त्रिस्थलीयात्रेस सहकुटुंब शिष्यमंडळीसह जातात हें सम प्र ग्रामस्थांनीं ऐकून त्यांचा विचार असा झाला कीं, हरिभटबावांचे आश्रयानें जसें आमचें संरक्षण होऊन यात्रा होईल तसें इतर कोणी संस्थानिकाच्या आश्रयानेंही होणार नाहीं. कारण, जो सर्वसमर्थ प्रभु गजवदन त्याची कृपादृष्टी ज्यावर त्याहून दुसरा कोण थोर? असा विचार करून अनेक लोक यात्रेस मिळाले, त्यांसह हरिभटबावा समारंभानें यात्रेस निघाल्यावर जातां जातां मार्गावरून देवदर्शन व तीर्थस्थान करीत करीत गंगाखेड या नांवचें गोदातीरीं गांव आहे तेथें गेल्यावर यथाविधि तीर्थश्राद्धादि करून तीर्थोपाध्यायास आमचे कोणी वंशिक येतील ते तुमची पूजा करितील, या अभिप्रायाचें पत्र आपले नांवचें हरिबावांनीं दिलें आहे. त्या पत्राचें अक्षर व वरील गजानन हें अक्षर हें भास्कर हरींच्या हातचें आहे, (हें मीं या ग्रंथकर्त्यानें पाहिलें आहे.)यावरून हरिबावांबरोबर त्यांचे पुत्र भास्करहरी हेही होते, हें सिद्ध झालें. पुढें हरिबावा आवढे नागनाथाचें दर्शन पूजन करीत कांहीं दिवस त्या क्षेत्रांत राहून तेथील आपल्याकडे दर्शनास आलेले लोकांचा उपयोग करीत ते नागपुरावरून रामटेकास गेले. तेथील श्रीरामचंद्राचें दर्शन घेऊन पुढें मार्गावर विंध्याद्री ह्मणजे जो सातपुड्याचा डोंगर तो पाहतांच सर्वांस असें वाटलें कीं, काय हे निबिड वृक्ष, तशाच काय ह्या मधून मधून अल्प अल्प प्रवाहाच्या व कांहीं महाप्रवाहाच्या नद्या, व काय हा मार्ग संकोच व भिल्ल आणि व्याघ्रादि पशूंचे वारंवार शद्ब,आतां

पक्षीं शोभा समान होईल. असें सांगून आपलेकडील स्त्रियांचे मुरके काढविले, आणि मोठे कौतुकें त्या व्याह्याची नम्रता, व वारंवार त्याकडील देणग्या पाहून ते त्या हरिभटबावांस वंदन करून विनवीत कीं, अहो उपाध्येबावा, आह्मांस आपल्या प्रसादें पुत्रलाभ होऊन या थोराशीं हा शरीरसंबंध घडून त्यांकडील अनेक कौतुकसंपादक वस्तू व मिरवण्याचा सोहाळा यायोगेंकरून आह्मी या महत्वाच्या सुखास पात्र झालों, असें वारंवार म्हणून नारायणराव व ते सेनापति हरिबावांचें वर्णन करीत. ही कथा मीं (या ग्रंथकर्त्यानें)आपले वडिलांचे मुखांतून प्रसंगवशात् वारंवार ऐकिली आहे. पुढें पेशवे व सेनापतींनीं विवाहास आलेले लोक व याचक यांस अन्न व देकारेंकरून तृप्त करून विवाह समाप्त केला. नंतर थोडेच दिवसांपूर्वीं नारायणरावांस हरिबावांनीं तुह्मी इचलकरंजींत वास करावा, तें स्थल तुह्मांला व तुमचे वंशपरंपरेस सुखद होईल, असें सांगितलें होतें, तें स्मरून नारायणरावांनीं आपणांस पूर्वी इनाम मिळालेल्या इचलकरंजींतच राहण्यास वाडा बांधण्याचें काम सुरू केलें. तें वाड्याचें काम आपण त्रिंबक हरीनीं स्वतः मेहनत घेऊन तयार केलें हें नारायणरावांनीं पाहून त्या संतोषार्थ त्यांनीं त्यांस कांहीं देणगी दिलेली आहे. पुढें त्या गांवीं नारायणराव व त्यांचे पुत्रपौत्रादिक तेथेंच राहिले. नंतर त्या इचलकरंजीकरांस पेशवे सरकारची आसता मिळाल्यामुळें करवीरकरांचे सेवाधर्मानें हाताखालीं राहणें मान्य होईना, सबब परस्परांत वारंवार कलह होत, त्यावेळीं बहुधा हरिबावांचे वंशिकांतील कोणी सरदार तो निवारण करीत असत.

---

## भाग ६.

लग्नसमारंभ होऊन हरिभटबावा कुरुंदवाडास आल्यावर कांहीं दिवस षट्कर्में करून राहिले असतां सहकुटुंब त्रिस्थली यात्रा करावी असें वाटून तो बेत त्यांनीं आपले बंधुपुत्रांस कळविल्यावर सर्व मंडळी ह्मणतात ही यात्रा कशी होईल? बहु प्रयास, वाटेंत भिक्षाही मिळणें कठि-

णें; महाहिंसक व्याघ्रादि पशु व चोर इत्यादिकांचें भय विशेष. जाऊन येणें ह्मणजे पुनर्जन्मच अशीं परस्परांचीं भाषणें चालू आहेत हें हरिबावांनीं श्रवण करून त्यांस ते सांगतात कीं, यात्रा सिद्धीस जाण्याचें तुह्मांस संकट वाटतें काय? तर तसा संशय तुह्मी मनांत आणूंसुद्धां नका. कारण, ज्या प्रभूनें यात्राविषयीं आह्मांस प्रेरणा केली, तोच सर्व संकटें दूर करण्यास समर्थ जवळ आहे. असें त्यांचें अभय वचन सर्वांनीं श्रवण करितांच सर्वांस श्रीगणेशच बोलत आहेत असें वाटून निर्भय होत्साते ते यात्रेस निघाले. हारिभटबावा त्रिस्थलीयात्रेस सहकुटुंब शिष्यमंडळीसह जातात हें समग्र ग्रामस्थांनीं ऐकून त्यांचा विचार असा झाला कीं, हरिभटबावांचे आश्रयानें जसें आमचें संरक्षण होऊन यात्रा होईल तसें इतर कोणी संस्थानिकाच्या आश्रयानेंही होणार नाहीं. कारण, जो सर्वसमर्थ प्रभु गजवदन त्याची कृपादृष्टी ज्यावर त्याहून दुसरा कोण थोर? असा विचार करून अनेक लोक यात्रेस मिळाले, त्यांसह हरिभटबावा समारंभानें यात्रेस निघाल्यावर जातां जातां मार्गावरून देवदर्शन व तीर्थस्थान करीत करीत गंगाखेड या नांवचें गोदातीरीं गांव आहे तेथें गेल्यावर यथाविधि तीर्थश्राद्धादि करून तीर्थोपाध्यायास आमचे कोणी वंशिक येतील ते तुमची पूजा करितील, या अभिप्रायाचें पत्र आपले नांवचें हरिबावांनीं दिलें आहे. त्या पत्राचें अक्षर व वरील गजानन हें अक्षर हें भास्कर हरींच्या हातचें आहे, (हें मीं या ग्रंथकर्त्यानें पाहिलें आहे.)यावरून हरीबावांबरोबर त्यांचे पुत्र भास्कर हरी हेही होते, हें सिद्ध झालें. पुढें हरिबावा आवढे नागनाथाचें दर्शन पूजन करीत कांहीं दिवस त्या क्षेत्रांत राहून तेथील आपल्याकडे दर्शनास आलेले लोकांचा उपयोग करीत ते नागपुरावरून रामटेकास गेले. तेथील श्रीरामचंद्राचें दर्शन घेऊन पुढें मार्गावर विंध्याद्री ह्मणजे जो सातपुड्याचा डोंगर तो पाहतांच सर्वांस असें वाटलें कीं, काय हे निबिड वृक्ष, तशाच काय ह्या मधून मधून अल्प अल्प प्रवाहाच्या व कांहीं महाप्रवाहाच्या नद्या, व काय हा मार्ग संकोच व भिल्ल आणि व्याघ्रादि पशूंचे वारंवार शद्ब,आतां

यांतून पार कसें होऊं? असा वारंवार विचार करीत मार्गक्रमण करीत असतां अकस्मात् भिल्लनायक अनेक भिल्लांसह यात्रा लुटावी या बुद्धीनें त्यांजपाशीं आला. आणि सर्वांस आपापलीं वस्त्रें वगैरे सर्व टाका ह्मणून बोलतांच सर्व यात्रेकरी भयभीत होऊन हरिबावासभोंवार जमले, तों हरिबावा पुढें होऊन त्या सर्वांस मोठा शद्ब करून सांगतात, अरे तुह्मी सर्व अंध आहांत; आमचीं वस्त्रें वगैरे तुह्मांस मिळावयाचीं नाहींत. असा सक्रोध शद्ब त्या भिल्लाचे श्रवणांत पडतांच सर्व अंध होऊन थरथरा कांपत कांपत हात जोडून ह्मणतात महाराज, आम्ही सर्व अपराधी आहोंत; आम्हांस आपलीं वस्त्रें वगैरें कांहीं नकोत आपण आमचे सर्व अपराध क्षमा करावेत; आम्ही आपले दास आहोंत; तर आम्हां सर्वांवर आपण दया करावी; असें म्हणत हरिभटबावापुढें लोळूं लागले आणि वारंवार आम्हा शरणागतांचें रक्षण करावें व आम्हांस नेत्रदान द्यावें, म्हणजे आह्मी आपल्या पायाचें दर्शन घेऊन आपापल्या ठिकाणीं जाऊं; असी त्यांची प्रार्थना ऐकून हरिबावांस त्यांची दया येऊन ते बोलतात रे तुम्हांस नेत्र आहेतच, तर मजकडे पहा, ह्मणजे झालें. असें ह्मणतांच त्या सर्वांस दिसूं लागलें. नंतर ते सर्व बहुत विनयानें हरिबावांची अनेक प्रकारें सेवा करीत त्यांस नर्मदा पार करून सातपुडा पार होईपर्यंत त्यांजबरोबर राहून पुढें त्यांच्या आज्ञेनें आपापले ठिकाणीं गेले. पुढें हरिबावा सर्व यात्रेकऱ्यांसह आनंदानें मार्गक्रमण करीत करीत कांहीं दिवसांनीं प्रयागास आल्यावर तेथील यथाविधि श्राद्धादि कृत्यें करून गंगातीरीं राहून तेथील क्षेत्रस्थ देवब्राह्मणांचें पूजन करीत असतां प्रयागवळानें लेख मागितल्यावरून त्याचे वहीवर, आमचे वंशिक कोणी येथें येतील ते तुमची पूजा करतील, या अभिप्रायाचा लेख आपले नांवें दिला. तें हस्ताक्षर व वरील गजानन हें अक्षर भास्कर हरींचे हातचें आहे ( तेंहीं मीं ह्या ग्रंथकर्त्यानें पाहिलें आहे. ) पुढें कांहीं दिवसांनीं हरिबावा काशीस गेले. नंतर तेथील यथाविधि क्षौरश्राद्धादि संपादून बिश्वेश, माधव, ढुंडिराज, प्रभृति देवांचे पूजनादिकेंकरून संतोष मानीत कांहीं

दिवस या क्षेत्रांत वास केला असतां अनेक विद्वान तपस्वी ब्राह्मण दर्शनास येऊन परस्पर वंदनपूजनादि लाभानें संतुष्ट होऊन सत्कथासंल्लापानें तो दिवस काढीत. अशा सत्काल जात असतां कोणी एके दिवशीं वेदाभ्यास करण्याच्या इच्छेनें त्या क्षेत्रांत राहिलेला ब्राह्मणपुत्र हरिबावांचे दर्शनास येऊन विनंति करितो कीं, या क्षेत्रांत राहून गुरूपासून वेदपाठ घेऊन तो स्थिर राहण्याबद्दल वारंवार आवृत्ति करितों, तरी पण ग्रंथ पाठ राहत नाहीं. यास्तव आपले दर्शनास आलों आहे. तर कृपा करून मला वेद पाठ यावा असी कृपा झाली पाहिजे. ही त्याची प्रार्थना श्रवण करून बावांस दया येऊन ते त्यास सांगतात कीं, तुह्मांस बुद्धीची अपेक्षा असल्यास बुद्धिपती जो धुंडिराज त्याचें तुह्मी सेवन करा ह्मणजे त्या प्रभूचे प्रसादें ती धारणाबुद्धि तुह्मांस मिळेल. असें त्यास बोलून सप्तरात्रीचा एक पूजाप्रकार त्या मुलास उपदेश करून धुंडिराजाकडे सेवनास पाठविल्यावर त्यानें सांगितल्याप्रमाणें मोठ्या भक्तीनें सप्तरात्र धुंडिराजाचें पूजन करितां आठवे दिवशीं, पूर्वीं अभ्यास केलेला ग्रंथ स्मरूं लागला, हें त्या मुलानें ध्यानांत आणून मोठ्या प्रेमानें हरिभटबावांजवळ येऊन त्यांचे चरण धरून आनंदाश्रु गाळूं लागला. हें बावांनीं पाहून त्या मुलास आपले चरणापासून दूर करून कुशल प्रश्न करितांच तो विनयानें कळवितो कीं, गुरुमहाराज, आपले आज्ञेप्रमाणें धुंडिराजपूजन सप्तरात्र संपादून आज आपले पाददर्शनास आलों आहें. महाराज, आपले उपदेशानें त्या प्रभूला माझी कामना पूर्ण करावी लागली. असें बोलून पूर्वीं अभ्यास करून न आलेला वेद बावांपुढें ह्मणूं लागला, तें बावांनीं श्रवण करून मोठ्या संतोषानें त्यास ह्मणतात, रे तूं मोठा भक्तिमान आहेस, ह्मणून तो भक्तवत्सल धुंडिराज तुला प्रसन्न झाला. आतां पुढील वेदाचा अभ्यास त्वां करावा. असें सांगून निरोप दिल्यावर त्यानें आपल्यास वेदपाठ सांगणारे गुरूसमीप जाऊन गुरूस वंदन करून प्रसाद झालेला प्रकार सर्व निवेदन केल्या कारणानें परंपरेनें ही गोष्ट त्या सर्व क्षेत्रवासी श्रेष्ठ ब्राह्मणांस समजल्यावर ते व इतर जन बावा भिक्षेस निघा-

ले ह्मणजे त्यांस आपापले घरीं नेऊन आपलीं संकटें दूर होण्याविषयीं अनेक वस्तु पुढें ठेवून नमन करीत तेव्हां त्यांस बावा विनयानें असें ह्मणत कीं, मी भिक्षेनें निर्वाह करणारा, मला हे आपले पदार्थ नकोत. असें सांगून पुढें जात. यापुढें बावांचें वैराग्य व सदाचरण व लोकानुग्रह-शक्ति पाहून महाशिष्ट ब्राह्मणांस बावांविषयीं पूज्यबुद्धि होऊन ते वारंवार त्यांचे संगतीची अपेक्षा करीत.असो. हरिबावा कांहीं दिवस तेथें राहून यात्राप्रकार पूर्ण होतांच तेथील देवब्राम्हणांचा निरोप घेऊन गयायात्रेस मंडळीसह निघाले, ते थोडेच दिवसांत गयेस पोंहोचून नंतर तेथील श्राद्धपिंडदानादि संपादून त्या क्षेत्रांतील ब्राम्हणांस यथा-वैभवें पूजनादि सत्कारें संतुष्ट करून त्यांचा निरोप घेऊन पुढें पूर्व दिशे-च्या गंगासागरसंगमादि यात्रा करून पुन: प्रयागास आले. आणि तेथील क्षौरश्राद्धादि कृत्य संपादून स्वदेशीं जाण्यास निघाले. तेथें क्रमेंकरून जातां जातां सातपुडा पर्वताचे नजीक आल्यावर तो सातपुडा उतरून मार्गावर आलेले यात्रेकरू भेटले. त्यांनीं हरिबावा वगैरे सर्वांस सांगि-तलें कीं, तुह्मी हत्यारबंद लोकांची सोबत पाहून पुढें जावें. कारण, मार्गावर व्याघ्राचे सपाट्यांत माणसें वारंवार सांपडत आहेत. हे शब्द बावांबरोबरचे लोकांनीं श्रवण करितांच त्यांतील जे ज्ञानशून्य होते ते बावांस विनंति करूं लागले कीं, चार दिवस येथेंच मुक्काम करून एकादा हत्यारबंदाची सोबत पाहून मग पुढें जावें.हें बावांनीं ऐकून त्यांस अभय देऊन पुढें झाडीचे मार्गावर चालू लागले, आणि एक मुक्काम होऊन दुसरे दिवशीं मार्गक्रमण करीत असतां, अकस्मात् मार्गावर लोकांचा गलबा होऊन ते धावूं लागले तों बावा मंडळी-सह चालत आहेत हें पाहून त्यांकडे आले. त्यांस बावांनीं पुसतां ते सांगूं लागले कीं,आह्मी मार्गावर वाघ बसल्याचें पाहून भयानें धांवत आलों, हें बावांनीं श्रवण करून त्यांस अभय देऊन पुन: मार्गावर आपल्या-बरोबर घेतल्यावर मार्ग चालतां चालतां बावा आपण पुढें होऊन व्याघ्राजवळ गेले, आणि त्या वाघास तेथून दूर बसण्यास सां-गून सर्व यात्रेकरूंस हाक मारून मार्गानें चालू लागण्यास

सांगूं लागले, पण ते भयानें पुढें जाईनात असें पाहून आपण स्वतः त्यापुढें जाऊन सर्वांस मार्गावरून पार केलें. नंतर त्या व्याघ्रास यथेच्छाविहारास परवानगी देऊन आपण बरोबर आलेल्या यात्रेकऱ्यांजवळ आले,तों ते व इतर मार्गावर भेटलेले लोक यांनीं हरिबावांचें महत् स्तुत्य कृत्य पाहून मोठ्या भक्तीनें दृढ चरण धरून ते त्यांस विनवितात कीं, आपण साक्षात् परमेश्वर आहां. काय हें वशीकरण? जसें सेवक मनुष्यास आज्ञा करून त्यास एके ठिकाणीं बसवावें, तसें आपण या क्रूर पशु व्याघ्राला बसविलें, हा आपणांस वश कसा झाला? असा वारंवार शब्द करीत नमन करूं लागले. हें हरिबावांनीं श्रवण करून निरभिमानेंकरून त्या सर्वांस कळवितात कीं, तुह्मी मला ईश्वर ह्मणूं नका, हा श्री गणपतिमहामंत्राचा प्रभाव आहे आणि तो मंत्र ज्यांस सिद्ध झाला त्यानें कोणत्याही इंद्रचंद्रादि देवांचें आवाहन केलें तर ते देखाल वश होतात, मग हे क्षुद्र पशु व्याघ्रादिक वश झाल्याचें आश्चर्य काय? अशा अनेक शब्दांनीं आपल्यावरील महत्व दूर करून त्या सर्वांशीं प्रेमानें बोलत बोलत पुढील मार्गक्रमण करूं लागले. आणि कांहीं महिन्यांनीं नासिक त्र्यंबकेश्वरादि देवांचीं दर्शनें घेऊन पुढें पुणें मुक्कामास आले. तों तेथें गोविंद हरि व रामचंद्र हरि हे पुत्र श्रीमंतांजवळ होतेच, त्यांनीं हें श्रीमंतांस कळविल्यावर श्रीमंतांनीं आपल्या घरीं हरिबावांस आणून, यात्रेचे श्रम बहुत झाले आहेत करितां आतां आपण येथें राहून आह्मांस पावन करावें व आपले श्रमही दूर करावेत, अशी प्रार्थना करून त्यांनीं ठेवून घेतल्यामुळें तेथें कांहीं दिवस राहून त्यांच्या संतोषें निरोप घेऊन गोविंद हरीस व रामचंद्र हरीस संगें घेऊन सर्व यात्रेकऱ्यांसह कुरुंदवाडास येऊन पोहोंचले, तेव्हां वडील पुत्र कृष्णंभटबाबा व बाळंभट व बंधुवर्ग आणि इतर बहुत मंडळी समोर येऊन हरिबावांस उत्साहानें गांवांतून मिरवीत आपल्या घरीं घेऊन गेले. नंतर त्रिंबक हरि वगैरे येऊन मोठ्या उत्साहानें यात्रासांगता केली. ही यात्रा कुरुंदवाड मुक्कामीं राहिल्यावर केली. याखेरीजही हरिबावांच्या एक दोन काशीयात्रेच्या आह्मा झाल्या होत्या, असें एक दोन वेळां ( मीं या ग्रंथकर्त्यानें )

वृद्धांच्या मुखांतून ऐकिलें होतें.

पुढें हरिबावा कुरुंदवाड मुक्कामीं षट्कर्मे करून राहिले असतां गोविंद हरि व रामचंद्र हरि हे पुण्यांत श्रीमंतांजवळ जाऊन येऊन राहिले असत. परंतु त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांस धनलाभ होत नसल्यामुळें हरिबावांजवळ येऊन अवसर पाहून विनयानें त्यांचे चरण धरून विनंति करितात कीं, आह्मी श्रीमंतांजवळ राहून त्यांपासून प्रभुशक्तीपूर्वक धनलाभ व्हावा ही इच्छा करीत आहों, परंतु अद्यापपर्यंत इच्छा पूर्ण होत नाहीं. तर ती पूर्ण व्हावी. अशी विनंति करीत करीत बहुत नम्र होऊन पदीं लागले, हें बावांनीं पाहून परम शांत मनानें या उभयतांचें पूर्व कर्मफल ध्यानांत आणून आज्ञा करितात कीं, हे गोविंदा, तूं जन्मांतरीं श्रीविठ्ठलास नवस केला होतास, तो कार्य होऊनही, फेडला नाहींस; यास्तव तो देव कार्यविघातक झाला आहे. तर तें ऋण फेड. असें ह्मणतां गोविंदपंत बहुत उद्विग्न होऊन चिंता करूं लागला कीं, मीं नवस तरी कोणता समजूं? असें पुनः पुनः मनांत आणून अति म्लान वदन झाला. हें त्याचे मनांतील सर्व बावांनीं समजून अभय देऊन त्यास ऋण फेडण्याचें सांगतात, अरे, तूं पंढरीस जाऊन श्रीविठ्ठलाचें दर्शन घेऊन पुनः महाद्वारांत यावें, तों तेथें कोणी अत्यंत वृद्ध असून महारोगी मनुष्य तुझें नांव घेऊन तुला हाक मारील. तूं त्यापुढें जातांच माझी इच्छा पूर्ण करशील काय असें बोलून तो तूं जन्मांतरीं केलेला नवस मागेल.ती त्यांची इच्छा तूं पूर्ण केलीस ह्मणजे तुझी इच्छा तोच पूर्ण करील.इतकें गोविंदपंतास सांगून निरोप दिला व रामचंद्रपंतास सांगतात कीं, तुझा ऋणी चिमाजीपंत अपा पेशवे आहे, याची सेवा तूं एकनिष्ठपणें कर, ह्मणजे तो तुझी इच्छा पूर्ण करील. हें रामचंद्रपंतास सांगून निरोप दिल्यावर ते उभयतांही हरिबावांस वंदन करून एक पुण्यास गेले; व दुसरे गोविंदपंत पंढरीस गेले तों श्रीविठ्ठलाचें दर्शन घेऊन पुनः महाद्वारीं येतांच बावांनीं सांगितल्या प्रमाणें एका वृद्ध रोग्यानें गोविंदपंत असें नांव घेऊन हाक मारिली ह्मणून त्यापुढें जातांच तो ह्मणतो कीं, मला कोंकणचें पक्वान्न

घारगे ह्मणून कारितात ते दहा घारगे खाऊन वर तांब्याभर थंड पाणी प्यावें असें बहुत दिवस वाटतें, तर ती माझी इच्छा तूं पूर्ण करशील काय? असें ह्मणतांच ते सर्व गोविंदपंतांनीं मान्य करून, त्वरेनें गांवांत फिरून उत्तम प्रतीचे दहा घारगे व तांब्याभर थंड पाणी घेऊन ते त्या वृद्ध रोग्याजवळ आले, तों रोगी म्लान होऊन नेत्र झांकून पडला आहे हें त्यांनीं पाहून मोठा शब्द करितांच त्यानें नेत्र उघडून गोविंदपंताकडे पाहिलें आणि इच्छेप्रमाणें जिन्नस आणिलेस काय ह्मणून विचारिलें मग गोविंदपंतांनीं ते घारगे व पाण्याचा तांब्या पुढें ठेविला. तें पाहून परम संतोषानें तो ते घारगे स्वस्थपणें खाऊन वर तांब्याभर पाणी प्याला आणि ढेकर देऊन गोविंदपंतास ह्मणतो अरे गोविंदपंत, माझी बहुत वर्षांची इच्छा तूं पूर्ण केलीस, आतां तूं पुण्यास जाऊन श्रीमंतांजवळ राहा, ह्मणजे तो तुझी इच्छा पूर्ण करील. ह्या माझ्या बोलाचा तूं संशय मानूं नको. इतकें गोविंदपंताशीं बोलून तो रोगी अकस्मात् तेथें नाहींसा झाला. हें गोविंदपंतांनीं पाहून चहूंकडे दृष्टि देऊन मग विस्मय करितात, काय थोर माझा पिता हरिबावा, काय त्याचें ज्ञान? मला महाद्वारांत पाहून नांव घेऊन हाक मारील त्याची इच्छा तूं पूर्ण कर ह्मणून सांगितलें,पण जर त्यावेळीं मला नवस फेडून घेण्यास देवच महाद्वारांत भेटेल असें सांगितलें असतें तर त्या प्रभूचे पाय मीं कधीं सोडले नसते. असे अनेक प्रकारें मनांत विचार करीत कांहीं वेळ तेथेंच स्तब्ध राहून मनांत म्हणतात कीं, माझा अधिकार तसा नसल्यामुळेंच वडिलांनीं मला तसें सांगितलें नाहीं.बरें असो. अशा स्वरूपानें तरी मला देव दृष्टीस पडून मजसीं बोलून माझे हातून त्यानें नवस फेडून घेतला असावा, हाच संतोष मानून हरिबावांस नमस्कार करून तेथून निघाले, ते कांहीं दिवसांनीं पुणें मुक्कामीं श्रीमंतांजवळ आले;हें श्रीमंतांनीं पाहून प्रेमानें कुशल प्रश्न करून ठेवून घेतलें. पुढें उत्तरोत्तर त्यांवर श्रीमंतांचें प्रेम वाढून त्यांस आपल्याबरोबर स्वारींत (हरिबावांचे हे पुत्र मंगलप्रद असें मानून)संगतीस घेऊन जाऊं लागले. तसेंच रामचंद्र हरीसही चिमाजी आपासाहेब पेशवे हे आपल्याबरोबर

स्वारींत घेऊन जात असत आणि त्यांजकडून झालेलीं शौर्याचीं कामें पाहून त्यांजवर बहुत प्रेम करीत. अशा वागणुकीनें ते उभयतां बंधु पुण्यांत कांहीं दिवस राहून पुढें वडिलांचे दर्शनास कुरुंदवाड मुक्कामीं आल्यावर तेथें सर्वांस भेटून कांहीं दिवस राहिले असतां हरिबावांची समाधानवृत्ति पाहून त्यांस गोविंद हरी पूर्वी पंढरी मुक्कामीं महाद्वारांत झालेलें चरित्र सांगून मोठ्या प्रेमानें विनंति कारितात कीं, अहो बाबा, रोगी तो कोण असावा? अशी पुनः पुनः विनयाने विनंति करितो. हें एकून बाबा अनुग्रहबुद्धीनें पुत्रास सांगतात कीं, तूं पूर्वजन्मीं ज्याची सेवा केलीस तोच प्रभु. तुला तें शंख चक्र धारण केलेलें स्वरूप दृष्टीस पडण्याचा तुझा अधिकार नसल्यामुळें त्याला भक्ताभिलाष पूर्ण करण्यास असें कुत्सित रूप धारण करावें लागलें. ही त्या परमेश्वराची भक्तप्रेमळता श्रवणानें, गोविंदपंतास ईश्वरलाभाविषयीं इच्छा होऊन वडिलांस विनंति करितां, बावांनीं त्यास असें सांगितलें कीं, आतां जन्मांतरीं केलेल्या सत्कर्माचें फळ भोगण्यांत आलें आहे, तें भोगीत असून त्या प्रभुपदावर चित्त ठेवा व तद्भक्तादिकांचेही अनेक प्रकारें पूजनादि सत्कार करीत जा, ह्मणजे तो देव दयाळु जवळच आहे. असें सांगून त्या गोविंदपंताचें समाधान केलें. नंतर हा वडिलांचा अनुग्रह झाला असें मनांत पूर्णपणें येऊन ते पुढें आमरणपर्यंत हें विस्मरण न होऊं देतां वागले, इतकेंच नव्हे, तर त्याप्रमाणें त्या प्रभूची वारंवार यात्रा करणें व त्याचे इतर महाभक्त आहेत त्यांची वारंवार पूजा करणें व प्रती मार्गशीर्षमासीं पंढरीचे वारकरी अंध, पंगु, व दरिद्री वगैरे हजारों लोकांस अन्नवस्त्र दान करणें हीं महत्पुण्यकर्मेंही त्या हरिबावांचे आज्ञेप्रमाणें वारंवार करितच असत. असो. हरिबावाचे आशीर्वादें त्या गोविंद हरींचें व रामचंद्र हरींचें बहुतच वैभव वाढून त्यांनीं मिरज व तासगांव हें आपापल्या राजधानीचें ठिकाण केलें. पुढें त्यांच्या पुत्रपौत्रादिकांचें वर्णन इतरत्र उपलब्ध आहे. करितां येथें देण्याचें प्रयोजन नाहीं.

हरिभटबाबांचे वडील चिरंजीव कृष्णंभटबावा हे आपले वडिलां-

प्रमाणेंच विद्वान् असून ईश्वराराधनेविषयीं सदा तत्पर असत, यास्तव त्यांस बहुत लोक हरिबावांप्रमाणेंच मानीत. त्यांस पांच पुत्र होते, पैकीं पहिले मेघश्यामराव; २ पुरुषोत्तमराव; ३ बळवंतराव; ४ माधवराव; ५ नारायणराव. ह्या पांच पुत्रांसह कृष्णंभटबावा हे कुरुंदवाड मुक्कामींच राहत असत. इकडे गोविंद हरि व रामचंद्र हरि यांस पेशवे सरकारांतून सरंजाम जाहल्यावर त्यांचे संगतीनें कृष्णंभट बावांचे चिरंजीवांसही दरसाल हजारों रुपयांच्या तैनाती झाल्या. नंतर गोविंद हरि हे वारंवार पंढरीचे यात्रेस जाऊन नंतर ते आपलेकडे सरंजामांत आलेले मंगळ-वेढें वगैरे गांवीं राहून मग पुण्यास जात. त्यांबरोबर कृष्णंभट बावाही हरिबावांचे आज्ञेवरून पंढरीस जाऊन नंतर मंगळवेढें गांवीं कुटुंबासह राहूं लागले. त्यानंतर कांहीं वर्षांनीं हरिबावा चतुर्थाश्रम घेऊन स्वानंद-वासी झाल्यावर तीर्थयात्रानिमित्तानें देशांतर करीत असतां पुणें मुक्का-मीं आले. तें श्रीमंतांनीं श्रवण करून त्यांचे दर्शनास येऊन कांहीं संभाषण करितां श्रीमंतांस असें वाटलें कीं, अशा थोर ब्राह्मणास आ-ह्मांकडून एखादा गांव किंवा जमीन तरी त्यांचा योगक्षेम चांगला चाले अशी असावी. असें मनांत आणून गोपाळराव गोविंद यांस कळविल्यावर त्यांनीं श्रीमंतांस अशी विनंति केली कीं, आमचे कृष्णंभट काका प्रतिग्रह कधीं घ्यावयाचे नाहींत;कांकीं, त्यांचा प्रपंच चालण्यास त्यांस पंचवीस लक्ष रुपयांचा सरंजामच सरकारांनीं दिला आहे. अशी वडिलांची प्रतिग्रहाविषयीं विन्मुखता व आपले घरचा एकोपा दाख-वून श्रीमंतांचें त्यांनीं समाधान केलें.

हरिबावांचे दुसरे पुत्र बाळंभटजी हे कुटुंबासह वडिलांजवळच कुरुंदवाडांत राहत असत. त्यांची पत्नी सुशील असे. हरिबावांस उत्तरोत्तर वृद्धावस्था आल्यावर ती हरिबावांची व आपले पतीची सुश्रूषा करण्याविषयीं सदा तत्पर असे. परंतु तिला संतति कमी असून चार पांच वर्षांनीं एखादें मूल होई व तेंही स्वल्प काळांतच नाहींसें होई, यामुळें ती कष्टी असे. तरी पण त्या उभयतांच्या सेवेंत केव्हांही अंतर पडूं देत नसे. असे कांहीं दिवस गेल्यावर तिनें बावा स्वस्थपणें बसलेसें पाहून

विनयानें आपल्यास मृतवंध्यादोष असल्याचा दूर होण्याबद्दल विनंति केली आणि समीप सेवा करीत राहिली हें बावांनीं पाहून तिला ते सांगतात, गे तुला पुत्राची इच्छा असल्यास तूं या श्री मयूरेश्वराचें पूजन कर, ह्मणजे तो भक्तवत्सल तुला दीर्घायु असा पुत्र देईल. असें बोलून तिला पूजनपद्धति सांगून निरोप दिल्यावर तिनें श्वशुरांनीं सांगितल्याप्रमाणेंच पूजनप्रकार चालू करतां थोड्या महिन्यांतच गर्भ राहून पुत्र जाहला. त्याचें नांव मयूरेश्वर हेंच ठेविलें. पुढें त्यास मोरोबा आबा असें ह्मणत. तो कांहींसा वयांत आल्यावर त्याचे मातोश्रीनें गोविंद हरीबरोबर पुण्यास पाठविलें. नंतर तो मोरोबा आबा बुद्धीनें विशेष असे, यास्तव तो आपले चुलते गोविंद हरीशीं व त्यांचे पत्नीशीं परम आर्जवानें असून गोपाळराव गोविंद हा त्याहून कांहीं वयानें वडील व सशक्त व बुद्धिमान असा असे. याशीं तर बंधुत्वाचें नातें असून सदा मित्रभावही बहुतच ठेवीत असे, त्यायोगें बरींच वर्षें त्याजवळ राहून पुढें पेशवे सरकारचे वाड्यांतही गोविंद हरीबरोबर जाऊन श्रीमंतांचा व त्यांचे पत्नीचा कांहीं परिचय झाल्यावर पुढें मोरोबानी त्या सरकारचें प्रेम आपल्यावर व्हावें यास्तव अशी युक्ति करीत चालले कीं, प्रति दिवशीं पुण्यासभोंवारच्या बागेंत हिंडून कांहीं फुलें संपादन करून श्रीमंतांचे व त्यांचे पत्नीचे देवपूजनाचे वेळेस तीं फुलें पुढें ठेवून श्रीमंतास वंदन करून स्वल्पकाळ तेथें बसून घरीं यावें, याप्रमाणें बरेच दिवस करीत असत. पुढें श्रीमंतांची स्वारी कुटुंबासह पुणें-प्रांतांतील गांव पाहण्याकरितां गेली त्यावेळीं मोरोबांनींही आपल्या खर्चानें बरोबर घोडें घेऊन स्वारीबरोबर जाऊन वेळोवेळेस फुलें पोंहोंचविलीं. पुढें श्रीमंत पुण्यास आल्यावर मोरोबाआबाची निष्ठा पाहून त्यास एक हजार रुपये बक्षीस देऊन संतुष्ट केल्यावर त्या मोरोबा आबास द्रव्यलाभ झाल्यामुळें ठिकाण धरून राहण्यास बरें पडलें. मग थोड्याच दिवसांनीं गोविंद हरीस पागेचें काम झाल्यावर त्याचे नांवें बेहेडा झाला. त्यावेळीं गोपाळराव गोविंद यांच्या स्नेहानें मोरोबा आबा यांचे नांवें बेहेड्यांत चार हजार रुपयांची

तैनात नमूद झाली. नंतर मिरज किल्ला गोविंद हरीकडे झालाच होता तो तेथें राहिल्यावर मोरोबांनींही तेथेंच आपणांस राहण्याजोगा वाडा बांधून सहकुटुंब त्यांत राहिल्यावर वारंवार गोविंद हरि किंवा गोपाळ राव गोविंद यांजबरोबर स्वारींत किंवा घरीं असून सर्व दौलतीची व्यवस्था मोरोबा आबा पहात असत. त्यामुळें गोविंद हरीस रोख द्रव्य किंवा गांवें वगैरे इनामें मिळत, त्याप्रमाणें मोरोबा आबांसही कांहीं मिळत असत. त्यायोगें मोरोबांची संपत्ती उत्तरोत्तर बरीच वृद्धिंगत झाली. पुढें कांहीं दिवसांनीं दौलतीचें काम सुरक्षित चालविल्याबद्दल श्रीमंत सरकारांतून एक हजार रुपये दरसाल तैनात जास्त ठरली. त्यायोगें पूर्वीचे चार हजार व हल्लींचा एक एकूण पांच हजार रुपये दरसाल मोरोबांस मिळू लागले ते व सुमारें पांच हजारांचे इनाम एकूण दहा हजार रुपये दरसाल जमा होत असत. खेरीज त्यांनीं दौलतीचे कामांत सुमारें लक्ष रुपये संपादन केले असावेत, असें वृद्ध जन ह्मणत असत. ते मोरोबा आबा द्रव्यसंपादक असून ह्यांनीं धर्मबुद्धीनें श्रीशिवालयें, धर्मशाळा, ब्राह्मणांचीं घरें, वगैरे बांधण्याकडे हजारों रुपये खर्चून ह्यांनीं लोकोपयोग बराच केला. त्यांचे अंगीं मैत्री संपादण्याचा एक मोठा विशेष गुण होता तो असा कीं, गोपाळराव गोविंद हे पुढें व्याधिग्रस्त होऊन मिरजेंत आल्यावर त्यांची प्रकृति उत्तरोत्तर अत्यवस्थ पाहून गोविंद हरी वगैरेंनीं त्यांस तुमचें द्रव्य कोठें आहे व कोणास काय द्यावयाचें आहे वगैरे विचारिलें असतां; त्यांस गोपाळराव एकच असें सांगे कीं, सर्व मोरोबास ठाऊक आहे तो सांगेल तसें करा. हें शद्ब ऐकून सर्व लोक त्या मोरोबास असें ह्मणत कीं, अहो, मोरोबा आबासाहेब, काय तुमची मैत्री जोडण्याची क्रिया! अहो साक्षात् पिता, पुत्रास गुह्य विचारीत असतां ते त्यास कांहीं न सांगतां तुम्हांवर मित्रभावानें पूर्ण विश्वास ठेवितो, तस्मात् मोरोबाप्रमाणें मित्रभाव व विश्वास संपादन करणारा दुसरा मनुष्य पाहण्यांत विरळाच असेल, असें त्यांचें बुद्धिमान लोक वर्णन करीत.

## भाग ७.

पुढें कुरुंदवाड मुक्कामीं हरिबावाजवळ भास्कर हरि हे राहत असत. ते लहानपणापासून सशक्त व बुद्धिमान असून कांहीं विद्वान्ही होते. त्यांस हरिबावांची संगति बहुत वर्षे असून त्यांच्या बरोबर त्यांनीं अनेक तीर्थयात्रादि प्रसंग दोन तीन वेळां केला होता, ह्या कारणामुळें त्यांच्या अंगीं सत्वगुण विशेष वाढला होता. ह्मणून त्या भास्कर हरींची वागणूक हरिभटबावांस व इतरांस बहुत आवडत असे. पुढें कांहीं दिवसांनीं हरिभटबावांनीं भास्कर हरीस असें सांगितलें कीं, तूं मजबरोबर देशपर्यटणानें शरीरास बहुत कष्ट दिलेस,तर आतां कांहीं काल तुला राजपुरुषसुख संपत्ति मिळावी या हेतूनें मी सांगतों तसें तूं करावें. असें बोलून ते आज्ञा करितात कीं, तूं पुणें मुक्कामीं जाऊन श्रीमंतांस भेट ह्मणजे ते तुला आपल्या सान्निध ठेऊन घेऊन आपला राजकीय सुखानुभव देतील. अशी वडिलांची आज्ञा होतांच ते मनांत विचार करितात कीं, जर मी वडिलांच्या आज्ञेप्रमाणें श्रीमंतांचे आश्रयास जाऊन राहिलों तर मला वडिलांची संगति सुटून ईश्वरदर्शनलाभांतही अंतर पडेल. अशा चिंतेंत निमग्न आहेत हें हरिभटबावांनीं पाहून त्यांच्या मनांतील सर्व आशय समजून पुन: ते भास्करपंतास सांगतात,रे तुझे जन्मांतरींचें कर्म राज्यभोग भोगविणारें आहे. ह्याकरितां तें सुख स्वल्प काळ तरी तूं अनुभविलेंच पाहिजे. पुढें त्या सेवाधर्माचा त्याग करून पूर्वीं सांगितल्याप्रमाणें तूं प्रभूचें पादचिंतन करीत जा, ह्मणजे ऐहिक सुख भोगून पारमार्थिक सुखासही पात्र होशील. असे बावांचे आशीर्वचन शब्द त्यांनीं श्रवण करून व विनयपूर्वक वडिलांची आज्ञा मान्य करून ही हकीकत आपले वडील बंधु त्रिंबक हरि यांस कळविली आणि त्यांच्या सहाय्यानें त्यांनीं बंदुकीनें निशाण मारणें, पट्टा तरवार-हात मारणें, व घोड्याची शर्यत वगैरे युद्धचातुर्याचा अभ्यास करीत करीत कुरुंदवाडानजीकच्या गां-

वावर आपला अंमल बसवून कृष्णापैलतीरास असलेला कागवाड हा गांव आपल्या विश्रांतीचा ठिकाण केला व तेथें स्वल्प काळ राहून, गांवास पुरण्याजोगें पाणी लागे अशा ठिकाणीं मोठी विहीर खणून त्या गांवास पाण्याची सोय करून त्या जागीं फुलझाडें लाविलीं आणि त्या गांवास असलेल्या कृष्णा नदीस घांट बांधून घाटावर एक मोठें देवालय बांधून त्यांत आपले पितामह बाळंभट यांचे नांवें बाळेश्वर या नांवची लिंगस्थापना केली, व त्या लिंगाची पूजा वगैरे करण्यास एका मनुष्यास सांगून, त्यास निरंतर चालेल अशी जमीन देऊन स्थाइक केलें. पुढें कांहीं दिवसांनीं तासगांवकर परशुरामभाऊ साहेबांकडून त्या देवास अभिषेक, पूजन, ब्राह्मणभोजनादि क्रम चालू झाला. तो अद्यापि जमखंडी संस्थानाकडूनच प्रतिवर्षास होत असतो. असो. भास्कर हरि कुरुंदवाडांत राहून, मिरज किल्लेदार डुबल होते त्यांची किल्ला व गांवठाणें रक्षण करण्याची दक्षता कशी आहे ही पाहून त्यांत कांहीं कमीपणा असल्यास श्रीमंतास कळवून प्रसंगीं आपलें शौर्यही दाखवावें या हेतूनें तशा शूर मंडळीचा जमाव जमवून मिरजेची कृष्णा नदी उतरून आलीकडे गांवावर येऊन कांहीं घरांतील व कांहीं रानांतील गुरें वळवून कृष्णापार होऊन कुरुंदवाडास घेऊन जावीं, व त्यास कोणी हरकत करण्यास आल्यास त्याजवर हत्याराचे वार करावे आणि आपण शत्रूचे हातीं लागूं नये. याप्रमाणें मध्यें मध्यें कांहीं दिवस सोडून सोडून करीत असतां पर्जन्यकाळामुळें कृष्णेस पूर आला, तरी त्यांनीं मुखांत तरवार धरून नदी पोंहून मिरजेच्या तीरावर येऊन पूर्ववत् गुरें वळवून कृष्णापार व्हावें. याप्रमाणें पुनः पुनः करीत असतांही त्या डुबलाकडून कांहींच प्रतिबंध होत नाहीं, असें समजून हा सर्व प्रकार श्रीमंतास पत्रद्वारा निवेदन केला. तें पत्र श्रीमंतांनीं पाहून, जर भास्कर हरि हे मोठे धैर्यवान आहेत तर त्यांनीं आम्हांकडे यावें, असें गोविंद हरींस सांगितलें व डुबल हा, मिरज किल्ला संरक्षणास, योग्य नाहीं असें समजून पुढें थोड्याच वर्षांत त्याजकडून तो किल्ला काढून नारायणराव घोरपडे

इचलकरंजीकर यांजकडे दिला. पुढें भास्कर हरीनें आपले वडील हरिबावा यांची आज्ञा घेऊन जमावानिशी ते श्रीमंताकडे पुण्यास गेले. तेथें श्रीमंताचे दर्शनास जातांच त्यांनीं पूर्वी भास्कर हरीचे गुण ऐकिलेच होते. यामुळें भास्कर हरीची आपल्याकडे आश्रयास आलों आहे वगैरे विनयाची विनंति ऐकून त्या बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांनीं त्या भास्कर हरीस जमावानिशीं आपल्यापाशीं ठेवून घेऊन त्यास दरसाल जाततैनात पांच हजार रुपये व तेहतीस हजार रुपये स्वारांस आणि पालखी चोबदार वगैरे इतमाम व कापड वगैरेंस तीन हजार एकूण एकेचाळीस हजार रुपये दरसाल देण्याची कबुली करून इतर थोर सरदारांप्रमाणें त्यासही सरदार केलें. नंतर भास्कर हरि हे सरदारी काम करीत असतां सरकारी काम बहुत हुशारीनें करितात असें श्रीमंतांनीं पाहून ते त्याजवर फार लोभ करीत असत. भास्कर हरि वर्षांतीं चार महिने आपले घरीं कुरुंदवाडास येऊन आपले वडील हरिबावा व वडील बंधु त्र्यंबक हरि वगैरे यांच्या समागमें राहून हरिभटबावांनीं सांगितल्याप्रमाणें श्रावण शुद्ध ४ पासून लहान लहान मुलांकरवीं पार्थिव व श्रीगणेशमूर्ति करवून भाद्रपद शुद्ध ४ व्रत पूर्ण करून व इतर श्रीगणेशमहोत्सव करून कांहीं दिवस राहून पुनः पुण्यास श्रीमंतांचे सेवेस जाण्याचें करीत. याप्रमाणें कांहीं वर्षे गेल्यावर एके वर्षी श्रीगणेशोत्सवाचे दिवस समीप आले असून त्र्यंबक हरि हे आपल्या सरकारी कामामुळें श्रींचे उत्सवास आले नाहींत, म्हणून भास्कर हरीनीं त्यांस येण्याविषयीं पत्र पाठाविलें. त्याचे उत्तरीं त्यांनीं भास्कर हरीशीं असा एकोपा दर्शविला कीं, तुम्ही तेथें असतां मीं आलेंच पाहिजे असें नाहीं. आपण उत्सव आरंभिल्याप्रमाणें करीत जावा असा अभिप्राय कळविला. त्यावरून व इतर कागद आणि ऐकीव गोष्टींवरून ते उभयतां एकत्र असून परस्पर प्रेमानेंच होते, असें स्पष्ट दिसून येतें.

भास्कर हरि हे प्रतिवर्षी पुण्यास जाऊन पुनः कुरुंदवाडीं वडिलांचे दर्शनास येत असत. त्यांच्या मनांतून जर पूर्वी वडील हरिभटबावांनीं

आपल्याकडून श्रीगुरुदत्त पाउलाची स्थापना करविली आहे तर त्यावर पुनः काम करण्यास वडिलांची आज्ञा घ्यावी, असें मनांत आणून तो मजकूर वडिलांस कळवून त्याकामीं त्यांची आज्ञा घेतली. नंतर त्यांनीं सांगितल्याप्रमाणें तेथें सुशोभित दगडी देवालय व लांकडी सभामंडप करून त्यांतील श्रीगुरुपादुकापूजनार्थ भानुभट गुळवणी यास नेमून प्रतिदिवशीं पूजा नैवेद्य दीपादि सोय करवून आपण स्वतः गुरुप्रतिपदा व गुरुद्वादशीस विशेष उत्सव करून बहुत द्रव्य वेंचून ब्राह्मण भोजनादि करीत, यामुळे पूजा करणारास पुष्कळ द्रव्य मिळून त्याची वृत्ति चांगली चाले. हें सर्व भास्कर हरीचें करणें हरिभटबावांनीं पाहून परम संतोषानें आपलें नित्यानुष्ठान आटपल्या नंतर केव्हां श्री-गुरुपादुकासन्निध केव्हां कृष्णातीरीं केव्हां श्रीनरसिंहवाडींत देवापुढें बसून पुढें अस्तमानास संध्यावंदन करून घरीं येत. याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर बावांस चतुर्थाश्रमाचा निजध्यास लागून वारंवार आतां मला स्वानंदवास मिळावा व श्रीगजाननाचें दर्शन व्हावें आणि पुनः यात्राप्रसंग घडावा, असें संगतीस असणाऱ्यांशीं भाषण करीत. हें पुत्रांनीं श्रवण करून ते वडिलांस विनंति करितात कीं, आतां आपल्यास अतिवृद्धावस्था आली आहे, कारितां आतां आपलें घराबाहेर जाणें होऊं नये. परंतु ती पुत्रांची विनंति त्या पूर्णवैराग्यसंपन्न हरिबावांस कांहींच आवडत नसे. तथापि ते पुत्र असें मनांत आणीत कीं, हे आपले वडील असून महातपस्वी, यांच्या तपोबलानें आपल्यास हें वैभव मिळत आहे, तर यांचा वियोग होऊं नये या हेतूनें त्यानीं आपल्याजवळ घरीं राहावें. यास्तव वारंवार ते अनेक युक्ती लढवीत परंतु पुढें हरिबावांचेठाईं उत्तरोत्तर मुमुक्षता वाढत असल्यामुळें ते सर्व संग परित्याग करून भूस्वानंदाचे ह्मणजे मोरेश्वराचे यात्रानिमित्तानें एकटेच घरांतून बाहेर जाण्यास सिद्ध झाले. हें पुत्रादिकांनीं पाहून विनंति केली कीं, ह्या वृद्धावस्थेंत यात्रा ही महा दुःखद आहे, तथापि ती आपणास करावीच वाटल्यास बरोबर गडीमाणसें स्वाऱ्या वगैरें सर्व सिद्ध आहे तें घेऊन जाण्याचें करावें. अशी विनंति ऐकून

बावा बोलतात, आतां ही तुमची राजकीय संपत्ति व गडीमाणसें घोडीं हीं आह्मांस नकोत. श्रीगजाननाचे आज्ञेप्रमाणें येथें राहून ही संपत्ति जितकी अनुभविण्याची होती तितकी अनुभविली. आतां आमच्या संगतीस आमच्या खांद्यावरील पडशी ही महा कामधेनु आहे. ही असली ह्मणजे ती संगतीस असणाऱ्याची व आमची सर्व कामना पूर्ण करील. असें बोलून श्रीकामधेनु पडशी आपल्या खांद्यावर टाकून हरिभटबाबा घराबाहेर निघाले. त्यावेळीं त्या कृष्णंभटबावा वगैरे हरिभटजींचे पुत्रांस पूर्वीं कांहीं वर्षांमागें मातोश्रीच्या वियोगामुळें कष्ट झालेच होते त्यांहूनही हरिभटजी बाहेर निघाल्यानें बहुत कष्ट झाले. तथापि त्रिंबक हरि वगैरे पुढें होऊन मोठ्या नम्रतेनें विनंति करूं लागले कीं, आजपर्यंत आपले दर्शनसेवनादियोगानें आमचीं सर्व विघ्नें दूर होऊन उत्तरोत्तर आमचें महत्व वाढत आहे, परंतु त्या दर्शनाचा लोप झाल्यावर आज आह्मी निराधार झालों. असा अनेकवार पुत्रांचा दीन शब्द श्रवण करून ते सांतवनपूर्वक वागणुकीचा उपदेश करूं लागले कीं, तुह्मी असे उदासीन होऊं नका. आह्मा सर्वांस अभीष्टदाता जो श्री गजानन आहे त्याचे ठायीं चित्त ठेवा आणि आपण बंधु बंधु एकोप्यानें व एका विचारानें वागा. आणि "कलौसंघबलं प्रोक्तं" या प्रभूच्या वाक्यावर विश्वास ठेवा ह्मणजे सत्कीर्त्यादि संपत्तीनें संपन्न होत्साते चिरकाल सुखी राहाल. अशा उपदेशानें पुत्राचें सांत्वन करून भटजी कांहीं शिष्यमंडळीसह तीर्थयात्रेस निघाले. यापुढें झालेलें भटजींचें वर्तन पुढें १० वे भागांत लिहूं.

इकडे घरीं राहिलेले भास्कर हरि कांहीं दिवसांनीं प्रतिवर्षाप्रमाणें पुण्यास श्रीमंताचे फौजेंत आपले जमादानिशीं हजर झाले. त्यांनीं सरकारच्या कामगिऱ्या कांहीं दिवस बजावून नंतर नालबंदी रोजमुऱ्याबद्दल सरकारांत राहिलेला ऐवज व कापड घेऊन घरीं कुरुंदवाडास येतेवेळीं मार्गांतील प्रतिबंधक चौकीदारास दाखविण्याबद्दल सरकारचा दस्तक ता. १९ जिल्हेजचा घेऊन कुरुंदवाड मुक्कामीं आले. (तो दस्तक हजर आहे.) पुढें वडील बंधु कृष्णंभटजींच्या स-

मागमें राहून श्रीची उपासना करीत असतां त्यांनीं हरिभटबावांबरोबर तीर्थयात्रानिमित्तानें संचार केलेल व जे बावांच्या सेवाधर्मानें संगतीस गेलेले भिक्षुकांस हरिभटबावांच्या आज्ञेवरून त्या त्या भिक्षुकांस त्यांच्या महत्वानुरूप कोणास शंभर, कोणास दोनशें, कोणास चारशें, कोणास पांचशें व कोणास हजार रुपये असी दक्षिणा देऊन संतुष्ट केले. या कृत्यांनें भास्कर हरीनें आपले अंगीं असलेला वडिलांची आज्ञा पालन करण्याचा धर्म आणि दातृत्वाचा गुण प्रसिद्ध केला, असें लोक बोलूं लागले. नंतर कांहीं दिवस पुण्यास न जातां मुदती-पुढें घरीं राहिले, सबब श्रीमंत सरकारचें पत्र "हल्लीं सरकारस्वारी कूच होऊन डेऱ्यांत दाखल झाली, परंतु तुह्मी अद्यापि आला नाहीं, ही कोण गोष्ट? तर पत्र पाहतांच आपले जमावानिशीं निघून येणें" ह्मणून पत्र आलें, तें हजर आहे. तें पत्र पाहतांच मोठ्या त्वरेनें आपले स्वार वगैरे लोकांचा जमाव करून वडील बंधूची आज्ञा घेऊन श्रीमंताचे स्वारींत पोंहोचले. नंतर यजमानाच्या शत्रूंवर वारंवार मोठ्या हुषारीनें हल्ले करून आलेल्या बंडखोरांस आपल्या हद्दींतून पार केलें. असा त्या भास्करहरीचा पराक्रम पाहून स्वारी पुण्यास परत आल्यावर श्रीमंतांनीं भास्करहरीस पुढें बोलावून आज्ञा केली कीं, तुह्मीं सरकारी मिरज किल्यानजीक किल्लेदारावर नजर ठेवून राहावें; तेथें तुह्मांस घर बांधण्यास जागा व फुलें, भाजी, वगैरे उत्पन्नास जमीन व जनावरांस गवत याप्रमाणें सरकारांतून बक्षीस मिळेल. असें सांगून मिरज किल्लेदारास सदर्हप्रमाणें स्वाधीन करण्यास आज्ञा केली. पुढें कांहीं दिवसांनीं प्रतिवर्षाप्रमाणें भास्करहरि घरीं जाण्यास निघाले तेव्हां मिरजेस येऊन किल्लेदारास भेटल्यावर त्या किल्लेदारानें सरकार ताकिदीप्रमाणें घर बांधण्यास व घोडेस्वार राहण्यास जागा व जमीन व जनावरांस कापणी सुरू झाल्यापासून तें गवत संपेपर्यंत रोज गवताचीं उंटावरील दोन कवाडें देण्याचें केलें. तें भास्करहरीचे ताहायांत मात्र उपभोगांत आलें. पुढें त्यांचे वंशिक घरजागा व जमिनीचा अद्याप-पावेतों उपभोग घेत आहेत. गवताचीं कवाडेंही चालू राहावयाचीं,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



परंतु आपआपसांतल्या कलहामुळें तीं किल्लेदाराकडे राहिलीं. मिरजेंत राहण्याचें ठरवून भास्करपंतआपा कुरुंदवाडास बंधुदर्शनास जाऊन त्यांस वरील मजकूर निवेदन करून आपल्यास पूर्वी त्र्यंबकहरीनें घर बांधण्यास सामानसुद्धां जागा दिली होती, तिजवर घर न बांधतां तें लांकूड वगैरे सर्व सामान मिरजेंत घर बांधण्यास पाठवून आपण मिरजेंत राहण्यास बंधूची आज्ञा घेऊन सकुटुंब भास्करपंतआपा मिरजेस आले. नंतर कांहीं वर्षें तेथील शिष्ट ब्राह्मणांस व तेथें अश्वत्थारोपण केलें, त्याचे रक्षणार्थ कुरुंदवाडीं वारंवार द्रव्य पाठवीत असत. आतां ते वृक्ष कोणे स्थळीं आहेत हा लेख सांपडत नाहीं. मिरजेंत घर बांधणें चालू करून आपण जमावानिसीं पुण्यास चाकरीवर गेले. तदनंतर भास्करहरि हे अल्प जमावाचे असून मोठमोठीं कामें करूं लागले हें पाहून श्रीमंतांनीं संतोषानें शेडसाळ हा गांव त्र्यंबकहरींकडून काढून त्यांजकडे दिला. त्याजबद्दल मिरज किल्लेदारास जें ताकीदपत्र दिलें आहे त्याचा उतारा:— "राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री शिवाजी बल्लाळ गोसावी यांसीं– सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहीत जाणें. विशेष मौजे शेडसाळ कसबे शिरटी प्रांत मिरज हा गांव राजश्री त्र्यंबकहरि यांजकडुन दूर करून सालमजकुरीं राजश्री भास्करहरि यांस दिला आहे. तर तुह्मीं आपल्या तर्फेनें हरएक बाबतींत उपसर्ग न लावणें जाणिजे. छंद्र २३ रबिलाखर सुरु सन खमस खमसेन मयाव अलफ बहुत काय लिहिणें मोर्तब सुद्रा आहे." असा हा गांव श्रीमंताकडून भास्करहरींस बक्षीस मिळाल्यावर त्यांस त्याखेरीज जाततैनात व स्वारांचा रोजमुरा वगैरे दरसाल येण्याचा त्याप्रमाणें येत असून सालाबादप्रमाणें घरीं मिरजेस येऊन पुन: चाकरीवर हजर रहात. असीं कांहीं वर्षें गेल्यावर पुढें रघुनाथराव पेशवे यांनीं लाहोरचा किल्ला घेऊन तेथील लष्करावर आदीजाबेगास सुभेदार करून ठेवून आपण पुण्यास परत आले.

सो इकडे सावनूरकराचें बंड बहुत वाढलें होतें त्यावर श्रीमंत खुद्द

आपण भास्करहरि वगैरे सरदार बरोबर घेऊन सावनूरच्या रस्त्यावर आले. मग भास्करहरीस आपली हजूरची फौज बरोबर घेऊन शत्रु पाहतांच हल्ला करावा ह्मणून आज्ञा केली. त्याप्रमाणें शत्रूचा जमाव नजरेस पडतांच भास्करहरीनें आपल्या सैन्याचा वेढा देऊन हत्यारांचें काम चालू केलें. मग थोड्याच वेळांत शत्रूचा पराभव होऊन ते सावनूरचें गांवठाणांत शिरले. पण त्या गांवावरही हल्ला करितांना शत्रूचा मारा सहन करून आंत शिरते वेळीं भास्करहरीचे गालास बंदुकीची गोळी लागून गाल छिन्नविच्छिन्न झाला. तथापि त्यांनीं त्या वेदना सहन करून धैर्यानें लूट करीत करीत शत्रूस पकडून आपल्या सैन्यांत आणिलें. त्यावेळचें त्या लष्करांतून आलेलें जें पत्र त्यांत भास्करहरीस गोळीचा जखम गालास होऊन बहुत खैर झाली या मजकुराचें तें पत्र हजर आहे. असो. पेशव्यांचे सैन्यांत आणलेला शत्रु शरण आल्यामुळें रघुनाथरावांनीं त्याजकडे सुमारें वीस हजार रुपये वसुलाचा गांव ठेवून मावशी वगैरे त्याचे महाल आपल्या अमलांत घेऊन स्वारी पुण्यास परत आली. नंतर थोड्याच दिवसांत आपल्या बरोबर स्वारींत आलेल्या सरदारांची सभा करून त्यांत भास्करहरींनीं जखमा सोसून मोठ्या धैर्यानें शत्रूस हातीं घेतलें त्यामुळें त्यांनीं जी जी लूट मिळविली आहे ती त्यास बक्षीस, असा बहुमानाचा शब्द सर्वांस कळे असा करून विडे देऊन निरोप दिला. नंतर भास्करहरींनीं, आपल्या वडिलांच्या पुण्यप्रभावें निर्विघ्नपणें हा लाभ झाला हा वडिलाचा महिमा वारंवार आठवून त्या द्रव्यापैकीं कांहीं द्रव्य पुणें मुक्कामींच धर्म करून बाकीचें सर्व द्रव्य घेऊन ते मिरजेस घरीं आले, तों थोड्याच दिवसांत सोमवतीव्रताचा दिवस प्राप्त झाला. त्या दिवशीं त्यांनीं त्या मिळालेल्या द्रव्यांतून सुवर्णाच्या नाण्यांपैकीं पुतळ्या, होन, फलम काढून घेऊन आपली पत्नी ( व सुनांस त्यांच्या योग्यतेनुरूप कोणास पुतळ्या, कोणा एकीस होन, फलम, अशीं नाणीं प्रत्येकीस अष्टोत्तरशत अष्टोत्तरशत देऊन सांगितलें कीं, तुह्मीं श्री अश्वत्थावर जाऊन ह्या सुवर्ण नाण्यांनीं सोमवती व्रताचरण

करावें. अशा आज्ञेसह तीं सुवर्णनाणीं कारकुनानें घेऊन भास्कर हरींची पत्नी सावित्रीबाई साहेबांकडे येऊन यजमान साहेबांची झालेली आज्ञा निवेदन करून बाईसाहेबांपुढें सर्व नाणीं ठविलीं. नंतर बाईनीं तीं सर्व नाणीं पहतांच पूर्वीं आपल्या विवाहकालीं आपल्यास दागिने घालतेवेळीं आपले श्वशुर हरिभटबावा व त्यांची पत्नी गौराबाई जी आपली सासू या उभयतांचे आपलेपुढें झालेलें सर्व भाषण मनांत आणून मोठ्या गहिंवरानें त्या हरिभटबावांचें पादचिंतन करीत स्तब्ध बसल्या. मग कांहीं वेळानें गहिंवर सावरून चांगल्या सावध होऊन, नाणीं घेऊन आलेल्या सर्व कारकून वगैरे यांस पूर्वींचें वर्तमान सांगूं लागल्या कीं, पूर्वीं माझ्या विवाहांत दागिने घालतेवेळीं माझ्या सासूबाईनें आपले यजमान हरिभटबावा यांस विनंति केली कीं, ही माझ्या सर्व सुनांत लहानगी (कुसदुणी ह्मणजे लाडकी सून) असल्याबद्दल इला कांहीं दागिने व पुतळ्यांच्या वगैरे माळा व चांगलीं वस्त्रें असावींत. अशी पत्नीची प्रार्थना श्रवण करून ते आशीर्वादपूर्वक भविष्य कथन करूं लागले कीं, अगे, ही तुझी सून आपल्या अंगावर बहुमोलाचे बहुत दागिने घालणारी होईल; इतकेंच नाहीं, तर ही दुसरे भिक्षुक जन देवतादिकांसही सुवर्णमय दागिने पुतळ्यादि नाण्यांचा धर्म करील, असें बोलून आपल्याजवळ असलेलें पांच पुतळ्यांचें गांठलें व गवती सोंवळ्याचें वस्त्र हवालीं केलें. मग त्या गौराबाईनीं ते जिन्नस घेऊन मला तें वस्त्र नेसविलें व कंठांत गांठलें बांधून त्या मजसीं असें बोलल्या कीं,तुला यजमानांचे आशीर्वादेंकरून पुढें पुष्कळ दागिने व वस्त्रें मिळतील बरें, असें जें भाषण केलें तें आज अनुभवास येत आहे. हे त्या बाईसाहेबांचे शब्द श्रवण करणारांस बहुत आश्चर्य वाटलें. असो. तीं नाणीं वगैरे पूजासाहित्य घेऊन अश्वत्थपूजनास बाई निघाल्या, तेव्हां बरोबर असणाऱ्या कारकुनास भास्करहरींनीं आज्ञा केली कीं, नाणीं वगैरेंनीं यथाविधि अश्वत्थ पूजा करून तीं नाणीं इकडे घरीं आणा, मग आह्मी त्या नाण्यांचा विभाग जोशी व उपाध्येब यांस करून देऊं, असें सांगून अश्वत्थाकडे पाठविलें. तेथें

मोठ्या समारंभाने पुजनादिक व्रत सांग करून घरीं नाणीं घेऊन नि-
घालेल्या कारकून वगैरेस जोशी मंडळींनीं पाहून आपल्यांस सर्व
नाणीं मिळावीं या हेतूनें त्यांनीं नाण्यावर हात घालून भास्करहरींचा
हुकूम अमान्य करून कलहास आरंभ केला व तो विशेषच झाल्यामु-
ळें भास्करहरींकडून आणखी कांहीं मनुष्यें येऊन त्यांनीं तो कलह
दूर करून ते तीं नाणीं घेऊन घरीं आले. यावर भास्करहरींनीं आ-
पला हुकूम जोशी मंडळींनीं अमान्य करून विशेष कलह केला,
सबब त्यांस आजपासून आमच्या घराण्यांतील सोमवती व्रतांतील
जोशीपणाबद्दल मिळण्याचा जो अंश तो द्यावयाचा नाहीं, असा नि-
र्बंध केला. तो दाखला बहुत वर्षें चालू असलेला अद्याप सर्व लोकांस
जाहीर आहे. पुढें कांहीं दिवसांनीं भास्करहरि पुण्यास चाकरीवर
जाऊन प्रतिवर्षाप्रमाणें घरीं आल्यावर दंपत्यपूजनाचें सुवर्णालंकारा-
दि साहित्य तयार नकरू ब्राह्मण सुवासिनींची पूजा केली. त्यांतही
बहुतच द्रव्यव्यय केला व याप्रमाणेंच त्यांनीं त्याच्या पुढील वर्षीं पु-
ण्याहून घरीं आल्यावर उत्तम प्रतीचें गृह तयार करवून त्यांत धान्य
वस्त्रपात्रादि सर्व शास्त्रोक्त वस्तु ठेवून तें गृह ब्राह्मणास दान क-
रून त्यास दाखल्याबद्दल दानपत्र करून दिलें, तें हजर आहे. पुढें
एका वर्षीं उतारू मनुष्यांचा उपयोग होण्याजोगी विस्तीर्ण धर्मशा-
ळा बांधविली. आणि तसेंच वटाश्वत्थाचे तरुवरांस पार तयार केले.
याप्रमाणें घरीं आल्यावर उत्तम प्रतीच्या पक्वान्नांचें सहस्र ब्राह्मण-
भोजनादि धर्मकृत्यें करून वारंवार अनेक ब्राह्मण संतुष्ट केले. मग
कांहीं दिवस घरीं राहून पुनः पुण्यास गेले. पुढें थोड्याच दिवसांत
सोनपत पानपतावर पेशवे सरकारचा मोड होऊन कत्तल झाल्या-
मुळें दुःखित होत्सातें बाळाजी बाजीराव पेशवे यांस सुमारें पांच
महिन्यांनीं देवाज्ञा झाली. त्यांच्या मागें थोडे दिवसांनीं माधवराव बल्ला-
ळ ह्यांस पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. त्यांनीं आपल्या पूर्वजांची जी लूट
पानपतावर झालेली ती शत्रूंनीं फत्तरगडावर ठेविलेली बातमी घेऊन
ती लूट पुनः परत आणण्याबद्दल विनीवाले वगैरे सरदारांस त्या फत्तर-

गडावर जाण्याचा हुकूम केला त्यांत भास्करहरि हे होते. हें वर्तमान गोविंदहरि व गोपाळराव गोविंद यांस समजतांच ते भास्करहरींजवळ येऊन असा बोध करूं लागले कीं, तुह्मांस उत्तर देशीं फत्तरगडावर जाण्यास श्रीमंतांची आज्ञा झाली आहे, परंतु ती उत्तरदेशावर जाण्याची चाकरी आमच्या कबुलींत नसून आपणास झाली ती आपण कबूल केली ह्मणजे आह्मांसही त्याचप्रमाणें तिकडे जाण्यास हुकूम होणार, सबब आपण ती आज्ञा अमान्य केली पाहिजे. कदाचित् त्यांनीं तुह्मांस चाकरीवरून दूर केल्यास आह्मी तुह्मांस आपल्या लष्करांत ठेवून घेऊन आतां जसें तुमचें चालत आहे त्याप्रमाणें पुढें आह्मीही चालवूं. यांत कांहीं अंतर करणार नाहीं. असा प्रतिज्ञापूर्वक त्या बंधूचा व त्यांच्या पुत्रांचा बोध श्रवण करून भास्करहरीनें असा विचार केला कीं, हे माझे प्रत्यक्ष बंधु आणि त्यांचे पुत्र हे उभयतां सत्यवादी आहेत, ते खचित मला अंतर देणार नाहींत, असें समजून दुसरे दिवशीं श्रीमंतांस उत्तरदेशीं जाण्याविषयींची आपली अमान्यता कळविली. ती श्रीमंतांनीं श्रवण करितांच त्यांनीं भास्करहरीस चाकरींतून दूर केलें. हें गोविंदहरींनीं श्रवण करून लगेच भास्करहरींजवळ येऊन त्यांचे स्वार वगैरे सर्वांस आपल्या ताब्यांत घेऊन भास्करहरीस असें सांगितलें कीं, आपण घरीं जावें; तेथें तुह्मांस बसून दरसाल पांच हजार जाततैनात वगैरे चालवीन व स्वारही आपले चालतील. इतकें आश्वासन देऊन त्यांना घरीं मिरजेस पाठविलें. ते घरीं येतां येतां मार्गांत श्रीपंढरीस जाऊन तेथें श्री पंढरीनाथास आपल्यास मिळालेली जी चोपदार काठी वगैरे राजचिन्हें तीं सर्व देवास अर्पण करून मिरजेस आले. हें वर्तमान श्रीमंतांनीं श्रवण करून गोपाळराव गोविंद यांपाशीं असें भाषण केलें कीं, आह्मीं भास्करहरीस जरब बसण्याकरितां मात्र चाकरीवरून दूर होण्याचा हुकूम केला. परंतु तो त्यांनीं खराच मानून ते क्षमा न मागतां आपल्या घरीं गेले, हा एक तुमचे कुलांत मोठा निस्पृह व निर्लोभपणा दृष्टीस येतो, असें बोलून त्यांस आज्ञा केली कीं, त्या भास्करहरीस तुह्मीं समजून सांगून परत आणावें. हे श्रीमंतांचे शब्द

श्रवणीं येतांच गोपाळराव गोविंद यांनीं अशी विनंति केली कीं, आमचे भास्कर काकांनीं आपली राजचिन्हें श्रीपंढरीनाथास अर्पण करून, आपण घरीं राहुन हरीबावांनीं उपदेश केल्याप्रमाणें ईश्वराराधनच करावें अशी इच्छा धरिली आहे. असी श्रीमंतांची समजूत करता त्यांनीं गोपाळरावांस पुनः असी आज्ञा केली कीं, तुमचे फौजेंत त्या कडील मनुष्यें घेऊन त्या भास्करहरींस पूर्वीप्रमाणें चालवावें. तें गोपाळराव यांनीं मान्य केलें. पुढें कांहीं दिवस गेल्यावर सदरीं गोपाळराव यांस आज्ञा केलेली सरकारचे स्मरणांत होतीच. पुढें सरकारांनीं सरंजामी लोकांच्या जाततैनाता वजा करून स्वारांची एकसाली घेतली, त्यावेळीं भास्करहरींची जाततैनात वजा करून स्वारांच्या एकसालीचा पैका घेतल्याचा दाखला आहे. पुढें गोविंदहरींचे नांवें बेहडा झाला. त्यांत त्यांनीं मिरजकर वगैरे अकरा सरंजामींप्रमाणे भास्करहरींचें सरंजामी लोकांत नांव घालविलें. असो. या भास्करहरींस सहा पुत्र होते. प्रथम धोंडोभास्कर ऊर्फ धोंडोबादादा, दुसरे विनायकभास्कर ऊर्फ विनोबाआबा, तिसरे हरिभास्कर ऊर्फ हरीबाआण्णा, चवथे सदाशिवभास्कर ऊर्फ सदोबाभाऊ, पांचवे वासुदेवभास्कर ऊर्फ वासुदेवरावदाजी, सहावे रामचंद्रभास्कर ऊर्फ बळवंतराव. असे या या नांवांनीं प्रसिद्ध असून शौर्यादि गुणांनींही युक्त असल्याबद्दल यांतील चौघांस श्रीमंतांनीं परशुराम रामचंद्र ऊर्फ भाऊसाहेब पटवर्धन यांच्या हाताखाली हुजुरांत फौजेंत ठेवून घेऊन विनोबाआबा व हरबाआण्णा या प्रत्येकास दरसाल पांच पांच हजार जाततैनात व पालखी वगैरे इतमामाबद्दल अडीच अडीच हजार व वासुदेवराव दाजी व रामचंद्रभास्कर या प्रत्येकास दोन दोन हजार रुपये जाततैनाती व एकेक हजार इतमामखर्चाबद्दल दरसाल देण्याच्या कबुलानें ठेवून घेतलें. खेरीज महत्वाचें काम केल्यास बक्षीसही देत असत.

## भाग ८ वा.

याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर कर्नाटक देशांत हैदरखानाचा उपद्रव होऊन तुंगभद्रातीरावर त्याचा अंमल पूर्ण बसल्याचें पुण्यास श्रीमंतांस कळून त्यांनीं तो अंमल दूर करण्यास परशुरामभाऊंस आज्ञा केली, तेव्हां भाऊसाहेबांनीं आपले धाकटे बंधु विनोबाआबा व हरबाआणा व विठ्ठलरावबाबा यादवाडकर व मेघःश्यामराव बापु मंगळवेढेकर वगैरे मंडळी व इतर हुजूरची फौज घेऊन ते तुंगभद्रातीरांवर आले. तों शत्रूंचा जमाव विशेष असल्याचें समजतांच त्यांनीं आपल्या सैन्याच्या चार टोळ्या करून शत्रूंवर एकदम चाल केली हें हैदराकडील सरदारांनीं पाहून त्यांनींही त्याचप्रमाणें सैन्याचे चार विभाग करून ते टोळी टोळीवर चाल करून आले. ज्या टोळींत हैदर वगैरे मुख्य सरदार होते तीच टोळी परशुरामभाऊ बंधूसहित ज्या टोळींत होते त्यांवर चालून आली व परस्पर सरदार आपलें युद्ध चातुर्य दाखवूं लागले त्यांत परशुराम भाऊंचे पदरीं रामजी या नांवें कोणी बारगिरांवरील अधिकारी होता तो हैदराकडून जो जो सरदार गोळीचे पल्यांत येईल त्याला त्याला यम लोकास पाठवूं लागला हें त्याचें गोळीचें काम चालू असलेलें इतर शूर लोकांनीं पाहून त्याला त्यापैकीं कितीएक शूर भले शिपाई शाबास असा शद्ध करीत व कितीएक असे ह्मणत कीं, हें काम पट्टा किंवा तरवारीनें केलें असतें ह्मणजे त्यास वाहवा शाबास हो शाबास हा शद्ध मिळता. हा वीराचा नियम विनोबाआबांनीं श्रवण करून ते शूरांस कळवितात कीं, पहा मी या हत्तीवरील बंदुकबारदारास मारितों. असें बोलून त्याचा गोळी उडतांच त्यानें दुसरा बार भरण्याच्यापूर्वीं यांनीं आपला घोडा उडवून मोठ्या वेगानें घोड्याचे पाय हत्तीच्या दांतांवर ठेवून गंड स्थळावरील बंदुकबारदार पट्यानें मारून ते पुनः आपल्या सैन्यांत आले. याप्रमाणें वारंवार क्रम सुरू असलेला परशुरामभाऊ वगैरे शूरांनीं

ना.

पाहून त्यांनीं विनोबाआबांस बहुत गौरवाचे शब्द दिले. असो. थोड्याच वेळांत हैदरानें पळ काढून तो तुंगभद्रा पैल तीरावर गेला हें परशुरामभाऊंच सैन्यानें पाहून सर्वांनीं जयशब्द केला. पुढें रामजी व विनोबाआबा या उभय शूरांवर लोकप्रसिद्ध अशा ह्मणी उत्पन्न झाल्या कीं "आली रामजीची गोळी तर शत्रूनें बांधावी झोळी" "आला विनोबाचा मारा त्याला कोठें नाहीं थारा" ह्या म्हणी बहुत वर्षें शूरमुखांतून निघत असत. इकडे भाऊसाहेब शत्रूंचा पाठलाग करून त्यांस बहुत दूर घालविल्यावर परतून आपल्या पूर्वस्थळीं आले. तों पूर्वीं चार टोळ्या करून हैदरावर गेल्याचें लिहिलें आहे, त्यांपैकीं एका टोळींत सरकारी नगारा, निशाण, वगैरे राजचिन्हें होतीं त्यावरच हैदराकडील पेंढारी वगैरेंनीं गर्दी करून निशाणें वगैरे आपल्या हातीं घेऊन गेल्याचें वर्तमान आलें, तें भाऊंनीं श्रवण करितांच राजचिन्हें परत आणण्याकरितां त्यांनीं हरिभास्कर ऊर्फ हरबाआण्णा पटवर्धन यांस बरोबर फौज देऊन रवाना केलें. ते शरीर बलानें व बुद्धीनें सर्वांत मान्य होते. त्यांनीं युक्ति केली ती अशी भोठ्या वेगाचे घोडेस्वार निराळे काढून त्यांस असा हुकूम केला कीं, तुम्हीं त्वरेनें त्या चोरट्या पेंढाऱ्यांच्या बाजूनें त्यांपुढें जाऊन पुनः त्यांच्या मुखावर येऊन त्यांचा पुढें जाण्याचा मार्ग बंद करावा. असें सांगून त्यांस रवाना केलें. त्याप्रमाणें स्वारांनीं जाऊन त्यांचा पुढें जाण्याचा मार्ग बंद केला, तों मागाहून हरिबाआण्णांनीं आपल्या सैन्याच्या तीन टोळ्या करून त्यांच्या दोन बाजूंनीं दोन व एक पाठीमागून. अशा युक्तीनें धांवत धावत जाऊन चोरटे दृष्टीस पडतांच त्यांस चोहोंकडून हत्यारें व गोळ्यांचा मारा केला. तेव्हां त्यांतील बहुतेक लोक ठार झाले, व कांहीं मूर्च्छित पडले असें पाहून त्यांनीं लूट केली. त्या लुटींत सरकारी राजचिन्हें नगारा, निशाण, वगैरे सर्व सांपडलीं तीं व कांहीं शत्रूंची लूट घेऊन ते परत भाऊसाहेबांजवळ आले, तेव्हां हरबाआण्णा यश घेऊन परत आले हें सर्वांनीं पाहून सर्व लष्करांत जयवाद्यें वाजविलीं. पुढें भाऊसाहेब हैदरानें

पीडा दिलेल्या प्रजेस आश्वासन देऊन त्या देशावर आपले अंमलदार ठेवून आपण सैन्यासह पुण्यास परत आले. तेथें श्रीमंतांनीं दरबार भरवून ह्या हैदरावरच्या स्वारींत परशुरामभाऊंस ज्या ज्या शूरांनीं सहाय्य करून पराक्रमानें शत्रूंचे पारिपत्य केलें त्यांच्या त्यांच्या योग्यतेनुरूप कोणास पोषाख, कोणास अलंकार, कोणास रोख रुपये असे देऊन संतुष्ट केलें. त्यांत विनोबाआबांस बहुमोलाचे पोषाक व अलंकार मिळाले व तसेंच हरबाआण्णांसही बहुमोलाचा पोषाख व चाळीस हजार रुपये रोख बक्षीस देऊन त्याच सभेंत असा शब्द केला कीं, हरबाआण्णांनीं आपल्या शौर्यानें गेलेलें यश पुनः संपादन केलें, शाबास त्यांची असें सर्वांस कळे असें बोलून सभा विसर्जन केली पुढें कांहीं वर्षे अल्प अल्प आलेल्या कामगिऱ्या भाऊ साहेब आपल्या बंधुवर्गासह करीत असत.

पुढें टिपूसुलतान नांवाचा प्रबल शत्रु दक्षिण देशांत उत्पन्न होऊन त्यानें धारवाड किल्ला आपल्या अमलांत घेऊन त्या समीपचे गांवांवर आपली सत्ता ठेविली. हें वर्तमान पुण्यांत श्रीमंतांस कळतांच नाना फडनविसांनीं परशुरामभाऊंस किल्ला परत घेण्याकरितां हुजूरची फौज बरोबर देऊन पाठविलें. तेव्हां ते धारवाडावर येऊन किल्ल्यावरून तोफेचा गोळा न लागे अशा प्रदेशावर आपले स्वार वगैरे सभोंवार ठेवून किल्लेदाराचा दाणा पाणी बंद करून शिपाई लोक न मारतां युक्तीनें किल्ला हस्तगत व्हावा अशा युक्तीनें वागत व मधून मधून तोफांच्या गोळ्यांनीं किल्ल्याचा तट पाडून वारंवार हल्लाही करीत, परंतु शत्रु बहुत जमावाचा असल्यामुळें किल्यांत रीघ होइना. अशा कारणानें काम न होतां बहुत महिने लष्करासुद्धां भाऊसाहेबांस तेथें राहणें भाग पडलें, ह्मणून पुणें दरबारांत त्यांचेविषयीं असे शब्द निघूं लागले कीं परशुरामभाऊंनीं अल्प वयाच्या आपल्या बंधुवर्गास सरकारांतून मोठ मोठ्या तैनाती देववून त्यांसह ते धारवाडावर दिवाळी सण करीत राहिले आहेत. हे शब्द नाना फडणिसांच्या कानीं येतांच त्यांस ते शब्द सत्य असावेत असें वाटून त्यांनीं आपले विश्वासूक रामचंद्रबाबा

व मामा या उभयतांस परशुरामभाऊंकडील खरें वर्तमान घेण्याकरितां धारवाडास पाठविले. ते थोड्याच दिवसांत भाऊसाहेबांचे लष्करांत येऊन त्यांचे भेटीस डेऱ्यांत गेले. त्यावेळीं सर्व मंडळीसह भाऊसाहेब भोजनास बसलेले पाहून ते विनोदानें हास्य करून बोलूं लागले कीं, अहो भाऊसाहेब, तुह्मांवर श्रीगणपतीची कृपा पूर्ण आहे खरी. हे पहा आपले पुत्र व बंधु कोणास अठरा कोणास वीस वर्षें अशा वयाचे, अद्यापि मुखास मिश्रूडही पुरतें आलें नाहीं, परंतु ते शिपाईगिरीच्या थाटावर राहून मोठमोठ्या तैनाती घेऊन पंक्तींत भातरोटीवर शिपाईगिरीचा हात चांगला चालवित आहेत, हें आतां आह्मांस दृष्टीस पडलें. पण अशा रीतीनें किल्ला घेण्यास निदान बारा वर्षें तरी लागतील असें वाटतें असे त्या उभयतांचे विनोदाचे शब्द ऐकून भाऊसाहेबांस व इतर पटवर्धनांस बहुत क्रोधावेश येऊन त्यांनीं त्यांशीं प्रतिज्ञेनें असें भाषण केलें कीं उदईक अस्तमान होण्याच्यापूर्वीं किल्ला घेऊं; न घेऊं तर तुमच्या समक्ष सरकारकामीं हे आपले प्राण देऊं. असा त्या शूरांचा सक्रोध प्रतिज्ञाशब्द त्या उभयतांनीं श्रवण करून ते त्यांचें बारंवार सांत्वन करूं लागले परंतु तें कांहीं त्या पटवर्धनांस रुचलें नाहीं. पुढें भाऊसाहेबांनीं मोठ्या निकरानें युद्ध करण्याची तयारी करून दुसरे दिवशीं सूर्योदयाबरोबर किल्ल्यावर चालून जाऊन तेथें हरिभटबावांचें व श्रीगजाननाचें सर्वांनीं प्रार्थनापूर्वक स्मरण करून युद्धास आरंभ केला तो असा—प्रथम तोफा चालू करून किल्ल्यावर शत्रूकडील मनुष्यांस उभे राहण्याचीही सवड होऊं नये अशी सरबत्ती केली. नंतर किल्ल्याखालीं जाऊन शिड्या वगैरे लावण्याचा यत्न सुरू करून भाऊसाहेब आपल्या बंधुवर्गासह किल्ल्यावर चालून गेले. त्या वेळीं रामचंद्रभास्कर ऊर्फ बळवंतराव पटवर्धन हा सर्वांत वयानें अल्प असून शौर्यानें विशेष असें त्यानें सरकारी निशाण हातीं घेऊन पथ्याचा सळ उपसून सर्वांच्यापुढें चाल केली, तेव्हां तो क्रोधावेशानें पूर्ण झालेला भाऊसाहेबांनीं पाहून हा आवेशानें कोठें तरी घालून घेईल ह्मणून त्याचे मदतीस निशाणाखालचे कांहीं शिपाई लोक व

इतर यादवाडकर वगैरे बंधूंस पाठविलें. ते सर्व किल्याखालीं येऊन शिड्या लावून वर चढूं लागले तों इकडे किल्ल्यावरील लोक तोफांचा मार सोसूनही बुरजावर येऊन शिड्यांवरून येणाऱ्यांवर बंदुका वगैरेंचा भडिमार करूं लागले. तो मार सोसून शिड्यांवर चढणें शिपायांस होईना, हें रामचंद्रभास्करांनीं पाहून त्यांस पाठीमागें करून आपण सरसावून पुढें चढूं लागले, तों दोन प्रहर दिवसा सूर्यसंतापानें तप्त असून शत्रूचा मार सहन करीत तसेंच ते बुरजावर जाऊन तेथें असलेल्या लोकांवर पट्याचे वार करूं लागले. तों शत्रूंनींही त्या बळवंतरावाच्या हातावर व पाठीवर वार केले. तथापि ते वार न जुमानतां ते वाघाप्रमाणें चवताळून मनुष्यांवर धांवून मारूं लागले. तेव्हां भाऊसाहेबांचे सैन्यांतील लोकांनीं रामचंद्रभास्कर निशाणासह बुरुजावर गेलेले पाहून आपणही चोहोंकडून हल्ला करून ते बुरजावर व कांहीं तटावर आले. हें किल्यांतील लोकांनीं पाहून भयानें सर्व एके ठिकाणीं जमून शरण आल्यासारखें दाखवून दरवाज्यानें पळ काढिला. नंतर भाऊसाहेबांनीं पळून गेलेल्या लोकांवर कांहीं फौज पाठवून आपण रामचंद्रभास्करांजवळ आले, तों ते क्रोधावेशानें स्वकीय परकीय मनुष्यांविषयीं ज्ञान नष्ट झाल्यामुळें जो कोणी मनुष्य दृष्टीपुढें येई त्यावर पट्टा चालवूं लागले. हें भाऊसाहेबांनीं पाहून त्यांस दुरूनच बोध करूं लागले, तथापि ते शब्द बळवंतरावाच्या समजुतींत न येतां, धरा धरा, मारा मारा, असे शब्द करीतच अंगावर धावून आले. तेव्हां बहुत प्रयासानें त्यांचे हातांतील पट्टा काढून घेऊन त्यांला बुरुजावरून आपल्या लष्करांतील गोटांत नेवून ठेविलें. हा भाऊसाहेबांचा व त्यांच्या बंधुवर्गाचा व त्यांत विशेष रामचंद्रभास्करांचा पराक्रम त्या नाना फडनविसाकडून आलेल्या रामचंद्रबावा व मामा या उभयतांनीं पाहून ते भाऊसाहेबांशी असें बोलूं लागले कीं, अहो भाऊसाहेब, आपण आपला बंधु रामचंद्रभास्कर हा अशा पराक्रमाचा असून त्यास तुम्हीं सालीना दोन हजारांवरच ठेविलेत? अहो, हा सरदार आहे; याला सरकारांनीं दरसाल निदान दोन चार लक्षांची तरी जाहगीर

याशी. असीं शिफारशीचीं भाषणें करून त्याच वेळीं त्यांनीं सदर शिफारसीचा मजकूर पत्रीं लिहून सांडणीस्वार पुणें सरकाराकडे रवाना केला. इकडे भाऊसाहेबांनीं रामचंद्रभास्करास पूर्व स्थितीवर आणण्याबद्दल पुष्कळ यत्न केला, परंतु क्रोधावेशानें पित्तवायूचा कोप होऊन धरा मारा असे शद्ब करीत ते परलोकास गेले. नंतर भाऊसाहेब बंधुवियोगें शोकाकुल असल्यामुळें स्वल्पकाळ तेथेंच राहून पुढें किल्याचा वगैरे बंदोबस्त करून लष्करासह पुण्यास निघून गेले. तेव्हां भाऊसाहेबांनीं शत्रूंकडून किल्ला परत घेतल्याबद्दल त्यांस व त्यांच्या हाताखालच्या वीरांस बहुमान मिळून ते कांहीं वर्षें सुखानें चाकरी करूं लागले. पुढें कांहीं वर्षें गेल्यावर ह्मणजे तारीख ११ मार्च सन १७९५ इसवी रोजीं श्रीमंत पेशवे सरकारांनीं निजाम सरकाराकडे आपले सवादोन कोटी रुपये येणें आहेत ते मिळावे ह्मणून त्यांस मागणी केली असतां त्यांनीं देणें नाकबूल करून युद्धाचा प्रसंग आणला. नंतर उभयपक्षीं युद्धाची तयारी होऊन नानाफडनिसांनीं आपल्या फौजेवर परशुरामभाऊ पटवर्धन यांस सेनापति नेमिलें. पुढें जयाच्या इच्छेनें त्वरकरून खुद्द पेशवे व निजाम आपआपल्या सैन्यासह परस्परावर चालून आले, ते खर्डा या नांवचे गांवाजवळ बरेच अंतरावर दोन्हीकडील फौजा आपआपलें ठिकाण धरून राहिल्यानंतर युद्धाच्या पूर्व दिवशीं परशुरामभाऊ हे कांहीं स्वार व विनोबाआबा पटवर्धन वगैरे कांहीं थोर लोक बरोबर घेऊन, उदईक युद्धकालीं आपल्याकडील कोणत्या सरदारांनीं कोणत्या स्थळावर उभें राहून युध्दास आरंभ करावा हें नमूद करण्याकरितां आपल्या लष्करांतून बाहेर पडूं लागले, तों रस्त्यांत स्वारींत बरोबर असलेला विठ्ठलराव धोंडदेव ऊर्फ विठ्ठलरावबाबा पटवर्धन हा हत्यार बरोबर न घेतां लष्कर हद्दींत उभा होता, त्यानें भाऊसाहेबांस पाहून आपणही रणभूमि पाहाण्यास त्यांच्या कोतवाल घोड्यावर बसून त्यांबरोबर चालू झाला. पुढें भाऊसाहेब आपले लष्करांतून बाहेर पडून बरेच दूरवर जाऊन, आपण कोठें उभें रहावें

हा विचार करीत असतां त्यांनजीक एका ओघळींत पठाणी घोडे-स्वारांचा नाईक थोडया स्वारांनिशीं छपून राहिला होता, त्यानें भाऊसाहेबांस दुरून पाहून हे थोडे लोक आहेत यांची लूट करावी या बुद्धीनें तो दौड करून भाऊसाहेबांचे पालखीवर चालून आला. हें विठ्ठलरावबाबा पटवर्धनांनीं पाहून जवळ हत्यार नसल्यामुळें त्यांनीं भाऊसाहेबांचे हुजऱ्याजवळ तरवार मागितली, परंतु त्यानें भाऊसाहेबांचे परवानगीखेरीज ती द्यावयाची नाहीं असें म्हणतांच तरवारीचें काम मी मेगसूनें करीन असें हिमतीचें भाषण त्याजबरोबर करून त्या विठ्ठलरावानें आपल्या घोडयावरच्या तोबऱ्यांत असलेल्या मेखांतील एक मेख हातीं घेऊन तो त्या स्वारावर धावला, आणि जो जो पुढें येईल त्याच्या त्याच्या तरवारीवर मेगसू मारून तरवार मोडावी किंवा हातांतून खालीं पाडावी असे करूं लागला. हें त्या पठाणांनीं व त्यांवरील अधिकाऱ्यांनीं पाहून त्यांना त्या विठ्ठलरावाचें भव्य शरीर आणि मेकसू घेऊन तरवारीप्रमाणें काम करण्याचें चातुर्य व धैर्यानें पुनः पुनः धाऊन अंगावर येण्याचें सामर्थ्य हें पाहून बहुत आश्चर्य वाटलें. आणि हा बडा सैतान आहे तर आपण याला जीवंत पकडून आपल्या यजमानाकडे न्यावा, असा विचार करून ते पठाण स्वार व त्यांवरील अधिकारी त्यास धरण्याविषयीं प्रयत्न करूं लागले; व त्या कामीं त्यांनीं कांहीं वेळही घालविला. परंतु त्या विठ्ठलरावाचा त्या मेकसूचा मार त्यांना सोसेनासा झाल्यामुळें त्यातील मुख्य अधिकाऱ्यानें त्या विठ्ठलरावाच्या छातीवर जोड गोळी मारून त्या रावास घोड्यावरून खालीं आणिलें. त्यावेळीं उभयपक्षीं शूरांचा मोठा गलबला झाला. आतां ह्या विठ्ठलरावबाबांची बाल्य व तारुण्यावस्थेंतील वागणूक व सामर्थ्य ह्या ग्रंथकर्त्यानें वृद्धाचे मुखांतून असें ऐकिलें आहे कीं, हा बाबा चवदा वर्षांचे वयांत असतां एकदां त्यानें आपल्या आचाऱ्यास असें सांगितलें कीं, तूं हरभऱ्याच्या पिठाची भजीं करून माझे ताटांत वाढून मला भोजनास बोलाव. मग त्या आचाऱ्यानें तीं भजीं तयार करून घाईमुळें तीं विसरून इतर सर्व पदार्थ ताटांत वाढून

बाबांस भोजनाकरितां बोलाविलें. नंतर बाबा येऊन ताट अवलोकितात तों ताटांत भजीं नाहींत. हें पाहून मोठ्या क्रोधानें तें ताट हातीं घेऊन जोरानें फेंकून दिलें, तें चार पांचशें हातांवर जाऊन पडलें. हें भास्करहरि वगैरे मंडळींनीं पाहून हा मुलगा पुढें बहुत रागीट व मोठा सामर्थ्यवान होणार, असें भविष्य केलें. पुढें त्याचे वयास वीस वर्षे झाल्यावर जेव्हां तो बाबा आपल्या समान वयाचे मुलांबरोबर घोड्यावर बसून जलक्रीडा करण्याकरितां आपल्या बागेंत जाई तेव्हां विनोदानें एखाद्याचें लहानसें तट्टु ( शेळीचे कोकरास जसें उचलून घेतात त्याप्रमाणें ) उचलून विहिरीवरून पाण्यात फेंकून देत असे व केव्हां केव्हां तर मोठा बैल किंवा रेडा सपाट्यानें पुढें चालत असतां आपण मोठ्या लगबगीनें त्या बैलास मागें फिरून मारण्याची फुरसत न देतां त्या बैलाचें शेंपूट धरून मागें दहा वीस हात ओढीत आणून सोडून देत असे. अशा प्रकारचें तो वारंवार सामर्थ्य दाखवून इतर लोकांचे मनास संतुष्ट करीत असे. असो. अशा प्रकारचे हरभटबावांच्या पुण्यप्रभावानें त्यांचे कुळांत महा धैर्य शौर्यानें प्रख्यात वीर पुरुष उत्पन्न झाले होते. अशा पराक्रमाचा विठ्ठलराव खालीं पडतांच पठाणी मुख्य सरदारास पुढें भाऊसाहेबांवर जाण्यास मार्ग झाला. तेव्हां तो वेगानें घोडा उडवून पालखीजवळ येऊन त्याच्या कपाळावर निसुटता वार करून दुसरा वार करण्याकरितां जो हात उचलिला तों विनोबाआबांनीं पाहून त्यांनीं आपल्या पट्ट्यानें त्याचा तो तरवारीसुद्धां हात तोडून खालीं पाडिला. नंतर भाऊसाहेबांचे द्वितीय पुत्र हरिपंतबाबा वगैरेनीं त्यावर हल्ला करून त्या पठाणी सरदारास ठार केलें. हें त्या पठाणी स्वारांनीं पाहून भयानें परत पळ काढिला. मग विनोबाआबांनीं भाऊसाहेबांस आपल्या लष्करांत पाठवून देऊन आपण विठ्ठलराव रणांत पडला होता तेथें जाऊन त्यांस पाहिलें, तों पूर्वीं ज्या हातांत सुवर्णाचें कडें होतें त्या डाव्या हाताचा पंजा गड्डेचोरानें तोडून तें कडें नेलें होतें. पुढें त्याच्या कंबरेस घोड्यावरील काढणीचा फास घालून त्याला आपल्या घोड्यापुढें घेऊन आपल्या लष्कराजवळ ये-

ऊन त्याचें दहन केलें, आणि त्याच्या अस्थि ब्राम्हणाबरोबर मिरजेस पाठवून दिल्या. त्या विठ्ठलरावाच्या पत्नीनें पाहतांच आपले यजमान रणांत पडून स्वर्गास गेले तर त्याबरोबर आपणही तेथें जाऊन स्वर्ग- सुख भोगावें अशा इच्छेनें आणि मोठ्या संतोषानें तिनें वडिलांचा निरोप घेऊन आपण त्या अस्थींशीं सहगमन केलें. हा त्या वीर- पत्नीचा संतोष व धैर्य पाहून थोर थोर लोक त्या पतिव्रतेचें कांहीं दिवस स्तवनच करीत असत. इकडे परशुरामभाऊ लष्करचे गोटांत आल्यावर त्या लष्करांत ही बातमी समजून सर्व लोक त्या रात्रीं जागे राहिले, तों मध्यरात्रीचे सुमारास भाऊसाहेबांच्या पागेंतील एक घोडा पायबंद दवावनापासून सुटून लष्करांतून निघाला, तो शद्ब करीत धांवत धांवत, तेथून एक गोळीचे टप्पावर निजामाकडील स्वाराचा जो तबेला छावणी करून राहिला होता त्या तबेल्यांतील घोड्यावर पडला, त्यायोगें त्या छावणींत बहुत गलबा झाला व त्या स्वारांस असें वाटलें कीं, हा शत्रूंकडील छापा आला त्यामुळें आपल्या घोड्या- सह ते लगबगीनें तेथून निघून त्यांच्या पाठीमागें जी आपली दुसरी छावणी होती तींत शिरले त्या कारणानें त्या छावणींतही परस्पर कोण कोणाकडील हें ज्ञान न झाल्यामुळें पूर्व छावणींतील गलब्या- पेक्षांहा छापा आला अशा शद्बाचा गलबा जास्त होऊन ते आणि ते स्वार त्याही पलीकडच्या छावणींत शिरले.यायोगें उत्तरोत्तर छाव ण्या असलेल्यांतील लोक मागें मागे हटत जाऊन सर्व निजामाच्या लष्करांत अव्यवस्था होऊन खुद्द निजामापर्यंत तो गलबा गेला. तों इकडे परशुरामभाऊंच्या बातमीदारांकडून विनोबाआबा वगैरे भाऊसाहेबांच्या मुख्य मंडळीस निजामाच्या लष्करांत वर सांगित- ल्या कारणानें अव्यवस्था होऊन ते पाठीमागें सरत आहेत, हें सम- जतांच त्या मंडळींनीं आपल्याकडील स्वार व पायदळ लोकांस बंदु- काचे बार करीत पाठोपाठ त्वरेनें रवाना करून आपण भाऊसाहे- बांस सावध करून सर्व वर्तमान कळविलें. आणि त्यांसह तमाम सै न्याच्या दोन टोळ्या करून दोन बाजूंनीं निजामावर चालून जाऊन

त्यावर सारखा बंदुकीचा मार चालू केला. तों इतक्यांत सूर्योदयाचे सुमारास दौलतराव शिंदे यांजकडील सेनापती आपले पलटणी लोक, तोफखाना, व स्वार यांसह भाऊसाहेबांजवळ हजर झाला. व नागपूरकर भोसला आपले स्वार व बाणांचें सैन्य घेऊन तोही हजर झाला. मग या उभयतांस भाऊसाहेबांनीं निजामाचे पूर्व व दक्षिण बाजूस उभें करून आपण पश्चिमोत्तर बाजूस उभें राहून युद्ध सुरू केलें. असें चोहोंकडून कोंडून तोफा सुरू होतांच निजामसैन्यांत पूर्वीपेक्षां अव्यवस्था होऊन कांहीं लोक मेले, व कांहीं परत हटूं लागले. असें युद्ध दोन दिवस चालू असून तिसरे दिवशीं भाऊसाहेबांनीं आपल्याकडील सर्व सैन्यास असा हुकूम फर्माविला कीं, आज निजामाचा पराभव करूनच सर्वांनीं हत्यारें खालीं ठेवावीं. हें सर्वांनीं मान्य करून मोठ्या क्रूरतेनें युद्ध चालू केलें. तें असें कीं, नागपूरकरांचे स्वार शत्रूंकडील मार सोसून आपण त्याहिःपेक्षां वेगानें पुनः पुनः हल्ला करूं लागले. तसेंच बाणदार तर शत्रूंस पुढें न येऊं देतां आपण पुढें पुढें सरून शत्रूकडील लोकांच्या शरीरांचे तुकडे तुकडे करूं लागले. व शिंद्याकडील पलटणी सरदारांनीं आपल्या युद्धचातुर्येंकरून शत्रूंच्या पलटणींतील सरदारांस पाठ दाखविण्याची वेळ आणिली, आणि तोफांवरील सरदारांनीं तोफा कांहीं उंच ठिकाणीं सारख्या पंक्तीनें ठेवून सात सात अंकांच्या उच्चाराबरोबर तोफेचा गोळा सुटे अशा त्वरेनें तोफांची सरबत्ती सुरू ठेविली. व परशुरामभाऊकडील दोन टोळ्यांतील सरदार आपआपल्या शौर्याची सीमा करून वारंवार दुरून पाहणारे श्रीमंत व नाना फडनीस यांस आनंद देऊं लागले. त्यांत विनोबाआबाचे त्यावेळीं विशेष आनंददायक धैर्य शौर्य सर्वांच्या दृष्टीस आलें तें असें कीं, विनोबाआबांनीं आपण घोडेस्वार असून शत्रूकडील हत्तीवरचे सरदार कित्येक पट्ट्यानें मारिले, व रामजीनें तर बंदुकीच्या गोळीनें बहुत लोकांस यमाजीपंताकडे पाठविलें असें परस्पर निकराचें युद्ध चार तास दिवसपर्यंत चालू असल्यानें निजामाकडील सरदारांनां ती तोफांची सरबत्ती न सोसून ते खुद्द निजामाजवळ हटत

गेले. हें निजामानें पाहून तो तेथून खर्ड्याच्या किल्यांत गेला. नंतर थोड्याच वेळांत त्या किल्यावरही तोफांचे गोळे आले, तेव्हां तो, आपला पूर्ण पराजय झाला हें समजून पेशवे सरकारचे वकील गोविंदराव काळे यांजवळ युद्ध पुरें करण्याचें मागणें करूं लागला. पुढें दोनप्रहर दिवसाचे सुमारास सूर्यसंतापानें व बंदुकी आणि तोफांच्या गोळ्यांनीं निजामाकडील बहुतेक लोक मेले व कांहीं घायाळ झाले, व कांहीं निजामाजवळ येऊन गोविंदराव यांजपाशीं शरण आलों असें बोलून जीवदान मागूं लागले. असी त्या निजामाची व तत्पक्षी लोकांची दीनावस्था पाहून गोविंदराव यांनीं युध्द पुरें करण्याबद्दल परशुरामभाऊस पत्र पाठविलें. तें भाऊसाहेबांनीं पाहतांच एक संज्ञेची निशाणी उभी केली, ती पेशव्याकडील सरदारांनीं पाहून त्याचवेळीं आपापलीं हत्यारें खालीं ठेविलीं अर्थात् युद्धप्रसंग शांत झाला. हें निजामानें पाहून हिंदु लोकांचें राज्य करण्याची व हुकूम चालविण्याची बहुत तारीफ करून गोविंदरावांस मान दिला. पुढें नानाफडणिसानीं निजामाकडे पूर्वीचा येणें असलेला व हल्लीं झालेला फौजेचा खर्च याचे फेडीबद्दल निजामाकडून मुलूख लावून घेऊन, हा खटका उपस्थित करणारा जो त्यांचा कारभारी मश्रुलउलमुल्क त्यालाही आपल्या नजरेखालीं घेऊन विजयवाद्यें वाजवीत सर्व सरदारांसह श्रीमंताची स्वारी पुण्यास परत आली. नंतर थोड्याच दिवसांत मोठा दरबार भरून त्यांत ज्या ज्या सरदारांनीं महत्वाचीं कामें केलीं त्यांस बक्षीस देण्याचा समारंभ होतेवेळीं प्रथम सेनापतीपासून आरंभ करावा, असें फडणिसांनीं सांगून प्रथम परशुरामभाऊस वस्त्रालंकार देऊं लागले. तेव्हां भाऊनीं फडणिसांस असें कळविलें कीं, मला पठाण सरदाराचे दुसरे वारापासून विनोबाआबानें वाचविलें, सबब प्रथम त्याला मान देऊन नंतर इतरांस द्यावा. हे शब्द फडणिसांस बहुत मान्य होऊन त्यांनीं विनोबाआबांस वस्त्रें व अलंकार देण्याकरितां ते त्यांजवळ आले. त्यावेळीं तीं अलंकार वस्त्रें पाहून विनोबाआबांनीं फडणिसांस कळविलें कीं, मी मागेन ती अल्प मोलाची वस्तु श्रीमंतांनीं आपल्या

हातुन मला द्यावी. असें ह्मणतांच तें काय मागणें असें नानानीं ह्मटल्यावरून विनोबाआबांनीं कळविलें कीं, श्रीमंतांचे हातांत असलेला अत्तरगुलाब घेण्याचा शेला त्यांनीं उठून माझ्या अंगावर प्रावरणास घालावा या मानाची अपेक्षा आहे. असें ह्मणतांच फडणिसांनीं तें अमान्य करून कळविलें कीं, अशा सभेंत खुद्द श्रीमंतांनीं उठून आपलें वस्त्र आपल्या हातून देणें असें मागणें कोणासही मिळालें नाहीं, सबब हें मागणें न मागतां दुसरी कांहीं वस्तु हत्ती, घोडा, अगर एक दोन गांवही पाहिजेत तर मागावे. हें भाऊसाहेबांनीं श्रवण करून त्यांनीं नानांस कळविलें कीं, विनोबाआबांस श्रीमंतांचे दयेंकरून हत्ती, घोडे गांव बहुत आहेत, परंतु शूरपुरुषाचे इच्छेप्रमाणें देणें हाच मान. असें ह्मणतांना नानानीं या कामीं भाऊसाहेबांची मर्जी जात राहाती असें समजून श्रीमंतांस विनंति करून त्यांचे हातीं शेला दिला. पुढें त्यांनीं उठून तो शेला विनोबाआबांचे अंगावर घातला, नंतर सर्वांस मान देऊन पुढें विठ्ठलरावबाबा पटवर्धन यांनीं या स्वारींत शौर्याचीं कामें बहुत करून शेवटीं आपणही ठार झाले, यामुळें फडणिसांनीं श्रीमंतांकडून त्यांचे वडील धोंडोभास्कर पटवर्धन यांस दरसाल दोन हजार रुपये बक्षीस देण्याचा ठराव केला. तो पुढें बहुत वर्षें चालत होता व विनोबाआबांस मिळालेला शेला अद्यापि त्यांचे कुळांत हा श्रीमंतांकडील शेला अशा पूज्यबुद्धीनें ठेविलेला हजर आहे.

## भाग ९ वा.

पुढें सहा वर्षांनंतर श्रीमंत बाजीराव रघुनाथ पेशव्यांनीं परशुरामभाऊ पटवर्धन यांस मांडवगणचे प्रतिबंधांतून मुक्त करून त्यास, सातारकर महाराजांचे आश्रयानें चतुरसिंगानें बंड केलें तें मोडण्याविषयीं आज्ञा केल्यावरून भाऊसाहेबांनीं आपल्याबरोबर प्रतिबंधांतही असलेले विनोबाआबांचे विचारें फौज जमा करून ते साताराचे मार्गावर

चालू झाले. त्यावेळीं एक मुक्कामावर जाऊन स्वस्थपणें आपली पुनः हजारों फौज जमलेली पाहून विस्मयानें विनोबाआबा ह्मणतात, अहो भाऊसाहेब, काय कालमहिमा पहा तुह्मी प्रतिबंधांत असतां आपला प्राणत्याग करावा ह्मणून वारंवार वेगानें उठत होता. परंतु त्यावेळीं मी तुह्मांस असें करूं नका आमचा हरिबाबांच्या पुण्यानें हा प्रतिबंध स्वल्प काळांत जाऊन पुनः इच्छेप्रमाणें सर्व लाभ होणार असें ह्मणत होतों, तो दिवस आज आला पहा. असें सर्व मंडळींत प्रसिद्धपणें विनोबाआबा बोलतांच भाऊसाहेबांना सर्व पूर्वस्मरण होऊन पुढें त्यांनीं सर्व मंडळीसह मोठ्या उत्सवानें श्रीगजाननाचा गजर करून साखरा वाटल्या व कांहीं देकारही दिला. नंतर सर्व फौजेसह पुढे जात असतां चतुरसिंगाची गांठ पडून युद्ध सुरू झालें. त्यांत शत्रूचा पराजय होऊन तो पळत असतां विनोबाआबा व विठ्ठलरावबाबा यादवाडकर वगैरेंनीं हल्ला करून त्या चतुरसिंगास पकडला आणि त्याच्या फौजेची लूट करून सातान्यावर गेले. तेथें स्वल्प युद्ध होऊन पुढें गांवांत शिरून लूट केलेल्या द्रव्यादि लाभानें मांडवगणचे प्रतिबंधांत राहून जे त्या लोकांस कष्ट झाले होते ते सर्व दूर केले. पुढें भाऊसाहेबांनीं त्या चतुरसिंगास व त्याला आश्रय देणारास श्रीमंतांकडे पाठवून आपण करवीरकरांचे पारिपत्यास करवीरमार्गें चालू झाले, तों पुढें जातां जातां कोणी शत्रूचा हितकर्ता तपस्वी थोर ब्राह्मण भेटून त्याचें व परशुरामभाऊ यांचें परस्पर विनयपूर्वक संभाषण होऊन त्या ब्राह्मणानें विभूतीवर मंत्र प्रयोग करून ती विभूती भाउसाहेबांचे कपाळीं लावून लगेच निरोप घेऊन तो करवीरास परत गेला. पुढें थोडा वेळ गेल्यावर भाऊसाहेबांचे बुद्धीस कांहीं भ्रम पडत चालला व तो उत्तरोत्तर वाढतच गेला. पण त्या भ्रमांतही ते आतां करवीरकरास खालीं करितों अशी वीरवल्गना करीत असत. पुढें कोल्हापूरचे आसपासचे गांव आपल्या अमलांत घेऊन भाऊसाहेबांनीं कोल्हापुरानजिक पट्टणकोडीवर जाऊन तळ दिला. हें करवीरकरांनीं पाहून तेही तयार होऊन आले. नंतर भाऊसाहेबांचे चिरंजीव रामचंद्रपंत आपा व हरिपंतबाबा व माधवराव दाजी साहेब

यांनीं निरनिराळ्या तीन टोळ्या करून तिन्हींकडून ते करवीरकराच्या सैन्यावर चालून गेले. पुढें परस्परांचें युद्ध होऊन करवीरकरांनीं पळ काढला व ते तिघे बंधु पाठलाग करून त्या करवीरकरांचा संहार करूं लागले. इकडे परशुरामभाऊ आपले गोटांत असून सोंगट्यांचा डाव चालू केला होता, हें विनोबाआबांनीं पाहून भाऊंस बहुत निष्ठुर भाषणें करून डाव मोडून त्यांस शत्रूंचे सैन्य जवळ आल्याचें कळविलें व ते श्रमिष्ट असल्यामुळें त्यांस उठवून घोड्यावर बसविलें व पट्टा हातीं चढवून त्याचें मेण काढून घेतलें. आणि त्यांस शत्रूवर हल्ला करण्याचें सुचविलें. तों इतक्यांत शत्रूकडील सैन्य पळ काढीत काढीत या गोटावर आलें तों भाऊसाहेब तेथें असून त्यांचा समुदाय तोही अल्प आहे असें समजून ते लोक त्यांच्या अंगावर आले. हें विनोबाआबांनीं पाहून भाऊसाहेबांस मागें करून आपण त्यांचे संरक्षणाकरितां पुढें झाले आणि जो जो पुढें येई त्यास ठार करूं लागले. त्यावेळीं विनोबाआबांनीं आपल्या अंगीं असलेल्या युद्धचातुर्येंकरून आपल्यास बहुधा हत्यार न लागूं देतां आपण इतरांवर हत्यार करीत. याप्रमाणें वागून सारखें युद्ध केल्यामुळें त्या करवीरकरांस भाऊसाहेबांवर जाण्यास मार्ग मिळेनासा झाला. नंतर त्या सर्वांनीं विचार करून एकदम चोहोंकडून विनोबाआबांवर हत्यार चालू केल्यानें त्यांच्या अंगावर लहान मोठ्या सत्तावीस हत्यारांचे वार बसले, तरी तितकेही वार सहन करून धावत जाऊन त्या गायकवाड सरदाराच्या बाहूवर पट्टा मारला हें त्याकडील सरदारानें पाहून त्यानें विनोबाआबांचे मुखावर तरवारीचा वार केला, त्यामुळें हनवटी ओठासुद्धां तुटून लोंबूं लागली व त्यायोगें विनोबाआबांस मूर्च्छा येऊनही हातांतील पट्टा न सोडतां ते जमिनीवर पडले. हें त्या गायकवाड वगैरेंनीं पाहूनही त्या विनोबाआबांजवळ कोणी जाईनात. कारण, जवळ जाणारास कदाचित् उठून मारील कीं काय असें त्यांस भय पडलें इकडे परशुरामभाऊंनीं हे सर्व समजून आतां विनोबाआबांप्रमाणें आपणही शत्रूवर जाऊन त्यास मारूं अगर परलोकास जाऊं, असें जवळ असलेल्यांशीं बोलून ते पुढें घोडा दटावून निघाले, तों बुद्धींत कांहीं भ्रम असल्यामुळें युद्ध, चातुर्यानें

होईना. सर्वत्र शत्रूंनीं चोहोंकडून हल्ला करून त्यांवर हल्यार करून त्यांस घोड्यावरून खालीं पाडिलें. नंतर एका सरदारानें त्या परशुरामभाऊंस आपल्या घोड्यापुढें घेऊन त्यांस कोल्हापुरास नेऊन महाराजापुढें ठेवावें ह्मणून तो निघाला. हें त्या गायकवाड सरदारानें पाहून तो मोठ्या क्रोधानें त्याला रागें भरून ह्मणाला अरे ह्या भाऊनें आह्मांस डोळेभर झोंपसुद्धां येऊं दिली नाहीं याला जर तूं जीवंत ठेविलेंस तर पुन: हा आह्मांस पीडा देईलच. तर तूं याला घोड्यावरून खालीं टाक. तसें तूं न करशील तर त्या भाऊबरोबर मी तुलाही ठार मारितों. असें ह्मणून त्यानें तरवार उगारली हें सरदारानें पाहातांच भाऊसाहेबांस घोड्यावरून खालीं ढकलून दिलें. हें गायकवाडानें पाहून आपण आपल्या घोड्यावरून खालीं येऊन त्या दुष्टानें भाऊसाहेबांवर तरवारीचे घाव मारून तुकडे तुकडे करून तो तेथून लगबगीनें पळून गेला. हा युद्धप्रसंग शके १७२१ भाद्रपद वद्य ४ दिवशीं सायंकाळीं झाल्यामुळें लगेच काळोख पडून चंद्रोदय झाल्यावर त्या शीतळ चंद्रकिरणांनीं त्या विनोबाआबांची मूर्च्छा दूर होऊन ते सावध झाल्यावर चहूंकडे पाहूं लागले, तों सर्व प्रेतमय पाहून त्यांत भाऊसाहेबांचा शोध करितात तों त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे होऊन पडल्याचें पाहून त्यांचा आपला वियोग झाल्याबद्दल दु:ख व त्यांस रणांत पडून अक्षय गणेशलोक मिळाल्याबद्दल सुख मानून तेथून निघाले आणि ते आपल्या अंगावर सत्तावीस व एक मुखावर अशा अठ्ठावीस वारांची व्यथा सहन करून त्याच रात्रीं चालत सहा कोसांवर असलेली सितोळ्याच्या मांजरीस आले. तों सूर्योदय होण्याच्या समयास गांवांतील लोक शितोळा देव दर्शनास जात असतां विनोबाआबांस पाहून त्यांनीं लगेच त्यांस पालखींत घालून मिरजेस पाठवून दिलें. इकडे रामचंद्रपंत आपासाहेब वगैरे बंधु शत्रूचा पराजय करून परत गोटाकडे आले, तों भाऊसाहेबांचा असा प्रकार झालेला पाहून परम शोकानें उत्तर प्रकार करून तेथून निघून त्यांनीं भिलवडीवर दशांत त्यांचें कर्म केलें. त्यावेळीं पिंडास काकस्पर्श होईना, ह्याकरितां रामचंद्रआपांस बहुत विचार पडून तेव्हां त्यांनीं असा उद्गार काढिला कीं, भाऊसाहेब व विनोबाआबा यांवर ज्या ज्या

दुष्टांनीं हत्यारें केलीं असतील त्यांचा आजपासून सहा महिन्यांचे आंत शिरच्छेद करीन. अशी प्रसिद्धपणें प्रतिज्ञा करून उदक सोडतांच कावळ्यांनीं पिंडास स्पर्श केला, हें सर्वांनीं पाहून बहुत आश्चर्य केलें.

पुढें सर्व उत्तरक्रिया आटपल्यावर आपासाहेबांनीं आपल्या नजीक असलेल्या थोडक्या फौजेनिशीं वारंवार त्या गायकवाड वगैरे मंडळीस धरण्याविषयीं यत्न चालू केला, परंतु ते छपून बहुधा शिवाजीमहाराजांजवळच असत, सबब हातीं लागेनात. पुढें कांहीं महिने गेल्यावर आपासाहेबांनीं शिंद्याकडील पलटणी लोक मदतीस घेऊन ते आपल्या सर्व फौजेसह कोल्हापूरकरावर चालून गेले, तों इकडे राजाही आपल्या जमावानिशीं पुढें आला. हें आपासाहेबांनीं पाहून आपल्या सैन्याच्या दोन व पलटणी लोकांची एक अशा तीन टोळ्या करून त्या राजसैन्यास तिन्हींकडून एकदम मारूं लागले, त्यांत आपासाहेबांनीं विनोबाआबा पटवर्धनाचे चिरंजीव गणपतराव विनायक यांस एका टोळीवर मुख्य नेमून त्यांस शत्रूकडील तोफा चालू आहेत त्यांवर तुह्मी हल्ला करून तोफांचा गोळा बंद करावात असें सांगितलें होतें. तें गणपतराव यांनीं मान्य करून असें धैर्य शौर्याचें काम करीत कीं, शत्रूंकडील आलेला तोफेचा गोळा चुकवून दुसरा गोळा अंगावर येण्याच्या पूर्वी वेगानें घोडा उडवून तोफेवरचा गोलंदाज ठार मारावा. असें वारंवार केल्यानें त्यावेळीं तोफांचे आवाज बंद झाले. हें महत्वाचें काम केल्याचें आपासाहेबांनीं पाहून बहुत संतोषानें त्याच वेळेस त्या गणपतरावास पुढें बोलावून शाबास असा संतोषार्थ शब्द करून तुला हें घे असें ह्मणून तैनात जाबत्याची याद हवाली केली. त्यांतील मुख्य कलमें करवीर येथील मजमु असामी तैनात जातीस दरसाल भोजनखर्च माणसें इतमाम वगैरे कलमें असून खालीं स्वदस्तुरचें घर रत्नाकरपंत याचें बक्षीस असीं कलमें असलेली याद हातीं देऊन असें सांगितलें कीं, आह्मी करवीरांत गेलों म्हणजे याहूनही बक्षीस जास्त मिळेल. सदर तैनात जाबत्याची याद आज हजर आहे. पुढें थोडयाच वेळांत आपा-

साहेबांकडील लोकांचा मारा त्या राजास सोसेनासा झाल्यामुळें तो राजा त्या गायकवाड वगैरे अपराधी मंडळीसह पळून पन्हाळगडावर गेला. हें आपासाहेबांनीं समजून पुढें उभे असलेल्या त्याच्या फौजेचा संहार करून त्या दिवशीं युद्ध पुरें करून ते आपल्या गोटांत गेले. तो दिवस शिवरात्रीचा असल्यामुळें उपोषण, शिवपूजादि करून मग चिंतन करूं लागले कीं, मी सहा महिन्यांत त्या गायकवाड वगैरेंचा शिरच्छेद करीन असी जी प्रतिज्ञा केली आहे तो दिवस पूर्ण होण्यास आला, आतां या संकटांतून मी कसा पार होईन? असें चिंतन होऊन प्रसिद्धपणेंही मंडळीशीं हेंच बोलत असतां सर्वांनीं असे शद्ध केले कीं, आपले मूळ पुरुष जे हरिबावा त्यांच्या पुण्यप्रभावानें ही संपत्ति आली, तस्मात् त्या हरिबावांसच ही विनंति व्हावी. असें बोलून सर्वही त्या साक्षात् गणेशरूप हरिबावांचे गुणानुवाद करीत करीत, आह्मांस या संकटांतून पार करावें, तसें न केल्यास आमरण तुमचे बालकांची अपकीर्ति होणार आहे, असें सप्रेम स्तवन करीत असतां तेथें असा चमत्कार झाला कीं, आपासाहेबांच्या बातमीदाराच्या रूपानें कोणी पुरुष आपासाहेबांपुढें येऊन त्यानें असें कळविलें कीं, ह्यावेळीं राजा आपल्या अपराधी मनुष्यांसह गडावर असून तेथें त्यांनीं पूजेस आरंभ केला आहे. तर याच वेळेस त्वरा करून आपण आल्यास शत्रु सांपडणार. असी बातमी ऐकतांच आपासाहेबांस त्या शद्बाचा भरंवसा येऊन ते आपल्या खात्रीचे सडे मंडळीनिशीं खुद्द निघाले.त्यांस गडावर जाण्याचा गुप्त भाग दाखविण्यास तो सदर बातमीदार पुढें चालू लागला. पुढें आपासाहेब गडावर जाऊन त्यांनीं दरवाज्याजवळ आपले कांहीं लोक ठेवून कांहीं तटावर चढविले आणि सर्वांनीं एकदम बंदुकीचा आवाज केला, आणि असी आरोळी केली कीं, कोण युद्ध करण्यास समर्थ नसतील त्यांनीं लुगडीं नेसून दरवाज्यांनीं पार व्हावें, त्याला आह्मी धरणार नाहीं.हा शद्ब ऐकून बायकामुलें व कांहीं पुरुष लुगडीं नेसून दरवाज्यानें पार झाले, त्याबरोबर राजाही कांहीं वेषांतर करून बाहेर जाऊं लागला, त्याला गणपतराव विनायक वगैरेंनीं

पाहूनही आपासाहेबांची धरण्याबद्दल आज्ञा नसल्यामुळें त्यांनीं दुर्लक्ष केलें. पुढें तो अपराधी गायकवाडही वेषांतर करून बाहेर जातो आहे हें पाहतांच त्याला पकडून तेथेंच त्याचे हात बांधून गडावरून खालीं आपल्या सैन्यांत नेलें. नंतर कांहीं लोक दरवाजानें आंत शिरून सर्व अपराधी लोक पकडून त्यांचे हात बांधून त्यांस आपल्या गोटाकडे घेऊन गेले. मग त्या गडाची लूट करून आपासाहेबही गोटांत आले. नंतर त्या अपराधी लोकांची दावण बांधून ज्यांनीं ज्यांनीं भाऊसाहेब व विनोबाआबा यांच्या ज्या ज्या अवयवांवर हत्यारें केलीं होतीं त्यांचे ते ते अवयव छेदून शेवटीं शिरच्छेद करून सर्व मंडळीसह ते शिवरात्रिव्रताचें पारणें करण्यास उठून गेले. नंतर हरिबावांचे प्रसादें आज मी शत्रूंचा शिरच्छेद करून केलेल्या प्रतिज्ञेतून पार झालों, असे शब्द करीत आपासाहेबांनीं मंडळीसह भोजन करून ते स्वस्थ बसले असतां इकडे करवीरकरानें आपासाहेब दौलतराव शिंद्याकडील पलटणी लोक सहाय्यार्थ घेऊन आपल्यावर येणार असें श्रवण केल्यापासून त्या शिंद्याचें आर्जव करून त्याला न देण्याच्या वस्तुही देण्यास कबूल होऊन त्याजकडून आपासाहेबांचे साहाय्यार्थ आलेल्या पलटणीवरील सरदारांस साहाय्य करूं नये असा हुकूम आणविला. तो हुकूम घेऊन येणारा शिंद्याकडील जासूद दैववशात् आपासाहेबांपुढेंच आला. त्यायोगें त्यांस सर्व मजकूर समजल्यावरून त्याच वेळेस आपासाहेब आपल्या लष्करासह कूच करून मिरजेस आले. ते तेथें येतांच त्यांस एकोप्यानें व एका संघानें वागा हा हरिबावांचा उपदेश स्मरून विनोबाआबांजवळ येऊन करवीरावरील स्वारीचें वर्तमान निवेदन करून आपण तासगांवास घरीं गेले.

रामचंद्रपंतअप्पास प्रसंगवशेंकरून हरिबावांचा जो हितोपदेश स्मरणांत आला याचें कारण, तो हितोपदेश परशुरामभाऊ सदा पूर्णपणें स्वीकारून वागत असून यामुळें त्यांस बंधुद्वारा वारंवार हिताऽहित कळून त्यांची सर्व प्रकारें प्रौढी उत्तरोत्तर वाढत गेली. हेंच पूर्वी सदाशिवरावभाऊ पेशवे सोनपतावर पडले असून हल्लीं त्यांचे रूपानें

कोणी तोतया भाऊसाहेब होऊन त्यानें बरीच फौज जमा करून तो पृथ्वीवर आपली सत्ता वाढवूं लागला व त्याला देशोदेशींचे लोकहीं अनुकूल होऊं लागले आहेत हें श्रीमंतांस कळून त्यांनीं तिकडे मिळणी होणाऱ्या लोकांचा नांवनिशीपूर्वक जाहीरनामा लावून त्यावर शिक्षाही लिहिली. आणि जे कोणी सांपडत त्यांला ते शिक्षाहीं देऊं लागले. असा क्रम चालू असतां परशुरामभाऊंचे चुलत बंधु हरिभास्कर ऊर्फ हरबाआण्णा हे त्या तोतयाकडे कोणास न कळवितां गेले. हें श्रीमंतांस समजल्यावरून त्यांचें नांव त्या जाहीरनाम्यांत नमूद झालें होतें तें भाऊसाहेबांस व हरबाआण्णांसही माहीत असल्यामुळें त्या हरबाअण्णांस प्रसिद्धपणें आपले बंधूजवळ येऊन राहणें होईना. सबब त्या भाऊसाहेबांस हरबाअण्णांचे द्वारें हिताऽहित कळून श्रीमंतांचे दरबारांत उत्तरोत्तर जें महत्व मिळत असे तें बहुतच कमी झालें. हें भाऊसाहेबांनीं समजून विनोबाआबा वगैरेंशीं बोलत कीं हरबाअण्णा चातुर्यानें दरबारीं राहून तेथील रहस्य एकोप्यामुळें मला कळवून त्याप्रमाणें मला वागवीत. तसा इतर परिवार एकोप्याचा नसल्यामुळें आतां खरें समजण्यास मार्ग नाहीं, असें ह्मणत. पुढें दैववशात् भाऊसाहेबांस शत्रूवर जाण्याची कामगिरी आली त्यावेळीं त्यांनीं श्रीमंतांस अशी विनंति केली कीं, मला कामगिरी बजावण्याची शक्ति नाहीं. कारण, मी आपले बंधूचे साह्यानें सर्व सरकारी कामें चालवीत असें. सबब सरकारांतून त्या हरबाआण्णांस अभय मिळालें ह्मणजे मी त्यांसह कामावर हजर आहें. अशी विनंति करून अभय घेऊन त्या हरबाआण्णांस एकोप्यामुळें निर्भय करून त्यांसह सरकारी काम बजावलें. या हरिरावांचा एकोप्याविषयीं जो पुत्रांस पूर्वीं हितोपदेश झाला तो पुढें त्यांचे प्रपौत्र ह्मणजे नातु तेही मनांत वागवीत. याविषयीं आणखी उदाहरणें श्रवणांत आहेत, त्यांतील एक लिहितों. बाजीराव रघुनाथ पेशव्याचे वेळेस रामचंद्रपंत आप्पासाहेब तासगांवकर यांविषयीं श्रीमंतांच्या मनांत असें आलें कीं, परशुरामभाऊंनीं आपल्यास पुष्टीं

गादीवर न बसवितां, चिमणाजी अप्पास बसविलें. त्याचा हा पुत्र असल्यावरून यापासून आपलें हित होणार नाहीं, सबब यांस कैद करून ठेवावें. परंतु या पटवर्धन घराण्यांत एकोप्यानें वागणूक आहे, करितां हा बेत सिद्धीस जाण्यास प्रथम त्यांच्यांत भेद करून पुढें हे कैद करण्याचें काम करावें, असें अमृतरावसाहेब वगैरेंच्या विचारें ठरवून चिंतामणराव पांडुरंग सांगलीकर यांस प्रेमानें प्रथम आपले क्रीडामंडळींत घेऊन नंतर कांहीं दिवसांनीं प्रात:काळीं रामचंद्रपंतआप्पांस सडें जरूर भेटीस यावें म्हणून आज्ञापत्र पाठविलें आणि ते येतांच संज्ञेबरोबर कैद करण्याची तजवीज अमृतरावांनीं करावी असा निश्चय केला. इकडे तें आज्ञापत्र आप्पासाहेबांकडे येतांच त्यांनीं शिरसामान्य करून श्रीविघ्नहर गजाननास वंदन करून बिनोबाआबांस व आणखी त्याप्रमाणेंच एकोप्याचे चार पांच असामी धैर्य शौर्याचे वीर साहाय्यार्थ बरोबर घेऊन आपले गोटांतून बाहेर निघाले. इकडे यापूर्वींच चिंतामणराव आप्पा सांगलीकर यांसही गुप्त बातमी बातमीदाराकडून सदरची श्रीमंतांनीं केलेली मसलत समजतांच त्यांनीं असा विचार केला कीं, आज रामचंद्र अप्पास कैद, तर ती उद्या मजवरती पाळी येणारच. यास्तव या समयास पूर्वजांनीं केलेल्या उपदेशाप्रमाणें वागावें हेंच कल्याणदायक असें समजून लगेच आपले स्वारांनिशीं दौड करून निघाले. ते श्रीमंतांच्या वाड्यासभोंवतीं वेढा घालून उभे राहिले. त्यापूर्वींच रामचंद्रआप्पा श्रीमंतांकडे जाऊन उभयतांचीं कांहीं संभाषणें चालू होतीं. आतां कैदेची सूचना होणार हें सांगलीकरास कळून त्यानें एकदम पांचशें स्वारांस सरबत्तीचा इशारा केला आणि त्याप्रमाणें बंदुकींचे आवाज श्रीमंतांचे कानीं पडतांच त्यांस भय वाटून त्यांनीं नजीकचे सेवकास हे बार कोणाकडील आहेत म्हणून प्रश्न केला. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, सांगलीकर तयारीनें येऊन वाड्याचे दरवाजे रोखून आवाज करीत आहेत, हें ऐकून श्रीमंत ह्मणतात. अरे त्याला येण्याची आज्ञा नसून तो कायनिमित्त येथें आला? असें त्या सेवकासीं बोलतांच त्यानें विनंति

केली कीं, त्या सांगलीकराचा बंधु रामचंद्रअप्पा यांस सडे येण्याची आज्ञा झालेली त्यास समजून त्याची पाठराखण करण्यास तो आपण स्वतः आला आहे. हें ऐकून श्रीमंतांनीं लगेच रामचंद्रपंतअप्पांस परत जाण्याविषयीं विडा देऊन सांगलीकरास आवाज बंद करून आपल्याकडे येण्याची, आज्ञा केली. नंतर सांगलीकर श्रीमंतांपुढें येऊन काय आज्ञा अशी विनंति करितांना श्रीमंतांनीं कांहीं राग आल्याचें दर्शवून विचारिलें कीं, तुम्हांस येण्याचें कारण काय? असा प्रश्न होतांच पुनः विनंति करितात कीं, आमचे बंधूस थोडयाच मनुष्यानिशीं येण्याची आपली आज्ञा झाल्यावरून ही वेळ कसली कोण जाणे? अशा भयानें त्याच्या साह्यार्थ मी आलों असें कळविल्यावर श्रीमंत बोलतात, तुम्ही निरनिराळे आहांना? हा प्रश्न श्रीमंतांचा होतांच सांगलीकरानें विनंति केली कीं, आम्ही आपापले स्त्रियांचे निरनिराळे, परंतु सरकारांत सर्व एकच आहोंत. हें उत्तर श्रवण करून श्रीमंतांनीं आपल्या मनांत असा विचार केला कीं, हरिबावांचा उपदेश अद्यापपावेतों या पटवर्धनांचे हृदयांत जागृत आहे, तर हा एकोपा नाहींसा झाल्याखेरीज यास कोणत्याही प्रकारें दुखवूं नये असें त्यावेळीं बाजीरावास त्या एकोप्याचें भय वाटून पुढें ते पटवर्धनांशीं बहुधा सरळच वागत गेले दुसरें एक उदाहरण असें ऐकिवांत आहे कीं, श्रीमंत बाजीराव पेशवे पुणें गादीविषयीं निराश होऊन उत्तर हिंदुस्थानांत गेल्यावर बहुधा इकडील संस्थानिक मंडळी कंपनी सरकाराशीं तहनामे करून त्याचे आश्रयानें वागूं लागली, त्याप्रमाणें सांगलीकर चिंतामणरावआप्पांनींही वागावें, परंतु त्यांस मी श्रीमंतांचा चाकर हा अभिमान असल्यामुळें ते तसे वागले नाहींत. यामुळें कांहीं दिवस गेल्यावर कंपनी सरकारांतून कांहीं पलटणी लोक, तोफा व स्वार घेऊन एक साहेब सांगलीनजीक हरिपूरचे बागेंत उतरला, व त्यांनीं आपासाहेबांस सांगून पाठविलें कीं, उदईक दोन प्रहर दिवसांपूर्वी आपण तहनाम्यानें वागण्यास कबूल व्हावें. तसें न झाल्यास पुढें युद्ध चालू होईल असें पत्र चिंतामणरावाकडे येतांच त्यांचे अंगीं शौर्यावेश

विशेष वाढून त्यांची युद्धाची तयारी चालू झाली. त्या आवेशाचा परिणाम महादुःखद होणार असें जवळचे मुत्सदी लोकांस वाटून त्यांनीं रावास बोधही केला, परंतु त्याचा कांहीं उपयोग होईना, सबब त्यांतील मुख्य कारभारी मोरोपंत कुंटे व अंताजीपंत कानिटकर हे उभयतां दुसरे दिवशीं सूर्योदयाबरोबर मिरजेंत राहणारे विनायक भास्कर ऊर्फ विनोबा आबा पटवर्धन यांजवळ येऊन त्यांस विनयानें चिंतामणरावाची सर्व हकीकत कळवून पुढें तो आप्पासाहेबांचा युद्धावेश उतरविण्याबद्दल विनंति केली. मग विनोबाआबांचे मनांत हरिबाबांचा एकोप्याविषयीं पूर्वी जाहलेला हितोपदेश स्मरून त्याच वेळीं, ते मोठ्या वेगानें घोड्यावर बसून निघाले व ते सांगलीचे वाड्यांत येतांच विनोबाआबा आले. हें आपासाहेबानें श्रवण करून पुढें येऊन त्यांस हातीं धरून सर्व युद्धसामग्री दाखवून पुढील कर्तव्य सांगतांच विनोबाआबा कांहीं क्रोध आकारें दाखवून बोलले कीं, अहो ही वेळ कशी आहे हें तुह्मी समजत नाहीं काय? तें एकोप्यानें वागणारें कंपनी सरकार, महापराक्रमी, त्याशीं स्नेहानें वागणें हेंच या वेळचें कर्तव्य. आतां तुह्मी तसें न कराल तर मला करविणे प्राप्त आहे. अशा भयंकर शब्दानें त्यास दटावून त्यांचे कारभारी कानिटकर व कुंटे यांस बोलावून आप्पासाहेबांजवळ असलेलीं हत्यारें दूर करविलीं आणि तहनाम्यानें वागण्यास आह्मी खूष आहो असें लिहून साहेबांस कळवावें ह्मणून उभयता कारभाऱ्यांस सांगितलें. असें त्या विनोबांचें पूर्ण एकोप्याचें कृत्य पाहून चिंतामणरावांस असें वाटलें कीं, ह्या विनोबाआबांस कोणते वेळीं कोणाल्या शत्रूशीं कसें वागावें हें पूर्ण ज्ञान आहे. व त्या त्याप्रमाणें ते वागल्याचा अनुभवही आहे. आतां हे भ्याले ह्मणावें तर यांनीं आजपर्यंत अनेक शत्रूशीं कढून शतावधि जखमा दुसऱ्यांस केल्या व यांचे अंगींही लागलेल्या शतावधि दिसत आहेत व हे माझे सख्खे चुलत चुलतेही होत. तर आतां यावेळीं माझे हितकर्ते यांखेरीज दुसरे कोणी जवळचे नाहीं. करितां यांनीं केलेल्या बोधाप्रमाणें मला वागलेंच पाहिजे. असा

सार्व. मराठी लिपि
भिवंडी



बिनोआबांचे बोधावर भरंवसा असल्यानें जो पूर्वी शरीरीं विशेष युद्धावेश वाढला होता तो तत्काळ शांत होऊन बिनोबाआबांशीं विनयानें, आपण आज्ञा केली ती मला मान्य आहे, असें अप्पासाहेब प्रसिद्धपणे बोलुं लागल्यावर सर्वांस आनंद होऊन कारभाऱ्यांनीं यजमानांचे आज्ञेप्रमाणें साहेबांशीं बोलून मनोदयानुरूप दोस्तीच्या नात्यानें कंपनीसरकाराशीं तह करण्याचें कबूल केलें. पुढें अप्पासाहेब शांतपणें दवलतीचा सुखानुभव घेत असतां वारंवार हें सुख बिनोबाआबांच्या बोधानें मिळालें असें स्मरणांत धरून कांहीं वर्षांनीं बिनोबाआबांचे चिरंजीव चौघे त्यांतील तृतीय चतुर्थ कृष्णराव व पुरुषोत्तमराव या प्रत्येकास इतमामसुद्धां हजार हजार रुपयांचें वेतन देऊन ठेवून घेऊन नारायणराव व गणपतराव विनायक यांजवर व यांचे संततीवरही प्रेम आपल्या घरच्या मनुष्याप्रमाणें सदा ठेवीत असत, असें कागदपत्रांवरून स्पष्ट समजतें. त्या कागदांतील एक कागदाचा उतारा असा कीं राजश्री आण्णाजी नरसिंह स्वामी गोसावी यांसी– सेवक चिंतामणराव पांडुरंग नमस्कार विनंती उपरी–तीर्थस्वरूप कैलासवासी विनोबाआबा यांचे नातू चिरंजीव राजश्री परशुरामभाऊ यांस धारवाडास येण्याविषयीं चकती घेऊन स्वार आले, त्यावरून चिरंजीव तिकडे आले आहेत. कोणीं एखाद्यानें गैरवाका समजाविला असतां त्याविषयींचा मजकूर कसा आहे तो लिहून पाठवावा म्हणून लिहावें, तसें न होतां येण्याविषयीं चकती घेऊन स्वार आले, अशानें अब्रूवाल्याचा परिणाम कसा लागेल? सदरहूविषयींचा दर्यास दिलांत आणावा याविषयीं साहेबांजवळ बोलावें. चिरंजिवाची भेट करून निरोप देववून पाठवावें. चिरंजीव व आम्ही दोन नाहींत. रवाना छ २२ सफर सन सबासल्लासन मयातैन बहुत काय लिहिणें हे विनंति. वर श्रकाराजवळ ॥ गणपतिर्जयति ॥ असें निशाण केलें आहे. असें साहित्यपत्र दिल्यावरून, जो पूर्वकाळीं हरिभटबावांनीं अशीं तीर्थयात्रेस जातेवळीं पुत्रांस ईश्वरपदावर चित्त ठेवा व एकोप्यानें व एक संघानें वागा असा जो उपदेश केला तो त्या चिंतामण-

राव आपासाहेबांचे स्मरणांत चांगला वागत असावा, असें विचारकर्त्या-स वाटेल.

## भाग १० वा.

पूर्वी सातवे प्रकरणांत पुत्रांचें सांत्वन करून हरिबावा शिष्य-मंडळीसह श्रीगजाननयात्रा मार्गक्रमण करूं लागले ह्मणून कथन केलें आहे, त्याप्रमाणें पुढें मार्ग चालतां चालतां ते बहुधा ज्या गांवीं जात त्या गांवांतील सभ्य लोक हरिबावा आल्याचें श्रवण करून त्यांस आदरानें कांहीं दिवस ठेवून घेऊन नंतर पुढील गांवीं रवाना करीत. या क्रमानें हरिबावा मयूरेश्वर क्षेत्रास पोंहोचले व तेथें कांहीं महिने राहून पुढें ते लेण्याद्रीस श्रीवरद गणेशदर्शनार्थ निघाले. वृद्धा-वस्थेमुळें थोडथोड्या मजला करीत जात असतां ते एका खेड्यांतील धर्मशाळेंत शिष्यांसह मुक्कामास आले, तों त्या गांवीं कोणी एक ब्रा-ह्मण दारिद्र्यानें पीडित असतांही पंचमहायज्ञ करीत कालहरण करणारा असा होता, तो हरिबावा आल्याचें श्रवण करून दर्शनास येऊन बावांस पाहतांच त्यांचे पायांवर मस्तक ठेऊन नेत्रांतून प्रेमाश्रु ढाळी-त अभय मागून म्हणतो कीं, महाराज मी बहुत प्रजावान् असून दारिद्र्यानें अत्यंत पीडिल्यानें एक एक दिवस मला अन्न नसल्यामुळें उपोषणही करावें लागतें, हें काय सांगूं? असें बोलून पुनः नेत्रांतून अश्रु गाळीत हात जोडून ह्मणतो, आतां इतकेंच मागणें कीं, मला आपले शिष्यवर्गात मिळवावें आणि हे दारिद्र्यादिक कष्ट न व्हावे असी मजवर दया व्हावी. असें बोलून वारंवार नमन करीत उभा राहिला, हें बावांनीं पाहून त्यांस बहुत दया येऊन ते त्या ब्राह्मणास सांगतात अहो, आह्मी सांगूं तसें तुह्मी ईश्वरभजन पूजनादि कराल तर तो प्रभु भक्तवत्सल तुमचे कष्ट दूर करील. असें बोलून त्यास तुह्मी एकवीस दिवस सदा श्रीगजाननमूर्तीकडे लक्ष ठेवून प्रतिदिवशीं

सहस्त्र दूर्वा अर्पण करून सांगेन तो महामंत्रजप सहस्त्रवार केल्यानें तो आशापूरक गजानन तुमची मनकामना पूर्ण करील. हे शद्ब त्या ब्राह्मणाचे श्रवणांस येतांच तो मोठ्या आनंदानें मंत्रग्रहणार्थ पुनः पुनः विनवूं लागला. तें बाबानीं पाहून त्यास मंत्रोपदेश करून अनुष्टानास बसविलें आणि आतां आह्मी श्रीवरद गणेश दर्शन घेऊन या मार्गें पुनः येऊं असें बोलून बाबा पुढील मार्गास लागले. नंतर तो ब्राह्मण हरीबाबानीं सांगितल्याप्रमाणें प्रतिदिवशीं दूर्वाअर्पण मंत्रजपादि सर्व प्रकारें श्रीगणेशाराधन मोठ्या प्रेमानें करीत असतां एकवीसावा दिवस प्राप्त झाला. ते दिवशीं तो ब्राह्मण अनुष्टानास बसला असतां कोणी मनुष्य फडक्यानें बांधलेलें गाठोडें घेऊन आला आणि म्हणतो अहो तुमचे मातुलानें हें तुम्हांस देण्याकारितां मजपाशीं दिलें आहे, हें घ्यावें.असें बोलून त्या ब्राम्हणापुढें तें ठेवून आपण त्वरेनें बिशेष न बोलतां घराबाहेर गेला. नंतर कांहीं वेळानें अनुष्टान संपल्यावर ब्राम्हणानें गाठोडें सोडून पाहिलें तों त्यांत कांहीं सोन्यारुप्याचीं नाणीं आहेत, हें पाहून मनांत ह्मणतो आपल्यास आतां आमरणपर्यंत पंचमहायज्ञ करीत सुखानें दिवस काढण्यास इतकें द्रव्य पुरें आहे. असा अनेक प्रकारें विचार करीत त्या हरिबाबांच्या कृपेनें जर मातुलास पैसे देण्याची बुद्धि झाली असावी तर आतां मातुलाचें दर्शन घेतल्यानें सत्य ज्ञान होणार आहे. असें मनीं आणून नजीकच मामा राहण्याचा गांव होता त्या गांवीं जाऊन मातुलास मनुष्याबरोबर नाणें पाठविल्याचा प्रश्न करतांना मातुलानें ती माहिती कांहींच कबूल न केल्यामुळें बहुतच गुरुचें महत्व मानून पुनः हरिबाबांचे दर्शनाविषयीं उत्सुक होऊन निश्चित मनें काळ काढीत असतां कांहीं दिवसांनीं बाबा त्या खेड्यानजीक आल्याचें समजल्यावर आपण पुढें जाऊन आपले घरीं त्यांस शिष्यांसह आणून मोठे उत्सवानें पूजनादि करून सर्व झालेल्या लाभादि गोष्टी निवेदन केल्या आणि मोठ्या विनयानें विनंति करिता झाला कीं, महाराज, आपण साक्षात्

गजानन आहांत. आपण मज मंदभाग्यावर दया करून असें दारिद्र्य-दुःखापासून सोडविलेंत, तसेंच संसारजनित दुःखापासूनही मुक्त करावें असी अनेक प्रकारें विनंति करीत पदीं नम्र झालेला पाहून त्यास कांहीं श्रीगणेशोपासना सांगून तेथून बावा श्रीसिद्धटेकयात्रेस गेले. पुढें बहुत वर्षांनंतर परशुरामभाऊसाहेब पटवर्धन तासगांवकर यांचे आश्रयास सदर ब्राम्हणाचा पुत्र पुराण सांगण्यास होता, तो आपले पूर्वजांवर हरिभटबावांचा प्रसाद झाल्याची ही वरील कथा सांगून, आम्ही हरिभटबावांचे शिष्यपरंपरेंतील आहोंत असें तेथील सुज्ञांजवळ प्रतिपादन करीत असे. तो गत इतिहास परंपरेनें ग्रंथकर्त्याचे श्रवणांत आल्यावरूनच ही कथा लिहिण्यांत आली आहे. असो. इकडे सिद्धटेकास बावा गेल्यावर तेथें कांहीं दिवस राहून प्रभूचे पूजनादि प्रकार करीत असतां उत्तरोत्तर सर्व ऐहिक सौख्याविषयीं वितृष्ण होऊन सदा स्थिरबुद्धि होतांच अशा हरिबावांस चतुर्थाश्रम देऊन सन्मार्ग दाखविणारे कोणी महासिध्द सन्यासी त्या क्षेत्रांत येऊन त्यांनीं उपदेश देण्याची तयारी केल्यावर हरिबावांनीं आपल्या खांद्यावर घेण्याची पडशी जिला कामधेनु अशी संज्ञा दिली होती ती व पुस्तक आणि यज्ञोपवीतादि वस्तु अशा पुत्रांस देण्याकरितां शिष्यांचे स्वाधीन करून आपण सन्यासी झाले. इकडे वडिलांनीं चतुर्थाश्रय घेतल्याचें वर्तमान गोविंदहरींस कळतांच ते मोठ्या त्वरेनें त्या क्षेत्रांत त्यांचे दर्शनार्थ आले, त्यावेळीं त्या शिष्यमंडळींनीं ती पडशी आंतील वस्तुंसह गोविंदहरींचे स्वाधीन केली, ती पडशी बहुपूज्यबुध्दीनें, वडिलांचा प्रसाद मिळाला असें पूर्ण मानून, त्यांनीं आपल्या जामदारखान्यांत आणून ठेविली असो. ती पडशी गोविंदहरींस मिळाल्यावर उत्तरोत्तर संपत्तीचा उत्कर्ष होऊन पुढें त्यांचे पुत्र गोपाळराय यांसही पेशवे सरकारच्या कारभाऱ्याचा अधिकार कांहीं दिवस मिळाला. मात्र गोविंदहरींचे पश्चात् त्या पडशींतील श्रीगणेशमहामंत्र प्रयोगाचें पुस्तक वगैरे कांहीं कांहीं महत्वाच्या वस्तु नाहींशा झाल्या, असें वृद्ध वृद्ध म्हणत असत. हल्लीं गोविंदहरींच्या घराण्यांतील मळेकरांचे घरीं ती पडशी आहे.

हरिबावांनीं आश्रम धारण केल्यावर ते पूर्वींपेक्षांही ब्रम्हानंदांत विशेष मग्न असल्यावें इतर विचारर्कत विद्वानांस वाटून अनेक लोक दर्शनास येत असत. पुढें इच्छाविहारी ते हरिबावा हळू हळू संचार करीत तीर्थें व क्षेत्रें पहात पहात पुणें येथें ॐकारेश्वरांचे देवळांत शिष्यांसह येऊन राहिले. तेव्हां बावांस वृद्धावस्थेमुळें जरी अशक्तता आली होती तथापि ते आपले आश्रमाचें कर्मत्याग कधींही करीत नसत व उदरनिर्वाहही प्रतिदिवशीं अनुष्ठान आटपल्यावर दहा पांच घरें भिक्षेस जाऊन मिळेल तें अन्न आपले ठिकाणीं आणून भोजन करीत. अशा रातीनें वागण्याचें पाहून बहुतांची त्यांविषयीं पूज्यबुद्धि झाली होती, तसेंच श्रीमंतही केव्हां केव्हां दर्शनास येऊन कांहीं मागावें अशी विनंति करीत, पण स्वामी ती श्रवणांत न घेतां श्रीगणेशनामस्मरण करीत व हेंच उत्तर समजून बहुत विस्मय करीत वंदन करून श्रीमंत निरोप घेत असत केव्हां केव्हां स्वामी भिक्षेस निघाल्यावेळीं गोविंदही बरोबर फौज घेऊन श्रीमंतांचे दर्शनास जात असतां त्यास मार्गांत स्वामी भेटत,तेव्हां इतर कुटिल लोक स्वामीपुढें येऊन असें कळवीत कीं, काय ही फौज ! काय हे चोपदार व शिंगाचे शब्द ! काय हें गोविंदपंतांचें भाग्य आणि काय ही भिक्षा ! असे त्यांचे शब्द श्रवण करून स्वामी त्यांस असें सांगत कीं, अहो, त्या भाग्यापेक्षां हें भाग्य विशेष समजा; कां कीं ( न वैराग्यात् परंभाग्यं ) असें स्वानुभूत प्रमाण कथन करून पुढचे घरीं जाईत.इकडे हें स्वामीचें वाक्य श्रवणांत येतांच त्या श्रवणकर्त्यांची कुटिल बुद्धि नष्ट होऊन ते स्वामींस क्षमाच मागत. असे अनेक कुटिल, स्वामींचे भाषणश्रवणादिकेंकरून सदाचारसंपन्न झाल्याचें ऐकिवांत आहे. असो. असे बरेच दिवस गेल्यावर शके १६७२ मार्गशीर्ष वद्य १ दिवशीं ब्राम्हमुहूर्तकाळीं स्वामी जागृत होऊन समीपस्थ शिष्यांशीं आज प्रभुदर्शनार्थ स्वानंदपुरीस जाण्याचें आहे, असें भाषण करून स्नानादि नित्य कर्म केलें. आणि आसनावर बसून श्रीगजाननपादचिंतन करितां करितां त्यांचे मुखांतून सशब्द प्राणवायु निघून गेला,हें समीपस्थ शिष्यांचे ज्ञानांत येऊन ते पुढें

रून पाहतात तों स्वामी स्वानंदपुरीस गेले, असें पूर्ण समजुतींत आ-ल्यावर गुरुवियोग झाल्याबद्दल ते कष्टी होऊन त्यांनीं त्यांचे पुत्र गोविंदहरी व भास्करहरी हे उभयतांही त्यावेळीं सरकारकामावर तेथेंच हजर होते, त्यांस स्वामी स्वानंदस्थ झाल्याचें कळविलें. तेव्हां ते व इतर नित्य स्वामिदर्शनास येणारे थोर थोर गृहस्थ हे सर्व स्वामींजवळ ये-ऊन विचार करितात कीं, स्वामींनीं आज स्वानंदपुरीस जावयाचें असें शिष्यांजवळ सांगितलें हें श्रवण करून सर्व लोक बहुतच विस्मय करूं लागले. नंतर त्या सत्पुरुषाचा वियोग सहन न झाल्यामुळें कांहींवेळ स्तब्ध राहून नंतर विचारी पुरुषपुढें सरले आणि उत्तरकर्म करण्याची सर्व तयारी करून ॐकारेश्वराचे पूर्व बाजूस नदीतीरावर चांगले स्थळीं मोठा गर्त्त करून तेथें त्यांच्या पुत्रांनीं यथाविधि स्वामींची स्थापना केली. पुढें त्यावर पहार बांधून अश्वत्थारोपण केलें, तो वृक्ष हल्लीं कायम असून समाधिपूजनही गोविंदहरींचे वंशिकांकडून होत असून त्यांचे सर्व वंशिक आपापले शक्तितारतम्यानें पुण्यतिथी दिवशीं स्वामींची आराध-नाही करीत असतात.

हरिबाबा समाधिस्थ झाल्यावर श्रीमंत पेशवे सरकारांस साधूचा वियोग झाल्याबद्दल कांहीं खेद वाटून ते सर्वांस ह्मणत कीं, अशा सत्पुरुषाचें सदा स्मरण राहावें ह्मणजे त्या पुण्यानें तरी तशी स्थिति मि-ळेल, असे वेळोवेळीं ह्मणत असत. पुढें कांहीं दिवस गेल्यावर थोर थोर पदस्थ लोक व गोविंदहरी यास श्रीमंत वारंवार बाबांचें स्मरण कर-तात हें समजल्यावरून प्रसंगवशात् ते विनंति करतात कीं, हरिबाबा पटवर्धनासमान आलीकडे ईश्वरसाक्षात्कार असलेले महाविरक्त असे कोणी दिसत नाहींत. पूर्वी रामदासप्रभृति साधु जे झाले त्यांप्रमाणें यांनींही अनेकांचे कष्ट दूर केले व त्यांस चांगले मार्ग दाखविले व त्याचा प्रत्ययही दिला आणि तसा प्रत्यय सरकारासही बहुतवार आला-च आहे, तर त्यांचें स्मरण लोकमुखांत राहणें हें सरकारास बहुत इष्ट आहे. सबब अशी विनंति आहे कीं, मिरजनजीक संगमेश्वराचें स्थान असल्याबद्दल त्या क्षेत्रास हल्लीं अपभ्रंशानें सांगली असें नांव

# शुद्धिपत्र.

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३ | १७ | मोडल्याचे भयानें | मोडेल या भयानें |
| ४ | ११ | असी | अशी |
| ५ | २७ | भूमि | ० |
| ७ | २५ | शिरसावंदन | शिरसावंद्य |
| ९ | २४ | पुंत्र | पुत्र |
| १८ | ३ | असी | अशी |
| २३ | २० | असी | अशी |
| २४ | २० | घेतला. दुसरे | घेतला |
| २४ | २१ | दिवशीं कुरुंदवाडकर | दिवशीं व कुरुंदवाडकर |
| २५ | ३ | आणि | ० |
| २८ | ८ | आणून ठेवील | आणून न ठेवील |
| ३० | २ | जुनी पाढर | जुनीपांढर |
| ३८ | २६ | श्रोविठ्ठला[illegible] | श्रीविठ्ठलाचे |
| ४० | २४ | कर[illegible] | करीत |
| ४४ | ११ | सन्निघ | सन्निध |
| ४७ | २७ | स्वाऱ्या | घोडे |
| ५० | २४ | असी | अशी |
| ५१ | १२ | खैर झाली | खैर झाले |
| ५२ | २४ | वंगैरे | वगैरे |
| ५३ | १२ | सुवर्णालकार | सुवर्णालंकार |
| ५३ | १३ | नकरू | करून |
| ५५ | ४ | असी | अशी |
| ५६ | १६ | मोळीचे | गोळीचे |
| ५८ | २ | श्रामंतानीं | श्रीमंतानीं |
| ६६ | ८ | असी | अशी |
| ६९ | २८ | चातुयार्गें | चातुर्यानें |

असलेले गांवांपैकीं कृष्णातीरीं देवानजीकचे जमिनीवर हरिपूर या नांवें वसाहतीस व कांहीं तेथें राहणारे ब्राह्मणांस इनाम जमीन वंशपरंपरा मिळावी, ह्मणजे या हरिबावांचें स्मरण पूर्णपणें राहून तेथील ब्राह्मणही त्या हरिबावांचें अनुकरण करतील आणि तें करणें सरकारास बहुश्रेयस्कर होणार आहे ही विनंति ऐकून श्रीमंतांनीं हें वरील कृत्य करण्याकरितां गोविंदहरींचे नांवें जमीन देऊन गांवास हरिपूर हें नांव ठेवण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणें गोविंद हरींनीं जमीन घेऊन पुढें कांहीं गांववसाहत केली. नंतर गोविंदहरींचे पश्चात् त्यांचे चिरंजीव गंगाधरराव गोविंद ( ऊर्फ बाळासाहेब ) यांनी या ग्रंथकर्त्यांचे मातामह विष्णुपंत उत्तुरकर हे कृष्णंभट जोशी वरवडेकर हरिबावांचे शिष्यवर्गांत होते त्यांचे पुत्र असल्यामुळें त्यांचे हातून गांववसाहत चांगली होईल हें समजून त्यांसच तें काम सांगून तो गांव पूर्णदशेस आणिला. हल्लीं तेथें अनेक ब्राह्मण षट्कर्में करून राहत असून तो गांव हरिबावांचे नांवें प्रसिद्ध आहे. पुढें ईशप्रेरणेनें चरित्रलेखन पुरें केलें.

**समाप्त.**